सोलापूर तरुण भारत

आसमंत



# २१वे शतक हे भारताचेच!

लक्ष्यवेध

**संजीव ओक**

नीती आयोगाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला 'विकसित राष्ट्र' म्हणून ओळख मिळवून देण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. दहा वर्षांपूर्वी भारत जागतिक स्तरावर ११व्या क्रमांकावर होता, तर आज तो पाचव्या क्रमांकावर आहे. त्यानिमित्ताने नीती आयोगातील बैठकीतील विकसित भारताच्या व्हिजनविषयी...

नुकत्याच झालेल्या नीती आयोगाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ सालापर्यंत भारताला विकसित राष्ट्र म्हणून ओळख देण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. त्यासाठी त्यांनी कालबद्ध उपाययोजनाही आखल्या आहेत. 'विकसित भारत २०४७' या 'व्हिजन'ला त्यांनी अधोरेखित केले. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान मोदी यांनी सामाजिक, तसेच आर्थिक पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर विशेषत्वाने भर दिला.

यंदाच्या अर्थसंकल्पातही सर्वोच्च, विक्रमी ११ लाख, ११ हजार, १११ कोटी रुपयांची भांडवली तरतूद करण्यात आली आहे. त्याचवेळी संरक्षण, अंतराळ, नवोद्योग यांना चालना देण्यासाठी तरतूद केली आहे. केंद्र सरकारच्या योजना राज्य सरकारांनी प्रभावीपणे राबवल्या, तर सर्वांगीण विकास होण्याला बळ मिळेल. प्रत्येक राज्य आर्थिकदृष्ट्या प्रगत झाले, तर जीडीपीत त्यांचाही मोठा वाटा राहील. म्हणूनच, 'विकसित राष्ट्र' म्हणून पुढे येताना, सामूहिक प्रयत्न हे निश्चितपणे आवश्यक. नीती आयोगाने हीच बाब अधोरेखित केली, इतकेच.

विरोधकांनी राष्ट्रहिताची कधीही पर्वा केलेली दिसून येत नाही. म्हणूनच, या महत्त्वाच्या बैठकीवर राजकीय बहिष्कार टाकण्याचा उद्दामपणा त्यांनी केला. प. बंगालचा अपवाद वगळता विरोधकांच्या 'इंडी' आघाडीच्या नेतृत्वाखालील राज्यांनी यात सहभाग घेण्याचे टाळले. संरक्षण, अंतराळ, नवोद्योग या क्षेत्रांत भारताला प्रमुख निर्यातदार म्हणून ओळख देण्यासाठीही केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. राज्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि धोरणनिर्मिती तसेच प्रशासनात नाविन्यता आणावी, असे आवाहन त्यांनी केले. हे दशक बदलांचे आहे आणि संधींचेही, हेच पंतप्रधान मोदी यांनी आवर्जून सांगितले. भारताने याचाच लाभ घेत, आपली धोरणे आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी अनुकूल केली पाहिजेत, भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी प्रगतीची ही पायरी आहे, हे लक्षात घ्यायला हवे. केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये सहभागी प्रशासन आणि सहकार्य वाढविणे, सरकारी हस्तक्षेपांची वितरण यंत्रणा बळकट करून ग्रामीण आणि शहरी दोन्ही लोकसंख्येचे जीवनमान उंचावणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. केंद्र सरकारने ज्या अनेक योजना आणल्या आहेत, त्यांचा वापर भारतीय समाज आणि अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी केला पाहिजे. भारताची युवा लोकसंख्या हे भारताचे बलस्थान आहे.

जगातील सर्वात कुशल मनुष्यबळ मोठ्या संख्येने भारताकडे उपलब्ध आहे. तथापि, विकसित भारतासाठी आवश्यक ते कुशल आणि रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मितीसाठीही केंद्र सरकार व्यापक उपाययोजना आणत आहे. त्यासाठीच कौशल्य, संसोधन, नावीन्य, रोजगारावर आधारित ज्ञानावर भर देण्यात येत आहे. जगाचे उत्पादन केंद्र म्हणून भारताची वाटचाल होतच आहे. 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' या योजनांनी त्याचा पाया घातला आहे. साथरोगाच्या काळात जगाची पुरवठासाखळी विस्कळीत झाली, तेव्हा भारतामुळे ती काही प्रमाणात सुरळीत झाली होती. ही संधी साधून स्मार्ट फोन, सेमी कंडक्टर यांच्या उत्पादनासाठी सरकारने विविध योजना आणल्या. आज 'ॲपल' आणि 'सॅमसंग' या दिग्गज कंपन्यांचे स्मार्ट फोन भारतात उत्पादित होत असून येथूनच ते निर्यात होत आहेत.

'विकसित भारता'चे जे प्रमुख आधारस्तंभ आहेत, त्यात आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती, पर्यावरण शाश्वती, सुशासन यांचा उल्लेख करावा लागेल. आर्थिक वाढीमध्ये औद्योगिकीकरणाला चालना देणे, पायाभूत सुविधा वाढवणे, उद्योजकतेला चालना देणे तसेच विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे यांचा समावेश होतो. सामाजिक प्रगतीत समाजातील उपेक्षित घटकांची समावेशक वाढ आणि उन्नती सुनिश्चित करण्यासाठी आरोग्यसेवा, शिक्षण आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांमध्ये सुधारणा करणे यासाठी काम करावे लागणार आहे. पर्यावरणीय शाश्वतीसाठी इकोफ्रेंडली पद्धतींचा अवलंब करणे, अक्षय ऊर्जेला चालना देणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे यांची काळजी घ्यावी लागेल. सुशासनामध्ये संस्थांचे बळकटीकरण, पारदर्शकता, जबाबदारी आणि सार्वजनिक सेवांचे कार्यक्षम वितरण सुनिश्चित करावे लागेल. त्याचवेळी युवा सक्षमीकरण, गरिबी निर्मूलन, महिला सक्षमीकरण, कृषी विकास, पायाभूत सुविधांचा विकास करावा लागेल. आज देशात पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर निर्माण केल्या जात असल्या, तरी विकसित भारतासाठी त्या पुरेशा नाहीत. २०४७ सालापर्यंत भारतीय अर्थव्यवस्था ३० ट्रिलियन डॉलर्सची होईल, असा अंदाज आहे. आज ती ३.३ ट्रिलियन डॉलर्स असल्याचे मानले जाते. म्हणजेच, त्याच्यात जवळपास नऊपटीने वाढ आवश्यक आहे. विकसित राष्ट्राचा दर्जा प्राप्त करण्यासाठी २०४७ सालापर्यंत भारताचे दरडोई उत्पन्न १८ हजार डॉलर्स प्रतिवर्ष करण्याचे उद्दिष्ट आहे. आजच्या दरडोई उत्पन्नापेक्षा ती आठपट आहे. २०२७ सालापर्यंत भारत जर्मनी आणि जपानला मागे टाकेल आणि जागतिक स्तरावर तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल, असा अंदाज अनेक आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केला आहे. ही महत्त्वाची आर्थिक झेप गाठणे निःसंशयपणे आव्हानात्मक आहे. भारताची तरुण लोकसंख्या ही आर्थिक वाढ आणि नवकल्पना राबवण्यात कळीची भूमिका बजावेल.

(पान ४ वर)

# कमला हॅरिस जिंकू शकतील का?

अमेरिकेच्या राजकारणात अनेक दशकांमध्ये जितके घडत नाही, तेवढे गेल्या दोन-तीन आठवड्यांमध्ये घडले. कमला हॅरिस यांना राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार बनवून एक आठवडा होत नाही, तोवर त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेली विजयी आघाडी कमी करण्यात यश मिळवले आहे. त्यामुळेच जो बायडन यांच्यासाठी अशक्यप्राय असलेला विजय कमला हॅरिस खेचून आणू शकतात, असा विश्वास त्यांच्या समर्थकांना वाटू लागला आहे.

वेधक

**अनय जोगळेकर**



अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची निवड थेट जनतेतून होत असली, तरी तांत्रिकदृष्ट्या त्याची प्रक्रिया वेगळी आहे. अमेरिकेतील लोक राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारास मतदान करतात. पण, हे मतदान राज्यव्यापी असते. अमेरिकेतल्या प्रत्येक राज्याला तेथील प्रतिनिधीगृहाच्या जागा अधिक सिनेटच्या दोन जागा इतकी मते असतात. त्यामुळे ५० राज्यांमध्ये मिळून प्रतिनिधीगृहाच्या ४३५ अधिक सिनेटच्या १०० मतांची विभागणी होते. कोलंबियाच्या केंद्रशासित प्रदेशासाठी तीन मते राखून ठेवली असतात. त्यामुळे एकूण मतांची संख्या ५३८ इतकी होते. २७० किंवा त्यांपेक्षा जास्त मते मिळवणारा उमेदवार अध्यक्ष होतो. एखाद्या उमेदवाराला एका राज्यातील सर्वाधिक मते मिळाली, तर त्या राज्यातील सर्व प्रातिनिधिक मते त्या उमेदवाराला मिळतात.

कमला हॅरिस यांचे गृहराज्य असलेल्या कॅलिफोर्नियामध्ये ५४ मते असून, त्याखालोखाल टेक्सासमध्ये ४०, फ्लोरिडामध्ये ३० आणि न्यूयॉर्कमध्ये २८ मते आहेत. यातील काही राज्ये कायम डेमोक्रॅटिक पक्षाला कौल देतात, तर काही रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार निवडून आणतात. राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीचा निकाल अनेकदा फ्लोरिडा, नेवाडा, एरिझोना आणि पेन्सिल्व्हिनियासारखी कधी रिपब्लिकन, तर कधी डेमोक्रॅटिक पक्षाकडे कलणारी राज्ये ठरवतात. २०१६ साली ट्रम्प यांनी अनपेक्षितरित्या अमेरिकेच्या औद्योगिक राज्यांमध्ये आघाडी घेऊन विजय संपादित केला होता. आजवर ही राज्ये श्रमिकांसाठी लढणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षाला मतदान करत. २०२० साली मात्र ट्रम्प यांना यातील काही राज्यांत पराभव पत्करावा लागला होता. ट्रम्प यांना २१९ आणि बायडन यांना २२६ मते मिळण्याची खात्री व्यक्त केली जात होती. ९३ मते असलेल्या अशा या आठ राज्यांमध्ये चुरशीची लढत आहे.

बायडन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्यापूर्वी ट्रम्प त्यांच्यापेक्षा सहा टक्के मतांनी पुढे होते. बायडन ट्रम्पपेक्षा अवघ्या चार वर्षांनी वयस्कर असले, तरी ते थकले आहेत. कमला हॅरिस ५९ वर्षांच्या असून ट्रम्प यांच्या तुलनेत १८ वर्षांनी तरुण आहेत. डेमोक्रॅटिक पक्ष त्यांच्या पार्श्वभूमीचा वापर करून कृष्णवर्णीय, तरुण, महिला आणि अल्पसंख्याकांना आकृष्ट करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. या जोरावरच कमला हॅरिस यांनी आपली पिछाडी कमी केली असली, तरी ही लढाई त्यांच्यासाठी सोपी नाही. कमला हॅरिस आपण 'लोकनेत्या' असल्याची प्रतिमा निर्माण करत असल्या, तरी त्यांची आजवरची राजकीय प्रगती व्यवस्थेचे लाभ घेण्यातूनच झाली आहे. कमला हॅरिस यांचे संगोपन मुख्यतः त्यांच्या आईने केले. वयाच्या १२व्या वर्षी त्या आईसोबत कॅनडाला स्थलांतरित झाल्याने आणि आपले शिक्षण त्यांनी मुख्यतः कृष्णवर्णीयांच्या महाविद्यालयातच पूर्ण केल्याने त्यांना स्वतःला वंशभेदाचा सामना करावा लागला का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. कमला हॅरिस यांचे सॅन फ्रान्सिस्कोचे महापौर विली ब्राउन यांच्याशी प्रेमसंबंध होते. ब्राउन हॅरिस यांच्यापेक्षा सुमारे ३० वर्षांनी मोठे असून त्यांच्या वशिल्यामुळेच कमला हॅरिस यांना जिल्ह्याचे आणि नंतर राज्याच्या मुख्य सरकारी वकिलाचे पद मिळाले, असे म्हटले जाते. कॅलिफोर्निया या सगळ्यात मोठ्या राज्यातून सिनेटवर निवडून गेल्यानंतर कमला हॅरिस २०२० सालच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरल्या असता, अमेरिकेतील पुरोगामी माध्यमांनी त्यांना उचलून धरले.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या वादविवादात त्यांनी थेट जो बायडनवर वंशभेदासाठी जबाबदार असल्याचे आरोप करून प्रसिद्धी मिळवली. पण, जनतेने त्यांना न स्वीकारल्यामुळे त्यांना डिसेंबर २०१९ मध्येच माघार घ्यावी लागली. २५ मे २०२० रोजी अमेरिकेतील मिनियापोलिस येथे कृष्णवर्णीय नागरिक जॉर्ज फ्लॉएडचा पोलिसांच्या हातून मृत्यू झाला असता, त्याविरुद्ध कृष्णवर्णीय लोकांमध्ये संतापाची लाट उसळली. लवकरच त्याचे 'ब्लॅक लाईव्ज मॅटर' या आंदोलनात रूपांतर झाले.

(पान ४ वर)



# हर्षदायी श्रावण!

प्रत्येक पहाट मंगलमय असली, तरी सृष्टीचा मनोहारी दरबार सजलेला असताना उजाडणारी श्रावणातली पहाट मांगल्याचे काही आगळे कुंभ घेऊन येते, याबाबत दुमत असणार नाही. मोकळ्या मनाने श्रावणाचा आणि त्यानंतरच्या उत्सवपर्वाचा आनंद लुटू या...

निमित्त

**स्वाती पेशवे**

'**मनभावन हा श्रावण...**' दूर कुठेतरी गाण्याचे हे नितांतसुंदर सूर कानी पडले आणि या खरोखरच एका मनभावन मासाची मंगलमय सुरुवात झाल्यामुळे दाटलेली प्रसन्नता द्विगुणीत झाली. घरात अनेक घट असतात पण मंगल कलशामध्ये वेगळं पावित्र्य दिसतं. देवपूजा रोज होते, पण सणावारी केलेली पूजा अधिक सुशोभित दिसते. आपण दररोज कोणतं ना कोणतं स्तोत्र म्हणत असलो, तरी आवर्तनं केल्याने येणारं मांगल्य अधिक असतं. त्याचप्रमाणे एरवी यशाशक्ती आणि यथावकाश नित्यपूजा होत असली, तरी श्रावणात साजऱ्या होणाऱ्या विविध देवदेवतांच्या पूजा आणि त्यांच्या नामस्मरणाने मिळणारी प्रसन्नता काही वेगळीच असते.

श्रावणातली पहाट मांगल्याचे काही आगळे कुंभ घेऊन येते, याबाबत दुमत असणार नाही. देवाची पूजा करणारं एखादं व्रत अंगीकारतात. एरवी फारसे एकत्र न येणारे एखाद्या पोथीचं पठण करण्यासाठी ठरावीक वेळ मोकळा ठेवतात आणि घराघरांतून नैवेद्याचे सुवास येऊ लागतात... असं सगळं घडतं अथवा दिसतं ते श्रावण महिन्यात... केळीचे खुंट, अंगणात रेखाटलेली रांगोळी, नानाविध फुलांचे सुवास, कानी पडणाऱ्या कहाण्या, सणांच्या निमित्तानं नातलग आणि स्नेह्यांची लगबग अनुभवायला मिळते ती या महिन्यात... मेंदीचा तो वेडावून टाकणारा गंध आणि मोहक नक्षी अनुभवायला मिळते ती या महिन्यात... जिवतीच्या कागदासाठी हार करावे लागतात आणि भर पावसात पत्रीआघाडा-दुर्वा शोधाव्या लागतात ते या महिन्यात... सणावाराच्या निमित्तानं सासुरवाशिणी माहेरी येतात ते या महिन्यात आणि या सगळ्या वातावरणामुळे मन आनंदित व उल्हसित होतं, तेही याच महिन्यात...! म्हणजेच आध्यात्मिक आनंदापासून आत्मिक आनंदाकडे नेणारा, पुरणाच्या पोळीपासून लाह्याफुटाण्यांसारखा आरोग्यदायी खुराकाची मेजवानी देणारा हा महिना एक वेगळीच अनुभूती देतो.

श्रावणातला प्रत्येक दिवस एखाद्या सणासारखा असतो. ती आठवणींची उजळणी असते. श्रावणी सोमवार, मंगळवारी मंगळागौर, बुधवारी बृहस्पतीपूजन, शुक्रवारी जिवतीची पूजा, शनिवारी मुंज्याचे जेवण आणि रविवारी आदित्यपूजन... अजूनही आठवतंय, श्रावण आला की आजी पसाभर कापूस निवडायला बसायची. मग त्या निवडलेल्या कापसाची माळावस्त्रं, फुलवाती, पिळाच्या वाती करायची. ती हळदीकुंकवाने रंगवायची. अक्षता रंगवल्या जायच्या. कहाणीच्या पुस्तकाची शोधाशोध व्हायची. आरत्यांचं पुस्तक वरच्या खणात येऊन बसायचं. जिवतीच्या कागदाची फ्रेम साफसूफ व्हायची. आजूबाजूला आघाडा उगवला असल्याची खात्री व्हायची. कारण आता महिनाभर ही शिदोरी लागणार. आजही घराघरांत हे मंगलमय सोहळे साजरे होतात. सोमवारी शिवमंदिराचं प्रांगण गर्दीने फुलून येतं. लहान असताना प्रत्येक श्रावणी सोमवारी मधल्या सुट्टीनंतरच शाळा सुटायची.

(पान ४ वर)

# कारगिल युद्ध काही अप्रसिद्ध घटना

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

विश्वसंचार' सदरात आपण मागील चार महिन्याखाली जुलै २०२४ मध्ये येऊ घातलेल्या कारगिल युद्ध विजयाच्या २५ व्या स्मरण दिनाचा आढावा घेतला होता. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची अमृतसर-लाहोर सद्भावना बस यात्रा, लाहोर सामंजस्य करार, त्याचवेळी पाकिस्तानी सैनिकांनी लडाखमधील कारगिल क्षेत्रात घुसखोरी करणे; मग मे १९९९ पासून युद्धाला सुरुवात होऊन २६ जुलै १९९९ रोजी भारताने युद्ध जिंकल्याचे जाहीर करणे इत्यादी घटनाक्रमाचा आढावा आपण त्यावेळी घेतला होता.

आता नुकताच २५ वा कारगिल विजय दिवस साजरा झाला आहे. ग्रेनेडियर योगेंद्रसिंह यादव, लेफ्टनंट मनोजकुमार पांडे, कॅप्टन विक्रम बात्रा, रायफलमॅन संजयकुमार इत्यादी अतुल पराक्रमी वीरांच्या रणकौशल्याबद्दल वक्ते भरभरून बोलत आहेत. लष्कराने आखलेल्या 'ऑपरेशन विजय', वायुदलाने आखलेल्या 'ऑपरेशन सफेद सागर' इत्यादी मोहिमांबद्दल तज्ज्ञ माहिती देत आहेत. राजकारणी लोकांच्या आत्यंतिक भ्रष्टाचारामुळे बोफोर्स तोफा फार बदनाम झाल्या होत्या. पण लष्कराला त्यांची खरोखरच आवश्यकता होती, हे कारगिलच्या रणांगणावर सिद्ध झाले. आमच्या आयात व्यवहारात राजकारणी लोकांनी अमाप पैसा खाल्ला, हा काही आमचा दोष नव्हे.

शत्रूवर अचूक गोलंदाजी करून शत्रुसैन्याचा हुरडा भाजून काढणे हे आमचे काम आहे. ते आम्ही चोख बजावले, असेच जणू त्या दणदणत्या तोफांनी ओरडून सांगितले. लष्कर म्हणजे भूदल आणि वायुदल अशाप्रकारे थेट 'ॲक्शन'मध्ये उतरलेले असताना भारताचे नौदल काय करीत होते? अनेकांना कदाचित हा प्रश्नच हास्यास्पद वाटेल. हिमालयात लडाख परिसरात १८ हजार फूट उंचीवर युद्ध चालू असताना तिथे नौदलाचे काय काम, असे आपल्याला वाटू शकते. त्यासाठीच कोणताही विषय वाचत असताना जवळ ॲटलास ठेवायचा आणि वृत्तांतामधली ठिकाणे त्या नकाशांमध्ये बघण्याची सवय करून घ्यायची. तर, पाकिस्तान जरी हिमालयात युद्ध लढत असला, तरी त्याला शस्त्रास्त्रे, दारूगोळा, अन्नधान्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेल किंवा पेट्रोलचा पुरवठा कुठून होतो? पाकिस्तानच नव्हे, तर जगातल्या कोणत्याही देशाचा वरील सर्व गोष्टींचा पुरवठा हा मुख्यत: समुद्रमार्गेच होतो.

ज्या देशांना समुद्री किनारपट्टीच नाही, त्यांचे काय? असे देश जवळच्या समुद्र किनारावाल्या देशांशी शक्यतो मैत्री राखतात आणि त्यांच्या बंदरांमधून जहाजे आणि रेल्वे मार्गे आपला व्यापार, आयात-निर्यात चालवितात. कारण विमान भाडे हे कुठेही महागच पडते. तर, पाकिस्तानचा हा सगळा व्यापार किंवा पुरवठा चालू ठेवणारे मुख्य बंदर म्हणजे कराची.

आता घटनाक्रम कसा घडत गेला पहा- ३ मे १९९९ रोजी कारगिल भागातल्या मेंढपाळांकडून भारतीय लष्कराला पाकिस्तानी घुसखोरीची पहिली खबर मिळाली. भूदलाची सूत्रे हलू लागली. २६



मे १९९९ रोजी भारतीय हवाई दलाने घुसखोरांवर पहिल्यांदा बॉम्बफेक केली. उर्मट पाकिस्तान्यांनी २७ मे रोजी 'अन्झा' नामक क्षेपणास्त्रे डागून वायुदलाची मिग-२१ आणि मिग-२७ अशी दोन विमाने पाडली. युद्ध भडकत जाण्याची लक्षणे दिसू लागली. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी नौदलाची सोंगटी पुढे सरकवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. जून १९९९ च्या सुरुवातीच्या भारतीय नौदलाच्या वेस्टर्न कमांडचा ताफा कराचीकडे कूच करण्यासाठी सिद्ध झाला. मुंबईपासून गुजरातमधल्या सर्व बंदरांची उत्तम मजबुती करण्यात आली. 'मुंबई-हाय' या तेल उत्पादन क्षेत्राचाही कडेकोट बंदोबस्त करण्यात आला.

शिवाय नौदलाच्या ईस्टर्न कमांडमधल्या निवडक जहाजांना आदेश गेले- 'पश्चिमी काफिल्याच्या कुमकेसाठी पूर्व समुद्रातून तातडीने पश्चिम समुद्रातल्या कोची बंदरात या.' खेरीज नौदलातील विमान दल, तटरक्षक दल, समुद्र आणि जमीन दोन्ही ठिकाणी लढण्याची क्षमता असणारी पथके (अँफिबियस फोर्स) या सर्वांनाच कारवाईसाठी सज्ज करण्यात आले. या कारवाईचे सांकेतिक नाव होते- 'ऑपरेशन तलवार.' भारत देश स्वतंत्र झाल्या झाल्या ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्ताननेच भारतावर पहिले आक्रमण केले होते. हे युद्ध काश्मीर घाटी आणि लडाखमध्ये लढले गेले. त्यामुळे नौदलाचा संबंधच आला नाही. मग ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने नेफा भागात (आताच्या अरुणाचल प्रदेशात) भारतावर आक्रमण केले. तिथेही नौदलाचा संबंध नव्हता. नंतर १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण करताना द्वारका बंदरावर तोफा डागल्या होत्या.

भारतीय नौदल या आक्रमणाचा सणसणीत जबाब द्यायला सक्षमही होते आणि उत्सुक तर फारच होते. पण तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी नौदलाला या युद्धात न उतरवण्याचा निर्णय घेतला. नौदलाने पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीचे फक्त रक्षण करावे, आक्रमण करून जाऊ नये, असा कडक आदेश त्यांनी दिला. त्यामुळे आपले आरमारी योद्धे फार नाराज झाले. त्याचे सगळे उट्टे त्यांनी १९७१ साली बांगलादेश युद्धात अगदी भरभरून काढले. पश्चिमेकडे त्यांनी कराची बंदर पेटवून दिले तर पूर्वेकडे पाकची 'माझी' ही विध्वंसक पाणबुडी खतम केली नि चित्तगाँग, मोंगला, कॉक्स बझार इत्यादी बंदरांची जबर नाकेबंदी केली. त्यामुळे पूर्व पाकिस्तानातल्या (आताचा बांगलादेश) पाक सैन्याची रसद साफच बंद पडली.

आता नौदलाला पुन्हा पाकच्या कराची बंदराची कोंडी करून पाकचा सगळाच व्यापार, लष्करी-नागरी पुरवठा बंद पाडायचे आदेश मिळाले. 'ऑपरेशन तलवार' सुरू झाले. भारतीय युद्ध नौका वेगाने कराचीकडे सुटल्या. विशिष्ट अंतरावरून सुमारे ३० भारतीय नौकांनी कराची बंदराकडे जाणारे सर्व समुद्री मार्ग पक्के रोखून धरले. पाकचा सगळा तेल पुरवठा इराणी आखातमार्गे उमानचे आखात (ओमान) असा चालायचा. तो मार्ग तर विशेषच दाबून धरण्यात आला. म्हणजे काय? म्हणजे असे की, जमिनीवरच्या रस्त्यांप्रमाणेच समुद्रातही रस्ते असतात.

पाण्याची खोली, पाण्यात लपलेले खडक, प्रवाळांची बेटे, समुद्री प्रवाह अशा सगळ्या गोष्टींचा अभ्यास करून या समुद्री रस्त्यांचे नकाशे बनवण्यात येतात. जहाजांचे कप्तान त्या नकाशानुसारच जहाज चालवतात. हे समुद्री रस्ते रोखून धरणे म्हणजे त्यांना आपल्या जहाजावरच्या तोफांच्या पल्ल्यामध्ये (रेंजमध्ये) आणणे. भारतीय नौदलाचे तत्कालीन चीफ ऑफ नेव्हल स्टाफ (सी.एन.एस.) ॲडमिरल सुशील कुमार यांनी सेवानिवृत्तीनंतर 'अ प्राईम मिनिस्टर टु रिमेंबर -मेमरीज ऑफ अ मिलिटरी चीफ' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी 'ऑपरेशन तलवार'बद्दल सविस्तर लिहिले आहे. ही कारवाई पूर्णपणे यशस्वी झाली.

पाक नौदलाने भारतीय नौदलाच्या भीतीने आपल्या सगळ्या नौकांना संदेश पाठवले- 'ज्या बंदरात असाल तिथेच थांबा. बाहेर पडू नका.' या नाकेबंदीचा परिणाम नंतर पाकचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्याच तोंडून बाहेर पडला. ५ जुलै १९९९ रोजी नवाझ शरीफ यांनी जाहीर केले की, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या सूचनेनुसार पाकिस्तान कारगिलमधून आपले सैन्य मागे घेत आहे. त्यावेळी त्यांनी असेही सांगितले की, पाकिस्तानकडे आता फक्त सहा दिवसच पुरेल इतकाच तेलसाठा शिल्लक आहे. शत्रूची रसद मारून त्याला उपासमारीच्या उंबरठ्यावर आणून ठेवणे, हे जे नौदलाच्या कारवाईचे उद्दिष्ट ते पूर्णपणे सफल झाले.

तोफेचा एकही गोळा न डागता! एकही गोळी न झाडता! सैनिकी पेशात म्हटले जाते की, अनेकदा मोठे विजय इतक्या शांतपणे प्राप्त केले जातात की सर्वसामान्यांना कदाचित ते कधीच कळत नाहीत. 'ऑपरेशन तलवार' चा नौदल विजय हा त्या प्रकारचा होता, असे म्हटले पाहिजे. बिल क्लिंटन यांच्या सूचनेनुसार म्हणजे प्रत्यक्षात तंबीनुसार ५ जुलै १९९९ रोजी पाकने सैन्य माघारीची घोषणा केली असली, तरी सर्व राजनैतिक आणि लष्करी औपचारिकता पूर्ण व्हायला आणखी २० दिवस गेले.

२६ जुलै १९९९ रोजी भारताने जाहीर केले की, भारतीय भूदलाचे 'ऑपरेशन विजय' पूर्णपणे यशस्वी झाले असून एकूण एक पाकी घूसखोर भारतीय भूमीवरून हाकलून देण्यात आलेला आहे. भारतात साहचिकच विजयाचा जल्लोष झाला; तर पाकिस्तानमध्ये पंतप्रधान नवाझ शरीफ आणि सेनाप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या नावाने शिव्यांची सरबत्ती झाली. असे म्हटले जाते की, सैनिकी मुख्यालयात तीनही दलांचे प्रमुख आणि नवाझ शरीफ यांच्यात एक गरमागरम बैठक झाली. बैठकीत चीफ ऑफ नेव्हल स्टाफ ॲडमिरल फसीह बोखारी आणि सरसेनापती जनरल मुशर्रफ यांनी एकमेकांना शिवीगाळ केली.

ॲडमिरल बोखारींनी भर बैठकीतच जनरल मुशर्रफ यांच्यावर 'कोर्टमार्शल' खटला भरण्याची मागणी केली. विरोधी पक्षनेत्या बेनझीर भुत्तो यांनी या पराभवाला उद्देशून 'पाकिस्तान अ ग्रेटेस्ट ब्लंडर'- पाकिस्तानची सर्वोच्च घोडचूक, असे उद्गार काढले. पाकिस्तानी शक्तिमान हेरखाते आय.एस.आय.ने ही 'कारगिल हा एक वेळ फुकट दवडणारा उद्योग होता नि त्यातून काहीही साध्य झाले नाही' असा शेरा मारला.

नंतर २००६ साली 'पाकिस्तान मुस्लिम लीग' या पक्षाने एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली. त्यात असे म्हटले की, नवाझ शरीफ यांनी या पराभवाची न्यायालयीन चौकशी करून जनरल मुशर्रफ यांच्यावर कोर्टमार्शल खटला करण्याची सिद्धता केली होती. पण दोनच महिन्यात म्हणजे १२ ऑक्टोबर १९९९ रोजी जनरल मुशर्रफ यांनी राज्यक्रांती करून नवाझ शरीफ यांना पदच्युत केले. चौकशी अहवाल दाबून टाकला.

भारताने मात्र योग्य तो धडा घेत कृष्णस्वामी सुब्रह्मण्यम हे 'इन्स्टिट्यूट फॉर डिफेन्स स्टडीज् ॲण्ड ॲनलीसिसआय.डी.एस.ए.' या प्रख्यात संस्थेचे संचालक होते. कारगिल घुसखोरीची बातमी मिळवण्यात भारतीय हेरखाते अपयशी ठरले. याला 'इंटेलिजन्स फेल्युअर' असे म्हणतात. याचा सखोल विचार करून सुब्रह्मण्यम समितीने भारतीय गुप्तचर संस्थांची व्यापक पुनर्रचना केली. सुब्रह्मण्यम समितीचा अहवाल इतका संवेदनशील आहे की, त्यातला बराच भाग वाजपेयी सरकारने 'अतिगुप्त' म्हणून प्रसिद्ध केला नाही. अंमलबजावणी मात्र केली.

भारतीय संरक्षण क्षेत्रामध्ये, त्यातही अणुऊर्जा, आण्विक क्षेपणास्त्रे, अण्वस्त्र चाचणी इत्यादी मुद्यांवर सुब्रह्मण्यम या माणसाने सखोल चिंतन करून ठेवले आहे. भारताचे वर्तमान परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर किंवा सुब्रह्मण्यम जयशंकर हे या कृष्णस्वामी सुब्रह्मण्यम यांचे चिरंजीव आहेत.

कारगिल विषयाचा राजकीय परिणाम सप्टेंबर-ऑक्टोबर १९९९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली रालोआ युती सरकार बहुमताने निवडून आले आणि त्याने २००४ पर्यंत म्हणजे पाच वर्षांचा पूर्ण कार्यकाळ सत्ता सांभाळली.(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# जाणे भक्तीचा जिव्हाळा : संत मारुती महाराज माकनेरकर

संत प्रबोधन

**प्रा. डॉ. हरिदास आखरे**

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये अनेक संत व संप्रदाय यांनी भक्ती संस्काराची तेजोमय पताका आजतागायत फडकवत ठेवली आहे. संतांनी जी प्रबोधनाची परंपरा समाजाला दिली, त्या परंपरेचे पाईक होण्याचे भाग्य अनेक संतांना लाभलेले आहे. संत ज्ञानेश्वर माउली यांनी या प्रबोधन परंपरेचा पाया घातला तर तुकोबाराय तिचे कळस झाले. याच परंपरेत असंख्य संतांनी आपली भक्ती वचने फुलवली आहेत. संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज यांनी तर प्रबोधन परंपरेला अधिक प्रवाही करण्याचं काम केलं.

**ज्ञानदेवे रचिला पाया । उभारीले देवालया ।। नामा तयाचा किंकर । जेणे केला हा विस्तार ।। नाथ दिला खांब । तोचि मुख्य आधार ।। तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।** या संत परंपरेतील एक संत म्हणजे विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात मलकापूर तालुक्यातील माकनेर या लहानशा गावातून ज्यांनी आपली भक्तिगंगा निर्माण केली, ते ब्रह्मरूप संत श्री मारुती महाराज माकनेरकर होत. त्यांचं प्रबोधन कार्य अलौकिक आहे. असंख्य अभंग, कीर्तन, गीताभाष्य, सुभाषित निर्माण करून त्यांनी आचाराचा सिद्धांत आपल्या भक्त परिवाराला दिला. त्यांच्या एकूणच साहित्यावर आजतागायत अनेक अभ्यासकांनी पीएच.डी. प्राप्त केली. असंख्य भक्तांना त्यांची भजन पाठ आहेत. त्यांची वचने मुखोद्गत आहेत. ब्रह्मरूप संत श्री मारुती महाराज माकनेरकर श्री मारुती महाराज माकनेरकर यांचे जीवन व कार्य अतिशय भक्तिपूर्ण आहे. आत्मतत्त्व आणि भक्ती मार्गाची शिकवण देणारे हे संत कोणत्या पद्धतीने आपले कार्य करतात.



मारुती महाराजांची आध्यात्मिक वाटचाल, त्यांचे बालपण व शिक्षण, महाराजांचे शिष्य संप्रदाय याबद्दल माहिती त्यांच्या विविध ग्रंथातून पाहायला मिळते. जीवनामध्ये ब्रह्मप्राप्ती करायचे असेल, तर सद्गुरुप्राप्ती हाच त्याचा उपाय आहे, असे ते प्रकर्षाने सांगतात. परमार्थासाठी देहबुद्धी सोडावी लागेल आणि मगच तुम्हाला परमार्थाची प्राप्ती होईल, हे महाराजांचे आगळेवेगळे विचार लेखातून संत महाराजांचे विचार मांडतात. कोणतीही गोष्ट प्राप्त करायची असेल तर **असाध्य ते साध्य। करिता सायास।। कारण अभ्यास। तुका म्हणे।। या वचनाप्रमाणे आपल्याला त्या भक्तीचा ध्यास धरावा लागेल,** असं मत महाराज या ठिकाणी मांडतात. त्यासाठी भक्तीचा एकविद्भाव तुमच्या अंत:करणांमध्ये असला पाहिजे. तुम्ही जाणीव ठेवून कर्म करू नका तर अंतरी जाणीव नसावी, हा भाव भक्तिमार्गामध्ये खूप महत्त्वाचा ठरतो. खरा देव भेटायचं असेल तर.. **तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।** हे तत्त्व आपण अंगीकारले पाहिजे, असे '**तीर्थी धोंडा पाणी**' या विचारातून आपलं भक्ती वचन मांडतात. जोपर्यंत ब्रह्मदृष्टी प्राप्त होत नाही, तोपर्यंत ही मायासृष्टी आपल्यावर राज्य करीत असते, हा तत्त्व विचार मोठ्या ताकदीने मारुती महाराज मांडतात.

व्यक्तीची आध्यात्मिक प्रगती आणि अधोगती हे कोणत्या पद्धतीने होते ते लक्षात घ्यावे, असा भाव ते सांगतात. **धनसंपत्तीचा मोह तो सोडावा। नको येऊ देऊ स्वामी आडभावा ।।** भक्तिमार्गामध्ये सेवेला खूप महत्त्व आहे. वेदांताचा सिद्धांत सांगतो. 'सेवा परमो **धर्मः।**' त्याच उक्तीनुसार संत मारुती महाराज माकनेरकर सांगतात **नको धन मोक्ष मुक्ती ती ही काही।। संत संग देई मज सदा।। तुमच्या दासाचा दास करून ठेवा।। आशीर्वाद हाची द्यावा मज।। 'जाणीव नसावी अंतरी भावे सेवा करी'** असा ज्याचा भाव असेल त्याला भगवंत साक्षात भेट देत असतो. साधनभक्ती अशा जाणिवेतून करतात. इतक्या माळा जपल्या, इतक्या वाऱ्या केल्या, प्रत्येक जण हिशोब ठेवतात. एखाद्या ठिकाणी देणगी दिली आणि ते सांगत सुटावे, अशा व्यक्तींना जाणिवेचे भक्तिकर्म कळलेच नाही. त्यातून फक्त अहंकार वाढतो.

संत तुकाराम महाराज म्हणतात की **अहंकाराचा वारा । न लागे राजसा।। संतांचा विचार पुढे जावा संतांचे हे कार्य लेखनरूपी धन प्रत्येकाच्या हातात द्यावं. ज्याप्रमाणे 'तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी।।'** भगवंत हा सज्जन व्यक्तीम ध्येच वास करतो. महाराजांच्या उक्तीप्रमाणेनका **पाहू वेद पुराण। पाहे अंतर शोधून।। मारुती म्हणे अंतकरण । ओळख नरदेही दर्पण।।** खरा शिष्य कोण असेल, तर जो मनाने भाविक आहे, जो कोणाची कुचेष्टा करत नाही, जो सद्वर्तनी आहे. त्याची आणि भाविकाची लक्षणे या ग्रंथातून लेखकाने खरा शिष्य भाविक विचार बोधातून उद्धृत केलेले आहेत. **खरा शिष्य भाविक। त्यासी नावडे लौकिक ।। सद्गुरू वचने देई प्राण। पूर्ण हे इमान।।** आणि जो खरा भाविक भक्त असतो, त्याला जोपर्यंत ब्रह्मदृष्टी प्राप्त होत नाही, तोपर्यंत त्याला माया सृष्टीही दिसतच असते. भक्ताने कसे वागावे, तर जीवनातील मोहमाया टाकूनच सद्गुरू शरण जावे. ज्या पद्धतीची जीवनसंहिता आपल्याला समजून दिलेली आहे, त्या पद्धतीचं क्रियमान आपण केलं पाहिजे. भगवंताची व्यापकता त्याशिवाय लक्षात येऊ शकत नाही.

संत तुकारामांनी त्यांचे वर्णन केलेले आहे. **अणूरेणूया थोकडा। तुका आकाशाएवढा।।** अन्यथा आध्यात्मिक अधोगतीच्या मार्गाची द्वारे अशा भक्तांना काम, क्रोधाधी विकार निर्माण झाल्यामुळे खुली होत असतात. ती विषयाच्या चिंतनातून निर्माण होते, अशी भगवद्गीता सांगते **ध्यायतो विषयान्पुसः । सङ्गात्सजायते सुप जायते ।।** विषयाचे चिंतन करणाऱ्या पुरुषाची त्या विषयात आसक्ती उत्पन्न होते. तिथूनच विषयाची कामना निर्माण होते. कामना जर पूर्ण झाल्या नाहीत तर क्रोध उत्पन्न होतो. याच क्रोधातून पुढे विचारशक्ती नष्ट होऊन अविचार बळावतो. स्मरणशक्तीचा नाश होऊन स्मरणशक्ती भ्रष्ट होते. बुद्धीचा नाश म्हणजे ज्ञानशक्तीचा नाश होय. बुद्धीचा नाश झाला की माणसाचा अध:पात होतो. एवढे मोठे तत्त्वज्ञान संत मारुती महाराज अनेक ग्रंथांतून मांडतात. म्हणून कामनेला बाजूला सारून खरी भक्ती करावी, असा विचार संत मारुती महाराज मांडतात. **प्रेमाविण भजन । नाकावीन मोती । । अर्था वाचून पोथी । वाचून काय ।। भक्ती उपासनेमध्ये भावाला खूप महत्त्व आहे. जैसा ज्याचा भाव । तैसा त्याचा देव ।।** या उक्तीनुसार देव हा भावाचा भुकेला आहे. देवाला तुमचा पैसा नको, संपत्ती, पद, प्रतिष्ठा नको. तर, तुमची खरी भावाची भक्ती हवी. त्यासाठी अत्यंत आवडीने भगवंताच्या नामाचा स्मरण करावं.

**(पान ६ वर)**


# जिंदगी देनेवाले सुन..! वैराण वाळवंटातील मखमली हिरवळ!

सिनेजगत

**देवेंद्र प्रभुणे**

भारतीय चित्रपट आरंभीच्या काळापासूनच संगीत-शरण होता. मूकपटांच्या म्हणजे १९१३ ते १९३१ या कालावधीतही पडद्यावरील हलत्या चित्रांना समोर बसलेला वाद्यवृंद जिवंत पार्श्वसंगीत प्रदान करीत असे. अर्थात, ही सुविधा काही मोजक्या चित्रपटगृहांमध्येच उपलब्ध असे व प्रत्येक खेळाला वेगवेगळे पार्श्वसंगीत देण्याची सोय आपल्या कल्पक चित्रपट निर्मात्यांनी योजली होती.

चित्रपट बोलू लागल्यानंतर चित्रपट संगीताला सुसूत्रता व चिरंतनत्व प्राप्त झाले. याचा एक ठळक परिणाम चित्रपटाचा प्रेक्षक सीमित होण्यात झाला. म्हणजे मूकपट जसे अखंड भारतवर्षात प्रदर्शित होत व त्याचा आस्वाद समस्त प्रेक्षक, भाषेची आडकाठी नसल्यामुळे निर्वेध घेत तो प्रकार बंद झाला. दुसऱ्या बाजूने पाहिले असता, भाषा व गीत-संगीत यांच्या प्रयोजनाने चित्रपटास एक ठळक अस्तित्व प्राप्त झाले. भारतात पार्श्वगायनाचा पहिला प्रयोग १९३५ साली 'धूपछाँव' या चित्रपटात झाला तरी या पद्धतीचा सर्वंकष वापर हा १९४० च्या दशकात प्रत्ययास आला. अतिशय प्रतिभाशाली संगीतकार व त्यांच्या संगीतरचनांना पुरेपूर न्याय देणारे लोकोत्तर गायकगायिका यांचा मनोहारी संगम, हिंदी चित्रपट संगीतात १९४५ नंतर दिसू लागला. महानायकांचा उदय व पार्श्वगायनातील आभाळासम कर्तृत्वशाली गायक-गायिका यांचा वैभवमयी काळ एकाच वेळेस अवतरला, हा एक सुखद दैवयोग! भारतीय समाजाच्या पुरुष व प्रकृती यांच्या आवाजासंदर्भात अपरिवर्तनीय स्पष्ट कल्पना असतात. सहसा, त्या कल्पना भंग करणाऱ्या आवाजांना चिरकाल मान्यता मिळत नाही, ही वस्तुस्थिती. पुरुष हा खडा व बुलंद आवाजाचा धनी असला पाहिजे तर स्त्री ही माधुर्य व कारुण्ययुक्त आवाजाची स्वामिनी हवी, असे आपण मनोमन ठरवलेले असते. बहुतांश वेळी, या प्रतिमानास सिद्ध करणाऱ्या आवाजांची आपणास मोहिनी पडली आहे, हे निर्विवाद सत्य. या ठाशीव चिरेबंदी वाड्यास आपल्या मुलायम व मखमली नाजूक आवाजाने अलगद भुईसपाट करणारा आवाज म्हणजे तलत मेहमूद..!



२४ फेब्रुवारी १९२४ रोजी लखनौ, उत्तरप्रदेश येथे एका परंपरागत व कर्मठ विचारसरणीच्या कुटुंबात तलत मेहमूद यांचा जन्म झाला. कुटुंबात संगीत कलेस त्याज्य समजले जात असतानाही तलत यांच्या जीवनात संगीत अंकुर प्रस्फुटित झाले, हे एक महद आश्चर्यच. लहानपणी तलत मेहमूद यांचा आवाज अतिशय नाजूक व कोवळा होता. त्यांचा आवाज त्यांच्या वयाच्या मुलींपेक्षाही बारीक होता. त्यामुळे लखनौ आकाशवाणीवर हटकून मुलांच्या कार्यक्रमात समूहगीते गाण्यासाठी त्यांची वर्णी लागायची. सोबतच, लखनौ येथे असलेल्या सुप्रसिद्ध मॉरिस संगीत विद्यालयात त्यांनी शास्त्रीय संगीताचे अध्ययन केले. त्यांचे शास्त्रीय संगीताचे गुरू पं. एस. सी. आर. भट यांनी त्यांना शास्त्रीय संगीताचा पाया भक्कम करून सुगम संगीताच्या क्षेत्रात कारकीर्द घडवण्याचा मोलाचा सल्ला दिला. त्यामुळे तलत यांनी आपली संगीत शैली बदलली. लखनौ त्याकाळी संगीत, नृत्य व उपयोजित कला यांच्या क्षेत्रात महत्त्वाचे केंद्र होते. विशेषकरून शेर-शायरी व गज़ल हे लखनौचे श्वास-नि:श्वासच होते. तलत मेहमूद यांनी फारसी भाषेचेही सखोल अध्ययन केले असल्यामुळे उर्दू शब्दांचे अर्थ व त्यांचे अचूक उच्चार त्यांच्या अंगवळणी होते. त्याचसोबत कुजबुजता, अंतरीचे गूढ अंतरातून सांगू पाहणारा मुलायम स्वर लाभलेले तलत मेहमूद वयाच्या १६ व्या वर्षी गझल गायन क्षेत्रात उमलू लागले. बालपणी कुटुंबीयांनी लहान मुलगा म्हणून अनिच्छेने दिलेली गीत गायनाची मुभा मात्र आता उरली नव्हती. कठोर कुटुंबीयांनी गीत गायन किंवा कुटुंब असा पर्याय समोर ठेवला असता, तलत मेहमूद यांनी संगीताच्या अतीव ओढीपोटी संगीताचा पर्याय निवडला व संघर्ष टाळण्यासाठी कलकत्ता येथे १९४० साली कूच केले.

१९४१ साली वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी तलत मेहमूद यांची 'सब दिन एक समान नही था' ही ध्वनिमुद्रिका एचएमव्ही कंपनीने बाजारात आणली व त्या आवाजाने रसिकांना मोहिनी घालण्यास सुरुवात केली. कलकत्ता येथे त्यांनी खाजगी मुशायरे गाजवण्यास सुरुवात केली व त्यांचे नाव कलकत्त्याच्या रसिक वर्तुळात अतिशय प्रेमाने घेण्यात येऊ लागले. १९४४ च्या सुमारास त्यांच्या खाजगी गीत 'तस्वीर तेरी दिल मेरा बहेला ना सकेगी'ने आबालवृद्धांच्या हृदयाचा ठाव घेतला. देखणे रूप असलेले तलत मेहमूद काही बंगाली चित्रपटांमध्येदेखील चमकले. पण त्यांना दिगंत कीर्ती प्राप्त झाली ती त्यांनी १९४४ ते १९४७ दरम्यान गायलेल्या बंगाली आधुनिक गीतांनीच. गमतीचा भाग म्हणजे, ही गीते त्यांनी 'तपनकुमार' या छद्मनामाने ध्वनिमुद्रित केली होती. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. तलत मेहमूद यांचे बहुसंख्य कुटुंबीय पश्चिम पाकिस्तानात स्थलांतरित झाले; पण तलत मेहमूद भारतातच थांबले.


१९४९ साली दिग्गज संगीतकार अनिल बिस्वास यांनी त्यांना हिंदी चित्रपट संगीतात पदार्पण करण्याची संधी 'आरजू' या चित्रपटाद्वारे दिली. दिलीपकुमार नायक असलेल्या या चित्रपटात 'ऐ दिल मुझे ऐसी जगह ले चल जहां कोई ना हो' ही भग्नहृदयी प्रेमिकांची व्यथा विशद करणारी गझल होती. तलत मेहमूद लोकप्रियतेच्या झोतात आले. त्या काळात आघाडीचे संगीतकार नौशाद यांनी त्यांना १९५० साली आलेल्या 'बाबुल' चित्रपटात दिलीपकुमार यांच्यावर चित्रित गीते गाण्यासाठी पाचारण केले. या चित्रपटात 'मेरा जीवन साथी बिछड गया, लो खत्म कहानी हो गयी' व 'हुस्नवालों को दिल ना दो' ही दोन बहारदार एकल गीते होती. दिलीपकुमार यांचा आवाज म्हणून जवळपास मान्यता मिळाली असतानाच तलत मेहमूद यांच्या नौशाद यांच्यासमोर सिगारेट ओढण्याच्या औद्धत्याने घात केला व कारकीर्दीस खीळ बसली.

**(पान ६ वर)**

# केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८






१. कनिष्ठ ब्राह्मण कुटुंबातील माधव नुकताच बंगळुरूच्या मेडिकल कॉलेजमधून डॉक्टर झाला. पालकांना त्याने सांगितले की, ''मला उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी जपानला जायचं आहे.'' त्याच्या आईने त्याला ठणकावून सांगितलं, ''बास झालं शिक्षण! तू कुठेच जायचं नाहीस. तू आता डॉक्टर झाला आहेस. हे गाव तुझे आहे. इथे तुझ्या सेवेची खूप गरज आहे!'' त्या काळात पालकांनी सांगितलेली आज्ञा मुलं मुकाटपणे ऐकत असत. कर्नाटक राज्यातील त्या 'मालपे' खेड्यात तर सगळीकडे फक्त गरिबीच पसरली होती. गावातील जवळपास सगळ्याच घरांची गुजराण मासोळ्या पकडून व त्याची विक्री करून होत असे.

पुरुषांनी मासोळ्या पकडायच्या, बायकांनी त्या स्वच्छ करायच्या. बाजारात नेऊन विकायच्या. मिळालेल्या पैशांतून आवश्यक वस्तू खरेदी करून घरी यायच्या. घरी आल्यावर उरलेले ते पैसे पुरुष घ्यायचे आणि दारू प्यायला जायचे. घरची कामे आणि मुलांचे संगोपन स्त्रियाच करीत. दररोज बायका आपल्या रुग्ण मुलांना घेऊन येत असत. सर्दी, खोकला, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, मलेरिया, डायरिया, छोट्या जखमा याचेच रुग्ण असायचे. त्यात डॉक्टर म्हणून त्याला कठीण आव्हानदायक किंवा शिकण्यासारखे असे काहीच नव्हते. त्याचे उत्पन्न जेमतेमच होते. तो कंटाळला. आत्मपरीक्षण करताना त्याला लक्षात आले की, आपल्याला सुरुवातीला बाहेरदेशात जाण्याची उत्सुकता होती. कारण तिथली चमकदमक! इथून जावेसे वाटले; कारण इथली घाण, लोकांची गरिबी, अंधश्रद्धा, शिक्षणाचा व सुखसोयींचा अभाव.


**२. परिवर्तनाची सुरुवात :** एका रात्री विचार करताना, अंधारात अचानक वीज चमकून एकदम सगळीकडे प्रकाश पसरावा तसा विचार चमकला. माझा विकास होत नाही आहे. कारण मी जिथे ज्यांच्यामध्ये राहतो त्यांचा विकास झालेला नाही. जर मी यांचा विकास केला तर माझाही विकास होईल. मग आपणच जर या लोकांची ही परिस्थिती बदलली तर? बस ठरलं, ही परिस्थिती बदलायची! तसा मुळातच तो खूप प्रेमळ होता. लोकांचे त्रास पाहून त्याचे मन कळवळले. आता पुढचा प्रश्न होता, या लोकांना कसे शिक्षित करता येईल? यांचे उत्पन्न कसे वाढवता येईल? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी, लोकांच्या परिस्थितीचे, त्यांच्या मानसिकतेचे, उपलब्ध साधने व सोयींचे त्याने सूक्ष्म निरीक्षण केले. त्या आधारावर त्याने आपल्या मुलांना घेऊन येणाऱ्या गरीब स्त्रियांचे वैचारिक परिवर्तन करणे आधी सुरू केले. तुमच्या मुलांना त्याच्या वडिलांसारखेच जीवन पुढे मिळाले तर चालेल का? बायकांची उत्तरे ठरली होती, 'आम्ही काय करणार? आमच्याकडे पैसा नाही. शिक्षण नाही.' मग तो म्हणाला, ''जर तुम्ही मला रोज फक्त २५ पैसे द्याल तर हळूहळू तुमच्या लाडक्या मुलाच्या भविष्यासाठी आपल्याला काही करता येईल. मग ज्या स्त्रिया तयार झाल्या त्यांच्याकडून त्याने एका नोटबुकमध्ये त्या पैशांची नोंद घेणे सुरू केले. मग पुरुष मंडळी मासोळी पकडायला गेले असताना, डॉक्टरांनी रोजच त्यांच्या कम्पाऊंडरला प्रत्येक घरी जाऊन २५ पैसे गोळा करायला पाठवले. नोटबुकमध्ये स्त्रियांच्या सह्या घेऊन, पैसे मिळाल्याची नोंदही तारीखवार ठेवणे सुरू केले. सहा महिन्यात डॉक्टरकडे या बचत मोहिमेतून एक हजार रुपये जमा झाले. १९२० सालच्या काळात ही मोठी रक्कम होती. त्यांनी स्त्रियांना सांगितले की, ''तुम्ही जर तीन वर्षे तुमचे पैसे परत मागितले नाहीत, तर तुम्हाला मी व्याजसुद्धा देईन.'' मग त्यांच्या पुढच्या योजनेनुसार त्याने आयांना सांगणे सुरू केले की, ''तुमच्या मुलाचे पोषण नीट होत नसल्यामुळे त्यांना पुन:पुन्हा आजाराचा त्रास होतोय. तुम्ही त्यांना रोज दूध प्यायला द्या.'' बायकांनी सांगितले, ''आम्ही रोज त्यांना दूध देऊ शकत नाही.'' डॉक्टर म्हणाले, ''तुम्ही गाय पाळा.'' ते ऐकून बायकांना रागच आला. म्हणाल्या, ''आम्ही जिथे दूधच विकत घेऊ शकत नाही तिथे गाय विकत घेण्याचा प्रश्नच येत नाही.'' डॉक्टरांनी सांगितले, ''मी तुम्हाला गाय देतो. तुमच्याच जमा झालेल्या काही पैशातून व वरून काही कर्ज देऊन हे शक्य आहे. कर्जाची परतफेड करण्याकरिता पैसे देण्याची गरज नाही. तुम्ही फक्त घरी वापरून उरलेले दूध रोज आमच्याकडे जमा करा.'' बायकांना आधी विश्वास बसला नाही; पण एक बाई तयार झाली. आता तिच्या मुलाला व घरी वापरायला दूध ठेवून, उरलेले तिने डॉक्टरांना आणून दिले. तिला एकही रुपया जवळचा द्यावा लागला नाही. तिचे समाधान पाहून दुसऱ्या बायका तयार झाल्यात. हळूहळू गावातील सगळ्याच घरी गाय घेतल्या गेली. दुधाचे संकलन वाढल्यामुळे डॉक्टरांनी 'नॉर्थ कॅनरा मिल्क को-ऑपरेटिव्ह संस्था' सुरू केली. (जी गेल्या ९९ वर्षांपासून अजूनही उत्तम कार्य करते आहे.) अगदी याच पद्धतीने विणकर व कुंभारांसाठी को-ऑपरेटिव्ह संस्था उघडल्या. त्याचाही व्याप प्रचंड वाढला. त्यातून पैसा मिळायला लागला. म्हणून मग 'कॅनरा इंडस्ट्रियल अँड बँकिंग सिंडिकेट लिमिटेड' ही बँक तयार झाली. याचेच नाव आपल्याला परिचित असलेले 'सिंडिकेट बँक' असे नंतर ठेवण्यात आले. फक्त रोज २५ पैसे गोळा करणाऱ्या या पिग्मी बँकेच्या ३५५२ शाखांमधून २४ हजार करोड रुपयांची उलाढाल करणारी पूर्णत: ग्रामीण भागातून मोठी झालेली ही एकमेव बँक. बँकांचा पैसा शासनाला वापरायला मिळावा या योजनेतून १९६९ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशातील मोठ्या १२ बँका सरकारी बँक राष्ट्रीयकृत केल्या. त्यात सिंडिकेट बँकेचा समावेश होता. मात्र, २००३ पासून सिंडिकेट बँकेची स्थिती क्रमाक्रमाने खराब होत जाऊन शेवटी आता २०१९ मध्ये ती कॅनरा बँकेत विलीन झाली.

दुग्ध व्यवसायातून कर्ज फेडल्या गेल्यावर गावातील सर्वांचीच आर्थिक परिस्थिती सुधारली. मग डॉक्टरांनी गावातच प्रिंटिंग प्रेस, बेकरी असे अनेक नवीन व्यवसाय सुरू केलेत. रस्ते, बगीचे, शाळा, कॉलेज, स्वच्छता व अनेक सुधारणा केल्या. १९५३ साली सरकारची कुठलीही मदत न घेता भारतात प्रथमच त्यांनी स्वत:च पूर्ण खर्च करून मेडिकल कॉलेज, डेन्टल कॉलेज, फार्मसी, इंजिनीअरिंग व एमबीए कॉलेज अशा शेकडो संस्था तयार केल्यात. या सगळ्या संस्था नीट संचालित करण्यासाठी त्यांनी मणिपाल युनिव्हर्सिटी स्थापन केली. आज या युनिव्हर्सिटीत ६० देशांतील ३५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यात ३००० पेक्षा जास्त शिक्षक, १० हजारांपेक्षा जास्त कर्मचारी काम करतात. कर्नाटकातील उडुपी जिल्ह्यात याचे मुख्यालय आहे. या शिवाय देश-विदेशात त्यांची अनेक महाविद्यालये आहेत. सगळ्यात जास्त संस्था स्थापन करून प्रत्यक्ष चालवणारी व्यक्ती म्हणून 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स' १९९० च्या आवृत्तीत त्यांची नोंद आहे. सर्वात विशेष म्हणजे या सर्व संस्था आधी खेड्यात स्थापन होऊन नंतर त्यांचा जगभर प्रसार झाला; पण त्यांचे मुख्यालय 'मणिपाल' या पूर्णत: ग्रामीण भागात होते. एकदा या डॉक्टरांची एका उदयोन्मुख पण त्यांच्या सारख्याच महत्त्वाकांक्षी व्यक्तीची मुंबईच्या रेल्वे प्रवासात भेट झाली. डॉक्टरांची स्वत:ची बँक आहे हे कळल्यावर, त्यांनी कर्ज मिळेल का म्हणून विचारणा केली आणि डॉक्टरांनी कर्ज दिले. ते फेडून पुन्हा त्या व्यक्तीने आणखी जास्त कर्जाची मागणी केली. याप्रमाणे प्रत्येक वेळी नियमित कर्ज फेडून जास्त कर्ज त्या व्यक्तीने मागितले. तेव्हा तुम्ही कशासाठी एवढे कर्ज घेताय म्हणून डॉक्टरांनी चौकशी केली. तेव्हा कळले की, आधी बाहेरच्या देशातून प्लॅस्टिक विकत होते, पण आता नॉयलॉन यार्न व फिलामेंट इम्पोर्ट करण्यासाठी पैसे हवे होते. सर्व समजून घेतल्यावर डॉक्टरांनी त्यांना सल्ला दिला की, ''एवढ्या मोठ्या प्रमाणात इम्पोर्ट करण्यापेक्षा याची तर भारतातच निर्मिती करता येईल.'' १९७० च्या काळात इंदिरा गांधी पंतप्रधान असताना लायसन्सराज होते. म्हणजे त्यात प्रचंड भ्रष्टाचार होता. त्या कारणाने या व्यापाऱ्याला देशातच निर्मिती करणे शक्य होत नव्हते. तेव्हा डॉक्टरांच्या व प्रणव मुखर्जींच्या मदतीने डॉक्टरांनी त्या व्यापाऱ्याला ते लायसन्स मिळवून दिले. मग त्या माणसाचा व्यापार प्रचंड वाढला. तो व्यापारी म्हणजे रिलायन्सचे मालक धीरूभाई अंबानी! आणि मणिपाल गावाला शहर बनविणारे व एवढे प्रचंड साम्राज्य निर्माण करणारे देशभक्त डॉक्टर म्हणजे डॉ. टी. एम. ए. पै उर्फ डॉ. तोण्से माधव अनंत पै!

धीरूभाई अंबानी हयात होते तोपर्यंत पै कुटुंबातील कुणीतरी त्यांच्या संचालक मंडळावर असायचाच. डॉ. टी. एम. ए. पै यांचा जन्म ३० एप्रिल १८९८ मध्ये तर मृत्यू २९ मे १९७९ साली झाला. त्यांना भारताने पद्मश्री देऊन तर धारवाडच्या कर्नाटक युनिव्हर्सिटीने व विशाखापट्टणम्‌च्या आंध्र युनिव्हर्सिटीने डि.लीट. देऊन त्यांचा गौरव केला. भारतीय पोस्ट खात्याने १९९९ मध्ये त्यांच्यावर पोस्टाचे तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कर्तृत्वाला वंदन केले. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)

### यातून आपण काय शिकायचे?

आपल्या विकासासाठी, आपल्या गावाचा, देशाचा विकास व्हायला हवा. काहीच अशक्य नाही. सूक्ष्म निरीक्षण केल्यास राष्ट्रस्तरावर खालील गोष्टी निदर्शनास येतात. १.आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांचे सहकारी पूर्णशक्तिनिशी देशकार्य करीत आहेत. त्यामुळे पूर्ण जगात आज भारताबद्दल आदर निर्माण होऊन भारतीयांची मान ताठ झाली आहे. केंद्रशासित व्यवहारातील भ्रष्टाचार संपवला आहे. जीएसटी संकलन व इतर व्यवस्थापनातून भारताची आर्थिक स्थिरता व वाढ चांगली आहे. सेन्ट्रल व्हिस्टापासून तर अग्निवीर योजनेपर्यंत चांगली प्रगती होते आहे. २. पण, देशविरोधी शक्ती एक झाल्या आहेत. पूर्णपणे निराधार व देशविरोधी खोट्या बातम्या पसरवून, हातात संविधानाचे पुस्तक नाचवून संविधान बचावचे नारे देत भारताला धोका देत आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत खोटी आश्वासने देऊन त्यांनी काही जागांवर विजय मिळविला. काही नेते राजकीय स्वार्थासाठी परदेशातील घुसखोरांना उघडपणे आमंत्रित करीत आहेत. ३. देशाचे शत्रू एकत्र आले आहेत. त्यांचा सामना करायला आपल्यालाही संघटित झालेच पाहिजे. अगदी आजी–आजोबांचीसुद्धा मदत होणार. अनेकांची त्यासाठी कार्य करायची तत्परता आहे; पण त्यांना नेमके काय व कसे करायचे तेच कळत नाही. त्यासाठी पूर्ण योजना तयार आहे. ४.प्रथम तुमच्या घराजवळील मोठ्या मंदिरात नियमित जाणे सुरू करा. तेथील संचालक मंडळ व तुमच्या वस्तीतील सर्व रहिवाश्यांची व स्वत:ची पूर्ण माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्यक्तीकडे संकलित करा. हे काम घरातील किशोरवयीन मुलांच्या मदतीने करा. त्यांचा त्यातून व्यक्तिमत्त्व विकास होईल. नाव, पत्ता, वय, मोबाईल नंबर धर्म, शिक्षण, मंदिराचे नाव–पत्ता आदी माहिती हवी. गरज वाटल्यास व्हॉटस्‌अॅपवर मेसेज पाठवा.



### अमृताची वाणी । ज्ञानेशाची ।।

बोलताना थोडे । राहू अवधानी ।।
इतरांच्या मनी । द्वेष नको ।।१।।

बोलावे जपून । राखुनीया मान ।।
मोठ्यांचा अवमान । करू नये ।।२।।

नाठाळांच्या ठायी । नाठाळ वागावे ।।
वाया न घालावे । शब्दब्रह्म ।।३।।

संत सज्जनांची । वाचा रूजो मनी ।।
अमृताची वाणी । ज्ञानेशाची ।।४।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०२०१९१७८

### कृष्ण विहीर

तुडवलेल्या पावसाचे मानवी पडसाद हे,
रक्तलांच्छित रंगभूमीवर कधी ना उमटले !
स्वप्नचित्र रेषा कणांनी अंतरंगी बहरले,
पेरलेल्या गारव्याच्या पालवीला हासले!
कृष्ण विहिरीत वेढलेल्या गौरवर्णी सावल्या,
झेप घेता आसरा कवटाळिती दोन्ही करा!
एक अनुभूतीतले ते सत्य दृष्टी देखिले,
शब्दपूर्ती स्पष्ट रेखित संपली अनुमानता!
सजगता नाकारली अन् पुष्पं दाहक वेचले,
पादुका ज्ञानेश्वरांच्या खाचखळगी पूजिल्या!
गंध पुष्पांच्या खुणा मन बाळगीता सावरी,
वादळाच्या वक्रवेगी ओंजळीचा आसरा!
स्वप्नरंजन हे असे या वाळवंटी रंगले.
मार्ग रेखांकित व्हावे आत्मज्ञानी भेटता!

राजीव लोचन


### व्यथांचा पूर

पूर आला हा अवचित स्वागत करावं कोणी?
पुढ्यात ठेवलं मग मी डोळ्यातलं पाणी!
चार घास खाऊन जा, माय म्हणे भोळी
'घरदार देऊन टाक, नको नुस्ती पोळी!'
दोन दिवस राहिला तरी निघं ना बाहेर
युगायुगांनी भेटलं जणू नदीला माहेर!
शेतशिवार गिळलंगिळला गाव सारा
काळच कोपला तर देईल कोण थारा?
बाप कुणाचा गेला गेला कुणाचा पोर
विखारी पावसाचा महिमा अगा थोर!
फिरून येतो सांगून गेला निघुनी दूर
गावाच्या डोळा अता व्यथांचा पूर!

पुंडलिक आंबटकर



# उद्योगांची भारतवारी; मद्याची होम डिलिव्हरी



**अर्थनगरीमध्ये अलिकडे वेगवेगळ्या रंगढंगाच्या लक्षवेधी बातम्या समोर आल्या. त्यातील देशासाठी महत्त्वाची बातमी म्हणजे चीनची अर्थव्यवस्था अडचणीत आल्याने अनेक मोठ्या कंपन्या भारतात येऊ घातल्या आहेत. दरम्यान, देशात कर्जाच्या तुलनेत ठेवींच्या प्रमाणात मोठी वाढ होत असल्याचे आढळून आले. एक धमाकेदार बातमी म्हणजे सहा राज्यांमध्ये मद्याची 'होम डिलिव्हरी' सुरू होण्याची शक्यता आहे.**

अर्थोद्योग
महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीत वेगवेगळ्या रंगढंगाच्या लक्षवेधी बातम्या समोर आल्या. त्यातील देशासाठी महत्त्वाची बातमी म्हणजे चीनची अर्थव्यवस्था अडचणीत आल्याने अनेक मोठ्या कंपन्या भार-तात येऊ घातल्या आहेत. दरम्यान, देशात कर्जाच्या तुलनेत ठेवींच्या प्रमाणात मोठी वाढ होत असल्याचे आढळून आले.

एक धमाकेदार बातमी म्हणजे सहा राज्यांमध्ये मद्याची 'होम डिलिव्हरी' सुरू होण्याची शक्यता आहे. तर, आणखी एक दखलपात्र रोजगारवृत्त म्हणजे फायनान्शिअल प्लॅनिंग सेक्टरमध्ये पुढील काळात १८ लाख नोकऱ्या उपलब्ध असणार आहेत. चीनला जगातील सर्वात मोठी दुसरी अर्थव्यवस्था बनवण्यात मोठा वाटा असलेल्या 'ग्लोबल कंपन्या' आता चीनमधील अस्वस्थ सामाजिक परिस्थितीमुळे भारताकडे वळल्या आहेत. चीनची अर्थव्यवस्था सुस्तावली असून युरोप आणि अमेरिकेसोबत चीनचा तणाव वाढत आहे. त्यामुळे प्रगत राष्ट्रे चीनवरील अवलंबित्व कमी करू इच्छितात. 'ग्लोबल कंपन्या' आपली मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चीनहून भारतात हलवत आहेत. चीनऐवजी इतर देशांमध्ये नवे कारखाने सुरू करत आहेत. भारत ही या कंपन्यांची पहिली पसंती आहे. जपानची वित्तीय कंपनी 'नोमुरा'नुसार चीनमध्ये मॅन्युफॅक्चरिंग बेस असलेल्या १३० जागतिक कंपन्यांपैकी सर्वाधिक २८ कंपन्या आपली उत्पादन युनिट भारतात हलवू इच्छितात. 'ग्लोबल कंपन्यां'च्या पसंतीमध्ये व्हिएतनाम दुसऱ्या तर मेक्सिको तिसऱ्या क्रमांकावर आहे.

२०१९ मध्ये चीनमधून ग्लोबल कंपन्यांचे स्थलांतर सुरू झाले. 'ग्लोबल कंपन्या' भारतात आल्यास निर्यात २०३० पर्यंत वाढून ८३५ डॉलर्स (सुमारे ७० लाख कोटी रुपये) पर्यंत वाढू शकते. ही वार्षिक १० टक्के वाढ आहे. २०२३ मध्ये भारताने ४३१ अब्ज डॉलर्सची (सुमारे ३६ लाख कोटी रुपये) निर्यात केली होती. गेल्या वर्षी 'अमेरिकी चेंबर ऑफ कॉमर्स'ने चीनमध्ये चालवण्यात येणाऱ्या अमेरिकन कंपन्यांची पाहणी केली. त्यात ४० टक्के कंपन्या अमेरिकेतील तणावामुळे इतर देशांमध्ये स्थलांतरित होऊ इच्छितात, असे आढळले होते. त्यांच्यासाठी भारत हा चांगला पर्याय आहे. याचे कारण भारत हा मागणी, खप आणि लोकसंख्येत चीनसारखा आहे. कपाशी, लोखंड, केमिकल्ससारखा कच्चा मालही भारतात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

जगातील सर्वात मोठी रिटेल कंपनी वॉलमार्ट भारतात विस्तार करणार असून २०२७ पर्यंत भारतीय पुरवठादारांबरोबर आपली खरेदी १० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवू पाहात आहे. २०२० मध्ये ती तीन अब्ज डॉलर्स होती. उत्तर अमेरिका व युरोपीय देशांच्या रिटेलर्सनी काही दिवसांपूर्वी उत्तरप्रदेशमध्ये कारखाना सुरू करण्याची शक्यता तपासली होती. उत्तरप्रदेशमध्ये कोट्यवधी अकुशल कामगार आहेत. जर्मन रिटेलर 'टेकपॉइंट'चे कार्यकारी संचालक उली सेरस म्हणाले की, पुरवठ्यासाठी केवळ चीनवर अवलंबून राहणे योग्य नाही. भारताकडे वळावे लागेल. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या अध्यक्षीय काळात चीनच्या निर्यातीवरील दर वाढविला होता. नंतरचे अध्यक्ष जो बायडेन यांनी त्यात वाढ केली. आता कुणीही अध्यक्ष झाले, तरी ही स्थिती कायम असेल.



रोखीच्या तुटवड्याला तोंड देण्यासाठी बँकांच्या ठेवींवर व्याजदर वाढविण्याच्या धोरणाचे परिणाम दिसू लागले आहेत. गेल्या सहा महिन्यांमध्ये ठेवी आणि कर्ज घेण्याच्या ट्रेंडमध्ये मोठा बदल झाला आहे. या सहा महिन्यांमध्ये घेतल्या गेलेल्या एकूण कर्जाच्या तुलनेत बँकांमधील ठेवी सुमारे दीडपटीने वाढल्या आहेत. गेल्या १५ दिवसांमध्ये बँक ठेवींमधील रक्कम बँकांनी वितरित केलेल्या एकूण कर्जापेक्षा अडीच पट अधिक होती. 'केअरएज रेटिंग्स'च्या मते बँकांमध्ये एकूण ३.९ लाख कोटी रुपये जमा झाले. त्या तुलनेत फक्त १.७ लाख कोटी रुपयांचे कर्ज उचलण्यात आले.

गेल्या सहा महिन्यांपासून हा बदल दिसून येत आहे. गेल्या एका वर्षात बँकांकडून एकूण २४.९ लाख कोटी रुपयांची कर्जे घेण्यात आली. बँकांकडून घेतलेल्या कर्जामध्ये वार्षिक १३.८ टक्क्यांची वाढ झाली. गेल्या वर्षी जूनच्या शेवटच्या पंधरवड्यात कर्ज (क्रेडिट) वाढ १६.२ टक्के होती. याचा अर्थ वार्षिक आधारावर २.४ टक्क्यांची घट झाली आहे. वैयक्तिक कर्जासारख्या असुरक्षित कर्जांबाबत रिझर्व्ह बँकेचा कठोरपणा हे याचे सर्वात मोठे कारण आहे. हा ट्रेंड भविष्यातही कायम राहू शकतो. सध्या देशात क्रेडिट टू डिपॉझिट रेशो ८० टक्क्यांच्या उच्च पातळीवर आहे. कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी बँकांना सतत नवीन ठेवींची आवश्यकता असते. हे पाहता सर्व सरकारी बँका १२-१५ महिन्यांच्या ठेवींवर सात टक्के किंवा त्याहून अधिक व्याज देत आहेत. खासगी बँकाही त्याच मार्गावर आहेत. त्यामुळे लोकांचा मुदत ठेवींकडे कल वाढला आहे. रेपो दर दीर्घकाळ ६.५ टक्क्यांवर स्थिर असूनही ठेवी वाढत आहेत.

आता दारू घरपोच मिळणार आहे. मद्य उद्योगाला चालना देण्यासाठी दारूची 'होम डिलिव्हरी' सुरू करण्यात येणार आहे. झोमॅटो, स्विगी आणि बिग बास्केट या प्लॅटफॉर्म्सनीही यासाठीची तयारी सुरू केली आहे. दारूच्या होम




डिलिव्हरीच्या पृष्ठभूमीवर देशातील सहा राज्यांनी प्रोजेक्टवर काम सुरू केले आहे. दरम्यान, हा निर्णय दारू उद्योगासाठी गेमचेंजर ठरण्याची शक्यता आहे. दिल्लीतील लोकांना लवकरच दारूची होम डिलिव्हरी मिळण्याची शक्यता आहे. ही व्यवस्था लवकरच संपूर्ण देशातील दारू उद्योगासाठी गेमचेंजर ठरू शकते. त्यासाठी सहाही राज्यांनी नियोजन सुरू केले आहे. दरम्यान, आर्थिक दृष्टिकोनातून विचार केल्यास विविध राज्यांच्या सरकारसाठी ही एक अनुकूल व्यवस्था आहे. कारण त्यांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा दारूवरील करातून येतो. देशात दूरच्या ठिकाणी पेट्रोल, अन्न, रेशन, औषध, कपडे आणि शूजची होम डिलिव्हरी केली जात असेल, तर दारूचीही होम डिलिव्हरी होऊ शकते. कोविड संपल्यानंतर सुमारे तीन वर्षांनी लोकांच्या या गरजेला ठोस स्वरूप मिळणार आहे. दरम्यान, दिल्लीत लवकरच दारूची होम डिलिव्हरी केली जाणार आहे. प्रथम ते प्रायोगिक तत्त्वावर हे सुरू केले जाईल. दिल्लीव्यतिरिक्त कर्नाटक, हरयाणा, पंजाब, तामिळनाडू, गोवा आणि केरळ या राज्यांनीही यावर पायलट प्रोजेक्ट सुरू करण्याची योजना आहे.

देशातील बेरोजगारीबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. देशातील तरुणांना नोकऱ्या नाहीत, असे लोक म्हणतात; पण कधी कधी असे आकडे समोर येतात, ज्यामुळे लोक आश्चर्यचकित होतात. गेल्या वर्षी आर्थिक क्षेत्रात १८ लाख नोकऱ्या होत्या; परंतु चांगले उमेदवारच मिळाले नाहीत. 'फायनान्शियल प्लॅनिंग स्टँडर्ड्स बोर्डा'चे 'सीईओ' कृष्णा मिश्रा म्हणाले की, वित्तीय सेवा क्षेत्रात रोजगाराची कमतरता नाही; परंतु वेगळी समस्या आहे, नोकऱ्या आहेत; पण त्या घ्यायला कोणी तयार नाही. गेल्या वर्षी वित्तीय सेवांमध्ये ४६.८६ लाख नोकऱ्या निर्माण झाल्या. यापैकी केवळ २७.५ पदे भरता आली असून उर्वरित १८ लाख पदे रिक्त आहेत. तरुणांमधील कौशल्याचा अभाव हे यामागील सर्वात मोठे कारण असल्याचे सांगितले जाते. नोकऱ्या आहेत; पण देशात पात्र लोकांची बरीच कमतरता आहे. ते म्हणाले की, गुजरातमधील गांधीनगर येथे उभारण्यात येत असलेल्या 'गिफ्ट सिटी'मध्ये वित्तीय सेवा क्षेत्रात पुढील पाच वर्षांमध्ये सुमारे १.५ लाख लोकांना रोजगार असेल.

बँका, विमा कंपन्या, ब्रोकरेज हाऊस आणि म्युच्युअल फंड कंपन्यांमध्ये नोकऱ्या नेहमीच उपलब्ध असतात. ऑनलाईन नोकऱ्या शोधत असणाऱ्यांना वित्तीय सेवा क्षेत्रात संधी आहेत. भविष्यकाळात एक लाख प्रमाणित आर्थिक नियोजकांची आवश्यकता असेल. भारतात अद्याप 'पर्सनल फायनान्स' गांभीर्याने घेतले गेलेले नाही. पण भविष्यात प्रत्येकाला याची गरज भासणार आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

**एक किताब तुम्हे चूप कराती है, एक किताब तुम्हे शताब्दीयो तक अंधा बनाती है, किताबे तुम्हारे अंतर्मेधा के समक्ष शक्ती प्रदर्शन है, युद्धाभ्यास है'! हे आखरी कलाम या महत्त्वाच्या ग्रंथामधील टिपण नेमकेपणाने आपल्या जीवनाचा मंत्र म्हणून वापरात घेणाऱ्या लेखक सतीश काळसेकर यांचा जन्म १२ फेब्रुवारी १९४३ रोजी झाला. काळसेकर यांचे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे साहित्य ते नियतकालिकाच्या चळवळीत कवी आणि संपादक म्हणून महत्त्वाचे योगदान होते. वाचणाऱ्याची रोजनिशी या जुलै २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या वाचन चळवळीशी निगडित महत्त्वाच्या ग्रंथाला २०१३ चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.**

# वस्तुनिष्ठ वाचन पाठ म्हणजे 'वाचणाऱ्याची रोजनिशी'

**साहित्य शिक्षण**

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

काळसेकर हे एक चोखंदळ वाचक असल्यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या अनेक पुस्तकांपैकी नेमके कोणते ग्रंथ वाचले पाहिजे. याबाबत त्यांनी हे लिखाण केले होते. साधारणपणे ललित निबंध या साहित्य प्रकारामध्ये पुस्तकाचा कार्यकारण भाव, संक्षिप्ताने महत्त्वाची नोंद आणि प्रसंगी त्यातील उल्लेखनीय वेचे या ग्रंथामध्ये समाविष्ट आहेत. खरे म्हणजे साहित्य अकादमी प्राप्त पुस्तकातील शैक्षणिक संदर्भाबाबत लिखाण करताना औपचारिक अनौपचारिक शिक्षणाचे संदर्भ टिपून त्यातून आजची शिक्षण व्यवस्था किंवा जीवन शिक्षण विषयक घेता येणारे बोध याबाबत मी बोलत असलो तरी वाचन चळवळीशी निगडित, वेगवेगळे ग्रंथ वाचण्यासाठी प्रवृत्त करणारे हे लेखन पानापानावर आणि ओळी ओळीत काही ना काही शिकवणारे आहे हे लक्षात घ्यावे लागेल.

पानापानावरील औपचारिक किंवा अनौपचारिक शैक्षणिक प्रतिसाद याबाबत लिखाण करायचे झाले तर २८८ पानाच्या या पुस्तकावर २८८ पानाचा अभिप्राय द्यावा लागेल. त्यामुळे या ग्रंथातील फक्त शिक्षण व्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या महत्त्वाच्या संदर्भाचा विचार या लेखात करावा, असा मर्यादित स्वरूपाचा विचार मला करावा लागतो आहे. पुस्तक आणि त्याचे वाचन या संदर्भात किंवा पुस्तका विषयीची पुस्तके या अंतर्गत मराठीमध्ये फार कमी लिखाण झालेले आहे त्यातील एक दर्जेदार ग्रंथ म्हणजे वाचणारर्याची रोजनिशी हा होय.

सतीश काळसेकर यांच्या वाचनाची सुरुवात वयाच्या नवव्या दहाव्या वर्षी गावातल्या ग्रामपंचायतीच्या मोफत वाचनालयात झाला. आठवीचे एक वर्ष परळीच्या सोशल सर्विस लीगच्या रात्र शाळेमध्ये काढताना दिवसभर वेळ असायचा त्या वेळात दिवसाला दोन दोन तीन रहस्य कथा वाचून व्हायच्या, मग पुढे हायस्कूलच्या पातळीवर मोठे वाचनालय उपलब्ध झाले आणि त्यांचे वाचन वाढले. त्यांची आई त्यांच्या या अवांतर वाचनावर चिडायची मात्र या अवांतर वाचनाचा एक समृद्ध व्यक्ती म्हणून आणि एक समर्थ लेखक म्हणून उभे राहण्यासाठी त्यांना फायदा झाला. शाळेत असल्यापासून हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात राजन गवस यांची कादंबरी वाचणारे सतीश काळसेकर बस आणि रेल्वेच्या प्रवासात, पायपिटीच्या प्रवासात जसं जमेल तसे वाचत होते.

प्राथमिक शाळेत आणि नंतर महाविद्यालयाचे शिक्षणात गुंतलेले असताना त्यांचे वाचनाचे व्यसन अमलात होतेच. एकदा शाळेत असताना गावच्या मोठ्या घरातल्या माळ्यावरची एक लाकडी पेटी उघडली असता वीरधवल ही कादंबरी सापडली सोबतच वडिलांच्या अक्षरात काही लेखन होते याचा अर्थ वाचनाचे हे भेट त्यांच्या घरात पूर्वीपासून चालत आलेले होते. अर्ध्या किमतीत विकत घेतलेली पाठ्यपुस्तके मिळवून शिक्षण घेतलेले काळसेकर आठवीपासून ते शिक्षण उपलब्ध नसल्याने परळला आले. सतीश काळसेकर जेव्हा १९६४ मध्ये एस.एस.सी मध्ये उत्तीर्ण झाले तेव्हा इंग्रजीमध्ये त्यांना ३५ मार्क होते, पुढे कॉलेजच्या दिवसातही इंग्रजी फारसे सुधारले नाही. पण त्यानंतर मित्र बदलले, वाचणाऱ्या मित्रांचा गोतावळा आला त्या मित्रांच्या चर्चेचा विषय इंग्रजी साहित्य असायचा त्यामुळे इंग्रजी वाचनाची आणि शिक्षणाची निकड लेखकाच्या मनात निर्माण झाले आणि अनेक इंग्रजी साहित्यावर ते प्रभावीपणे बोलू लागले. या प्रसंगातून तुमचा भोवताल आणि मित्रपरिवार कसा आहे? त्यानुसार सुद्धा तुमचे शिक्षण होत असते असे लेखक




सुचवतात. उर्मिला पवार यांच्या आत्मकथनाचा संदर्भ देताना एके ठिकाणी, आयुष्याने अशा तर्हेने अनेक गोष्टी दाखवल्या शिकवल्या आणि रक्त फुटेपर्यंत सपकारेही मारले हे वाक्य लेखक अधोरेखित करतात तेव्हा त्यातून आयुष्याकडून आपण जे जे शिकतो, अनुभवतो त्या बाबींचा विचार करता आयुष्य हे आपले एक गुरु आहे अशा आशयाची अभिव्यक्ती एकाच वेळी लेखकाकडून आणि वाचकाकडून व्यक्त होत असते हे आपल्याला जाणवते. सदानंद देशमुख आणि रमेश इंगळे उत्रादकर यांच्या बरोमास आणि निशाणी डावा अंगठा या कादंबर्या बद्दल बोलताना सदानंद देशमुख प्राध्यापक तर रमेश इंगळे प्राथमिक शिक्षक असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमधील शैक्षणिक पार्श्वभूमी अधिक गडदपणे समोर आल्याचे दिसते. निशाणी डावा अंगठामध्ये शिक्षण व्यवस्थेचे तीन तेरा कसे वाजले आहेत ते अधिक प्रभावीपणे आल्याचेही लेखकाच्या निवेदनातून दिसून येते. गार्सिया मार्केझ यांच्या कादंबरीत हालाखीची परिस्थिती आणि शिक्षणाचे तीन तेरा असे संदर्भ सुद्धा लेखकाची शिक्षण विषयक अभिव्यक्ती प्रकट करणारी असते. मुंबई विद्यापीठाच्या राजाबाई टॉवर्सित ग्रंथालयाला दीडशे वर्ष होत आहेत ही बाब सुद्धा लेखकाच्या मनातील शिक्षण आणि ग्रंथालय चळवळ यांचा परस्पर संबंध सांगण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्यक्तीच्या मनातील दखल आहे असे दिसून येते.

कबीराचे दोहे, तुकारामाचे अभंग, सूफी संतांच्या रचना, ज्ञानेश्वरांचे पसायदान, मिरची भजने ऐकताना अडाणी माणसंही स्वतःला ओलांडून स्वतःच्या पलीकडे जाताना दिसतात. या अतिशय महत्त्वाच्या वाक्यातून साक्षरता आणि निरक्षरता याच्या पलीकडे जाऊन जे साहित्य काळाच्या पटलावर टिकते ते अस्सल साहित्य होय असे लेखक म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सांगत असताना लेखक म्हणतात, आई-वडिलांना शिक्षण नाही, अठरा विश्व दारिद्र्य आहे अशावेळी हे साफ करणे हे तुमचे कर्तव्य आहे. स्वतः सुधारल्याशिवाय इतरांना तुम्ही काय शिकवणार? यातून अत्यंत महत्त्वाचे उद्धवतात बाबासाहेबांच्या विचाराचा धागा धरून लेखकाने केलेले आहे. वाचणार्याची रोजनिशी या ग्रंथात लेखकाने जी अनेक ग्रंथ वाचकांना वाचण्यासाठी सुचवले आहे त्यात, 'माझं शिकणं आणि शिकवण' ह्या प्रवीण पाटकर यांच्या ग्रंथाचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केलेला आहे. यावरून शिक्षणाच्या संदर्भात लेखकाची उत्सुकता दिसून येते. रमेश इंगळे निशाणी डावा अंगठा या कादंबरीत साक्षरता अभियानाचे धिंडवडे निघत असताना बौद्ध वाड्यावर बौद्ध वाड्यावरची एक जिद्दी शिक्षिका ती मोहीम यशस्वी करते ही अतिशय सकारात्मक बाब असतील तरी या प्रकरणावर अनेकांनी आक्षेप घेतले त्या संदर्भात लेखकाने म्हणजे रमेश इंगळे यांनी त्याच्या असेल त्याची खात्री लोकांना पटवून दिली, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा कोणत्या वास्तवात विस्तारत चालला आहे आणि या सकारात्मक विचाराला जाणीवपूर्वक आक्षेप घेणारे किती लोक आहेत याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे. अशा अनेक बाबी वेगवेगळ्या प्रसंगावर आणि पुस्तकावर भाष्य करत असताना काळसेकर यांनी दिले आहे.

प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांच्या ग्रंथात शिक्षण क्षेत्रातल्या अध:पतनावर भाष्य करताना लेखकाने शिक्षणाच्या दुरावस्थेबद्दल चिंतन केलले आहे. शिक्षणाबद्दल भाष्य करत असताना एके ठिकाणी प्रा. सुभाषराव आणि एक हमाल यांच्या प्रसंगातून हमालाचा स्वाभिमान आणि प्रा. सुभाष रावांचा मिथ्या अभिमान यावर सूचक भाष्य करत बुद्धीचे काम आणि शारीरिक काम यात भेदाभेद करणे अयोग्य असल्याचे लेखक याच ग्रंथात सुचवतात. गरिबीमुळे बुद्धिमत्ता असूनही आज हजारो खेड्यात आणि शहरात शेकडो आईन्स्टाईन गृह हाकत आहेत आणि हॉटेलमध्ये कपबशा आहेत.

जगाच्या पाठीवर तीस-पस्तीस टक्के लोकांना जेवायलाच मिळत नाही, अशावेळी आपल्याकडचे अनेक सुशिक्षित अडाणी लोक संस्कृतीच्या आणि देवाच्या नावाखाली उपाशी राहतात सुद्धा सतीश काळसेकर यांनी लक्ष वेधले आहे. लाखो रुपयांची दान दक्षिणा दरवर्षी सअंस्कृत ब्राह्मणांना वाटणारे पेशवे सांडणीस्वार पाठवून उत्तरेतून पिलाजी जाधव या ग्रंथप्रेमी सरदाराकडून मोठ्या वाचण्यासाठी मागवत असे पत्र उपलब्ध आहेत. त्या काळात कागद इतका महाग होता की, १७६७ मध्ये योगवशिष्ठ हा ग्रंथ ४०० रुपयाला मिळेल असे तरी लाखो रुपये रमण्यांवर आणि दक्षिणेत वाटणाऱ्या पेशव्यांना स्वतःचे समृद्ध ग्रंथालय असावे असे कधीही वाटले नाही त्यापेक्षा पदरी फुकटात दिवस काढणारे सांडणीस्वार पाठवून फुकट वाचण्यापूर्ती प्रत मिळवणे ही त्यांची प्रवृत्ती आजही महाराष्ट्रातील सुशिक्षित समाजामध्ये दिसून येते. ही वाचन संस्कृतीच्या दृष्टीने अतिशय विचार करायला लावणारी बाब लेखकाने शब्दांकित केली आहे.

बोली भाषेचे शिक्षणात असलेले महत्त्व सांगणार्या हरिश्चंद्र बोरकर यांच्या एका भाषणाचा संदर्भ देत मराठी भाषेचा भूगोल विस्तीर्ण असल्याने बोली समजून घेणे गरजेचे आहे अशा वाक्यात लेखक बोली भाषेचे महत्व समजून सांगतात. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या नव्याने उपलब्ध झालेल्या संधी. सणाच्या साहित्य निर्मिती **(पान ६ वर)**

**पान १ वरून**

## २१ वे शतक भारताचेच!

तंत्रज्ञान आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा लाभ भारताला ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत प्रवृत्त करू शकतो. ३० ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करण्यासाठी भारताने उत्पादन, सेवाक्षेत्र, कृषिक्षेत्र यांचा विशेषत्वाने विस्तार केला पाहिजे. मध्यम उत्पन्नातून उच्च उत्पन्न पातळीपर्यंत जाण्यासाठी २० ते ३० वर्षे सात ते दहा टक्क्यांच्या दरम्यान सातत्यपूर्ण विकासदर आवश्यक आहे. जागतिक बँकेने उच्च उत्पन्न असलेल्या देशांची व्याख्या अशी केली आहे की, ज्यांचे वार्षिक दरडोई उत्पन्न १४ हजार, ५ अमेरिकन डॉलर्स (२०२३ साली) पेक्षा जास्त आहे. २०४७ साली स्वातंत्र्याच्या शतकपूर्तीपर्यंत भारतात उच्च उत्पन्न असलेला देश बनण्याची क्षमता आहे, हे नक्कीच. भारत नवा इतिहास लिहिण्याच्या एका वळणावर असून २१वे शतक हे निर्विवादपणे भारताचे शतक आहे.

## कमला हॅरिस जिंकू शकतील का?

मिनिसोटा राज्य आणि तेथील मिनियापोलिस शहरात डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता असूनही कृष्णवर्णीयांविरुद्ध होणाऱ्या अन्यायासाठी डोनाल्ड ट्रम्प यांना जबाबदार धरण्यात आले. त्यामुळे डेमोक्रॅटिक पक्षाला उपाध्यक्षपदासाठी कृष्णवर्णीय उमेदवार देण्याची गरज वाटू लागली. कमला हॅरिस यांनी अध्यक्षपदाचे उमेदवार जो बायडन यांच्यावर वंशवादात सहभागी असल्याचे आरोप करून त्यांचा रोष ओढवून घेतला होता. पण, डेमोक्रॅटिक पक्षात अन्य कोणी कृष्णवर्णीय नेता समोर नसल्याने कमला यांची निवड करण्यात आली. तिथेही कमला हॅरिस यांचा प्रभाव यथातथाच राहिला असला, तरी जो बायडन यांचा विजय झाल्याने कमला हॅरिस पहिल्या महिला उपाध्यक्ष झाल्या. त्या राष्ट्राध्यक्ष झाल्या, तर अमेरिकेच्या इतिहासातील पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष तसेच पहिल्या भारतीय तसेच आफ्रिकन वंशाच्या राष्ट्राध्यक्ष बनतील. जो बायडन यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या काळात कमला हॅरिस यांची लोकप्रियताही बायडन यांच्याप्रमाणेच राहिली. 'कोविड १९'चे संकट हाताळण्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्याएवढेच अपयश बायडन यांनाही आले. या काळात त्यांच्या पर्यावरणवादी भूमिकेमुळे तेलाच्या किमती भरमसाठ वाढल्या आणि सामान्य अमेरिकन लोकांना त्याचे चटके सहन करावे लागले. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर दहशतवादी हल्ला करून सुमारे १ हजार, २०० लोकांना मारले. हमासचा कायमचा नायनाट करण्यासाठी इस्रायलने सुरू केलेल्या कारवाईत आजवर ३९ हजार लोक मारले गेले आहेत. जो बायडन या युद्धात इस्रायलच्या पाठी ठामपणे उभे राहिल्याने अमेरिकेतील मुस्लीम तसेच डाव्या विचारसरणीच्या मतदारांचा भ्रमनिरास झाला. तसेच, रिपब्लिकन पक्षाने नेमलेल्या न्यायाधीशांच्या मदतीने अमेरिकेतील सर्वोच्चन्यायालयात गर्भपाताबद्दलचा ऐतिहासिक कायदा उलटवला गेला. त्यातूनच २०२४ सालच्या निवडणुकीत बायडन यांचा पराभव होणार, असे चित्र निर्माण झाले. कमला हॅरिस यांची पाटी कोरी नसली, तरी गाझा युद्ध, गर्भपात आणि विद्यार्थ्यांच्या मुद्द्यावर वेगळी भूमिका घेऊन त्या डेमोक्रॅटिक पक्षातल्या डाव्या मतदारांना साद घालत आहेत. त्यासोबतच, आपली कृष्णवर्णीय अशी प्रतिमा वापरून सामाजिक न्यायाचा मुद्दा पुढे करण्याचा प्रयत्न करत आहेत. अजूनही त्यांच्या विजयाची शक्यता विरळ असली, तरी त्यांच्यामुळे अमेरिकेच्या अध्यक्षीय लढतीमध्ये चुरस निर्माण झाली आहे.

## हर्षदायी श्रावण!

मग महादेवाचं दर्शन घ्यायची गडबड. त्यावेळी दर्शनापेक्षा बाहेरच्या छोटेखानी जत्रेचंच अप्रुप जास्त असायचं. पिंडीवर बेल वाहिला की सात वाजता उपास सोडायला मोकळं! त्यात आजीच्या तोंडून वाटीभर दुधाची कथा ऐकायला मिळायची. भारी मजा वाटायची तेव्हा! श्रावणाच्या अशा अनेक आठवणी अनेकांच्या अंत:करणात कायमच्या कोरल्या गेल्या असतील. किती नाचरा आहे हा श्रावण. हास्यविनोदात रमत फुगड्या घालतात, गोफ विणतात, 'खुर्ची का मि र्ची' म्हणत एकमेकींना छेडतात. पिंगा घालतात, घागरी फुंकतात आणि सूपही नाचवतात. आता नव्या जमान्यातल्या तरुणीही मंगळागौरीचे खेळ खेळत असल्याचं पाहून कौतुक वाटतं. या खेळातून आपसूक घडणारे व्यायाम सुदृढ आरोग्यासाठी महत्त्वाचे ठरतात, असं दिसून आलं आहे. श्रावणातल्या शुक्रवारी लेकुरवाळ्या स्त्रीला सन्मानाने जेवायला घालायची प्रथा आहे. या दिवशी संध्याकाळी पंचक्रोशीतल्या सवाष्णींना हळदी-कुंकवाला बोलावून दूध, फुटाण्याचा प्रसाद द्यायचा. उगवत्या सूर्याला अर्घ्य देत आदित्य राणूबाईची पूजा करायची आणि नंतर कथा वाचायची. असाच आनंद नारळी पौर्णिमा, नागपंचमी, रक्षाबंधन, गोपाळकाला यासारख्या सणांमधूनही मि ळवायचा. म्हणूनच श्रावण कधी सुरू होतो आणि मुठीतल्या रेतीसारखा कधी सरतो हे समजतही नाही. संपूर्ण भारतभर श्रावणम ासाचं भारी कौतुक. श्रावण हा श्रवणाचा महिना. या दिवसात मंदिरातून भजन-कीर्तनाचे कार्यक्रम रंगतात. पांडवप्रताप, शिवलीलामृत, नवनाथ भक्तिसार, काशीखंड आदी ग्रंथांचं पठण होतं. श्रावणात उत्तर भारतात झुले पडतात. तीजेला तीजमातेची पूजा करून मुली झोपाळ्यावर झुलतात. मध्य प्रदेशमध्ये हरियाली तीज साजरी होते. या तीजेला बायका गुंजा खेळतात. झोके झुलतात. त्याला सिंजारा म्हणतात. बिहारमध्ये श्रावणाचं नाव मोठं मोहक आहे. तिथे या मासाला मधुश्रावणी म्हणतात. श्रावणात बंगालमध्ये शिवाभिषेकाचं मोठं महत्त्व आहे. लोक पिंडीवर कावडींनी अभिषेक करतात. या कावडी आणणाऱ्यांची मोठी व्यवस्था पाहायला मिळते. आंध्रात श्रावणातला दुसरा शुक्रवार अतिशय महत्त्वाचा. तिकडे या दिवशी सार्वजनिक सुट्टी असते. घरात वरदलक्ष्मीचं व्रत घेतलं जातं. तामिळनाडूमध्ये या दिवसात कामाक्षीदेवी माहेरवाशीण म्हणून घरी येते अशी भावना आहे. तिचं जोरदार स्वागत होतं. श्रावणात इथे एका शुक्रवारी हळदीने, दुसऱ्या शुक्रवारी कुंकवाने, तिसऱ्या शुक्रवारी फुलांनी आणि चौथ्या शुक्रवारी फळांनी पूजा सजवतात. ही सारी महती लक्षात घेतली तर श्रावणाचं अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट होतं. श्रावण हा मुख्यत्वे माहेरवाशिणींचा सखा असतो. या काळातलं धुंद वातावरण आणि निसर्गाच्या रूपाने अनेक लेखक, कवींना मोहिनी घातली आहे. अनेक लेखक, कवींच्या लेखणीतून श्रावणातलं सौंदर्य उलगडत गेलं. ते वाचताना, ऐकताना श्रोत्यांनाही या मनमोहक जगताची सैर घडते.



# दीपज्योती



**शुभंकरोती कल्याणम् आरोग्य धनसंपदा।**
**शत्रुबुद्धी विनाशाय दीपज्योती नमोस्तुते ।।**

हा श्लोक देवासमोर हात जोडून आपण म्हणतो. हा श्लोक म्हणजे प्रार्थना आहे. ईश्वरा सगळ्यांचे मंगल होऊ दे. सगळ्यांना आरोग्य-धनसंपदा लाभू देल असा या प्रार्थनेचा अर्थ आहे. या प्रार्थनेतल्या शेवटच्या दोन ओळी महत्त्वाच्या आहेत. देवापुढे लावलेला दिव्याचा उजेड अंधाराचा, आपल्या मनातल्या शत्रुबुद्धीचा म्हणजेच वाईट विचारांचा नाश करू दे. प्रत्येकाच्या मनात सद्भावनेचा दीप प्रज्वलित होऊ दे, असा याचा अर्थ.

एक दीप उजळला की, आजूबाजूचा अंधार दूर होतो. दिव्याचं काम आहे अंधार दूर सारणे. देवापुढे लावलेले निरांजन, तुळशीवृंदावनात लावलेली पणती, घरभर उजळलेले दिवे या सगळ्या दिव्यांनी घरातला, अंगणातला अंधार दूर होतो. विचार करा, प्रकाश नसता तर काय झाले असते? सगळीकडे अंधाराचे साम्राज्य पसरले असते. 'बृहदारण्योकोपिनषदा'तील पुढील श्लोक प्रकाशाचे महत्त्व सांगतो असतो- '**मा सद्गमय तमसो मा ज्योर्तिगमय।**' हे ईश्वरा! आम्हाला असत्कडून सत्कडे घेऊन जा. आम्हाला अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जा. या ठिकाणी अंधार म्हणजे अज्ञान; जिथे अज्ञानाचा अंधकार आहे, तिथे ज्ञानाचा दिवा उजळू दे. जिथे अंधार आहे तिथे एक पणती लावली तरी ती अंधाराला दूर सारते. जिथे अज्ञान आहे तिथे ज्ञानाचा दीप लावायचा म्हणजे दुसऱ्याला ज्ञान द्यायचं. एक दिवा कष्टाचा लावायचा, एक दिवा प्रयत्नांचा लावायचा, एक दिवा सहृदयेचा लावायचा. आयुष्यात कष्ट प्रयत्न आणि सहृदयता या तीन गुणांचा अवलंब केला तर आपलं आयुष्य उजळून निघतं. दिवा आपल्या सगळ्यांसाठी महत्त्वाचा आहेल पण तो दिवा कसा असावा? त्यात तेल-वात असेल तरच तो महत्त्वाचा आहे.

दिवा केवळ घरातला, घराबाहेरचाच अंधार दूर करतो असं नाही. माणसाच्या मनात आशेचा दिवा उजळला तर निराशेचा अंधार दूर होतो. ज्ञानाचा दिवा अज्ञानाचा अंधकार दूर सारतो. दिवा त्याचं अंधार दूर करण्याचं काम प्रामाणिकपणे करत असतो. मातीच्या पणत्या असो की सोन्या-चांदीच्या समया किंवा निरांजन असो; दिव्याचं काम प्रकाश देणे आहे. आपल्या संस्कृतीत दिव्याला अतिशय महत्त्व आहे. कार्याची सुरुवात देवापुढे दिवा उजळून करतात. संमेलनांमध्ये दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात होते. दिवाळीत सगळीकडे दिव्यांची रोषणाई केली जाते. दीपावली-दिवाळीचा अर्थ दिव्यांच्या ओळी! अनेक दिवे उजळून लक्ष्मीचे स्वागत केले जाते. दिवाळीत आकाशकंदील लावतात. आकाशकंदिलाने बाहेरचा अंधार दूर होतो. दिवसा दिवे लावण्याचे काही प्रयोजन नसते. आकाशात तेजोभास्कर तळपत असतो.

सूर्य मावळल्यानंतर अंधार पडला की, दिव्याची गरज भासते. अंधारात आपल्याला सहज वावरता येतं. आपली कामं करता येतात ती दिव्यांच्या प्रकाशामुळे. 'अत्त दीप भव स्वयं दीप भव।' तू तुझा दीप हो म्हणजेच भवतालातील अंधार दूर व्हावा. मनामनातील अंधकार नाहीसा व्हावा यासाठी आपण दीप व्हायचं. आपण स्वयंप्रकाशी व्हायचं. एखादा आत्मरूप बघायला आत्मप्रकाश उजळायला हवा. दुसऱ्याच्या दृष्टीने स्वत:कडे पाहताना कधी आपल्या दृष्टीने एकदा स्वत:ला न्याहाळावे. आपल्या संतांनी लावलेले ज्ञानदीप आपल्या अंतरात उजळू दे. त्याच्या प्रकाशात अंतरंग लख्ख उजळून निघावे. जेव्हा घराघरांत विजेचे दिवे लागले नव्हते.

घरोघरी वीज पोहोचली नव्हती तेव्हा कंदील-चिमण्या प्रकाश देण्याचं काम करायच्या. त्याच्या मिण मिण उजेडात सगळे व्यवहार चालायचे. रोज संध्याकाळी कंदील-चिमण्यांच्या काचा; त्या काचांना 'पायली' म्हणत; त्या रांगोळीने स्वच्छ करणे. कंदिलात- चिमण्यांमध्ये रॉकेल भरणे हे महत्त्वाचे काम असायचे. विजेचं आगमन झालं. घरीदारी सगळीकडे वीजबाई लखलखायला लागली. विजेची मंद तेवणारी ज्योत असो की लखलखणारी विजेच्या माळा; कवितांमध्ये त्यांचा समावेश झालेला दिसतो. शिक्षणासाठी आपल्या गावाकडच्या घरापासून आपल्या माणसांपासून दूर शहरात गेलेल्या मुलांना विजेच्या झगमगाटाने उजळलेले शहर पाहताना आपल्या गावाकडची माजघरातली मंद दिव्याची ज्योत आठवते.

कुसुमाग्रजांच्या शब्दात सांगायचं तरनवलाख तळपती दीप विजेचे जेथ उतरली तारकादळे जणू नगरात परि स्मरते आणिक करते व्याकूळ केव्हा त्या माजघरातील मंद दिव्याची वात... गावाकडची त्या घरातली मी मंद दिव्याची वात त्याला आठवत राहते. शहरात दिव्यांचा झगमगाट आहे. जगणे तिथली, समृद्धीतही मन रमत नाही, मनात माजघरातली मंद दिव्याची वात आणि वातीप्रमाणे शांत माणसं आठवतं. नोकरीचाकरीच्या मागे गाव सोडून गेलेली तरुणाई गावातल्या जुनाट घरात राहिलेले वयानं थकलेले वृद्ध राहतात. संध्याकाळी दिवेलागणी झाल्यावर घरातली वृद्ध पुरुष झोपाळ्यावर कातर स्वरात म्हटलेले अभंग आठवतात. माजघरातला दिव्याच्या मंद उजेडात वावरणारी आई-आजी; तिच्या हातातील कंकणाची किणकिण आठवते. हाच दिवा औक्षणाच्या तबकात असतो तेव्हा त्याच्या ज्योतीभोवतीची मंगलाची आशीर्वचने सोबत असतात.

देवापुढे तेवणारं निरांजन समई, मंगलकार्यात लावला गेलेला करा दिवा, दिवाळीतल्या तेवणाऱ्या पणत्या; आकार वेगळे प्रसंग वेगळे, प्रकाशाची जातकुळी एकच नक्षी रेखत आलेली प्रकाशकिरणं मना उजळून टाकतात. वरातीत पेट्रोमॅक्सच्या बत्त्या डोक्यावर घेऊन जाणाऱ्या स्त्रिया प्रकाशाची झगमग पेरत जातात. डोक्यावर उजेडाची लखलखती झाड घेऊन चालणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्यात मात्र अंधाराचेच गाणे वाजत असते. एखाद्या खुराड्यात संसार करणाऱ्या दारूड्या ऐतखाऊ नवऱ्याचा मार खाणाऱ्या तरी जिद्दीनं आयुष्याला समोर जाणाऱ्या या स्त्रिया जगण्याला सरावलेल्या असतात. काहींच्या अंगणात कायम उजेडाची झाड बहरलेली असतात. सदा सकारात्मक विचार करणारे समोर आलेलं जगणं आनंदानं स्वीकारणारे; ही आनंदाची प्रकाशाची झाड असतात.

ज्योती पुजारी

संत रामदासस्वामींना अनेकवेळा प्रत्यक्ष रामदर्शन व साक्षात्कार झाले, हे आपण त्यांच्याच साहित्यातून उत्कटपणे पाहू शकतो. राम साक्षात्कारानंतर सारे जग त्यांना राममय दिसू लागले. 'दाही दिशा रामची दिसे' अशी त्यांची अवस्था झाली. दृश्य, द्रष्टा आणि दर्शन रामरूप झाले. त्यामुळे ते भक्त न राहता रामरूपच झाले, समर्थ झाले. गुरू-शिष्य, भक्त-देव यांच्या ऐक्यरूपाचे विलोभनीय दर्शन आपणास त्यांच्या 'पंचसमासी'तून घडते.

लेखांक ३१

# संत रामदासस्वामींचा रघुवीर समर्थ

(भाग दुसरा)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



**रामायणाचा प्रभाव:-**

टाकळी येथे समर्थ रामदासस्वामींनी १२ वर्षे वास्तव्य केले. या काळात संपूर्ण वाल्मिकी रामायण त्यांनी लिहून काढण्याचे तप केले. आपणास धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिरात समर्थांच्या हस्ताक्षरातील शंकरराव उर्फ नानासाहेब देवांनी परिश्रमपूर्वक मिळवलेले व जपलेले संपूर्ण रामायण पाहावयास मिळते. (कै.देव म्हणतात, महाराष्ट्राचे केव्हढे भाग्य की, श्री समर्थांनी लिहिलेली ९१० पत्रसंख्येची वाल्मिकीय रामायणाची संपूर्ण प्रत उपलब्ध व्हावी.)

समर्थभक्त श्री देव यांना मिळालेल्या सात कांडापैकी आदिकांड, आरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड आणि युद्धकांड ही पाच कांडे प्रतीलिपी समर्थांनी माघ शके १५४४ ते वैशाख शके १५४६ या सव्वा वर्षात लिहिलेली आहेत आणि हा काळ म्हणजे समर्थांच्या टाकळी येथील १२ वर्षांच्या पुरश्चरणाचा काळ होता. याचा अर्थ टाकळी येथील तप काळातच समर्थांनी ही पाच कांडे लिहिली होती. उर्वरित २ कांडे, उत्तरकांड व अयोध्याकांड यांचा लेखनकाळ अनुक्रमे कार्तिक शके १५६७ आणि शके १५७१ असा आहे, हा काळ समर्थांचा मसूर, शहापूर या भागातील वास्तव्याचा आहे. यावरून समर्थांनी टाकळीच्या पुरश्चरण काळात वाल्मिकी रामायणाच्या पाच कांडांचे लेखन केले हे सिद्ध होते. या रामायण प्रतिलेखनाचा समर्थांवर जो विलक्षक प्रभाव पडला, तो पुढे त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यावर दिसून येतो.

प्रभू रामचंद्र म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम. भगवद्गीतेत वर्णन केलेल्या दैवी गुणसंपदेचा मूर्तीमंत आदर्श. प्रभू रामचंद्रांचे धैर्य, तेजस्विता, बुद्धिवैभव, धर्मज्ञता, नीतीनिष्ठा, ज्ञानसंपन्नता, औदार्य, कर्म कुशलता, प्रजाहितनिष्ठा, सामर्थ्यशील सत्यवचनी बाणा, कृतज्ञता या दिव्यगुणांनी समर्थांचे मन अत्यंत प्रभावित झालेले होते. रामदासांच्या मूळच्या बालसुलभ संस्कारी भक्तीला आता रामायण वाचनाने व रामनामाच्या जपाने ज्ञानोत्तर भक्तीची परिपक्वता लाभली होती. रामाविषयीचा अनन्यभाव अधिक परिणत झाला होता. श्रीराम हे समर्थांचे केवळ इष्ट दैवतच नव्हे तर श्रीराम हेच त्यांचे सद्गुरू होते. वयाच्या ८ व्या वर्षीच समर्थांना श्रीरामाचे दर्शन होऊन अनुग्रह लाभला होता. (संदर्भः समर्थ सेवा मंडळ प्रकाशित दासबोध २००९ पारायणप्रत मधील श्री समर्थांच्या जीवनातील ठळक घटना) आठव्या वर्षी लाभलेल्या अनुग्रहानंतर छोटा नारायण, नारायण न राहता त्याचक्षणी 'रामदास' झालेला होता. त्याला त्याची वाट रामकृपेने स्पष्ट आकळली होती. 'आदित्ये अंधकार निवारे' असे छोट्या नारायणाचे जीवन दिव्य प्रकाशाने उजळून गेले होते. '**राम माझा जीव प्राण। काही नेणे मी रामावीण।**'अशी त्यांची भावावस्था झालेली होती. तपाचरणाने, पुरश्चरणाने त्यांच्या या मूळच्या भावावस्थेला नवी झळाळी लाभली होती. या काळातील उपासनेचा स्वानुभव त्यांनी पुढे दासबोधात व अन्य अभंगादी साहित्यात विशद केलेला आहे. उपासनेबद्दल समर्थ म्हणतात-

**राम उपासना ऐसी। ब्रह्मांडव्यापिनी पाहा।**
**राम कर्ता राम भोक्ता। रामरूप वसुंधरा।।**

(मानपंचक)

'उपासनेचा आश्रयो मोठा' म्हणत त्यांनी रामोपासनेला सर्वोच्च प्राधान्य दिले.

**नवविधभक्ती याचकारणे।**
**जे आपण स्वये रामचि होणे।**
**स्वयेचि रामपणे ठाकणे। स्वानुभवे करोनी।।**

उपासनेमध्ये नवविधभक्तीला ते सर्वोच्च स्थान देतात व या भक्ती योगे स्वये राम होणे आणि रामासारखेच सर्व प्रसंगी धीरोदात्तपणे उभे ठाकणे समर्थांनी समाजाला उपदेशिले आहे.

**अनेक वेळा रामदर्शन:-**

समर्थांना केवळ एकदाच नव्हे तर अनेक वेळा सद्गुरू श्रीरामाचा साक्षात्कार झालेला आहे असे डॉ.म.रा.जोशी (समग्र समर्थ साहित्यः प्रस्तावना) म्हणतात. समर्थांनी लिहिलेल्या 'पाचसमासी' मध्ये '**ऐशा जी सद्गुरुरामा। अगाध तुमचा महिमा।**' असा सद्गुरू श्रीरामाचा महिमा वर्णन केलेला आहे. 'दासबोध', 'आत्माराम' प्रमाणे समर्थांची १५१ ओव्यांची 'पंचसमासी' एक प्रमुख रचना आहे. या पंचसमासीचे वैशिष्ट्य म्हणजे या ओव्यातून श्रीराम साक्षात्कारानंतरची स्थिती समर्थांनी व्यक्त केलेली आहे.

**वृत्ति मूळाकडे पाहे। तव रामचि दिसताहे।**
**स्तब्ध होवोनिया राहे। तवं रामचि दिसे।।**
**मन मुरडलिया वाटे। तव मार्गी राम भेटे।**
**मागे पुढे प्रगट। रामचि अवघा।।**
**दाहि दिशा अवलोकिता। रामचि भासे तत्त्वता।**
**वदन चुकवू जाता। सन्मुख श्रीराम।।**
**राम जालिया सन्मुख। कल्पांती नव्हे विन्मुख।**
**नेत्र झांकिता अधिक। रामचि दिसे।**
**मग विसरोनि पाहिले। तव ते रामचि जाले।**
**जीव सर्वस्वे वेधले। संपूर्ण रामे।।**
**रामेविण सर्वथा कांही। अणुमात्र रिते नाही।**
**दृश्य द्रष्टा दर्शन तेही। रामचि भासे।।**
**रामरूपी वेधले मन। तेणे राहिला कुलाभिमान।**
**पूर्व दशेचे लक्षण। पालटोनी गेले।।**
**ऐसा राम प्रगटला। दृश्य पदार्थ लोपला।**
**असतच नाहिसा जाला। सद्गुरु प्रतापे।।**

**श्रीराम दर्शनानंतर:-**

साक्षात्कारानंतर रामदासांची स्थिती कशी झाली होती व त्यांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, जागृतीत, स्वप्नी, सुषुम्नीत केवळ रामच राम दिसत होता. भक्ताचे, शिष्याचे, दासाचे इष्टदेवता रूप ऐक्य कशा प्रकारे होते आणि त्याचे अस्तित्व कसे गुरुरूप होते याचे या ओव्या म्हणजे विलोभनीय दर्शन आहे.

गुरू- शिष्याच्या या ऐक्यालाच अद्वयभक्ती म्हणतात, पराभक्ती म्हणतात. अशा स्थितीनंतर शिष्य-शिष्य राहत नाही. समर्थांचेही तसेच झाले. ते रामदास न राहता 'श्रीरामोस्मि' (मी रामच आहे) झाले. रामदासांचे 'समर्थ' झाले. आणि त्यांनी परदास्यामुळे आत्मविस्मृत, निद्रिस्त झालेल्या हिंदू समाजात श्रीरामाच्या पुरुषार्थी रामकथेद्वारे देशभर ठिकठिकाणी अनेक मठ स्थापून जनजागरण केले.

**देव मस्तकी धरावा। अवघाची हलकल्लोळ करावा।**
**मुलुख बुडवावा की बडवावा। स्वराज्या कारणे।।**

असे त्यांच्या राष्ट्रजागरणाचे जाज्वल्य स्वरूप होते.

!! जय श्रीराम!!

# रवींद्रनाथ टागोर: वारसा आणि कार्य

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

(भाग ८)

रवींद्रनाथांच्या काळातील एक प्रसंग आहे. बिहारमध्ये एकदा एका मोठ्या शाळेच्या इमारतीची पायाभरणी होती. या कार्यक्रमाला तत्कालीन व्हॉईसरॉयसाहेबांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. या कार्यक्रमात बोलताना त्या साहेबांनी म्हटले की, उत्तम शिक्षण द्यायचं असेल तर त्यासाठी शाळेची इमारत उत्तम हवी.

सर्व भौतिक सुविधांनी युक्त असं ते ठिकाण असायला हवं. अर्थातच रवींद्रनाथ व्हॉईसरॉय साहेबांच्या या मताशी अजिबात सहमत नव्हते. या साहेबांच्या विधानावर टीका करताना त्यांनी फार सुंदर उत्तर दिले. ते म्हणाले, 'जेवणासाठी चांदीचे ताट असले तर उत्तमच! पण महत्वाचे असतात ते ताटातील पदार्थ. ते पदार्थ उत्तम आणि स्वादिष्ट असतील तर जेवणासाठी केळीचे पान सुद्धा चालते. भारतातील लोकांना याची चांगली जाण आहे. श्रीमंत असो वा गरीब, केळीच्या पानावरही ते आनंदाने जेवतात. कारण ते महत्त्व देतात आपल्या पानातील पदार्थांना. जेवण सुग्रास आणि रुचकर असलं म्हणजे झालं. त्यांच्या काळात बऱ्याचशा विद्यापीठांचे पदवीदान समारंभ इंग्रजीतूनच होत असत. आजही त्यात फारसा फरक झालेला नाही. रवींद्रनाथांना एकदा कोलकाता विद्यापीठातील पदवीदान समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. त्या काळातील परंपरा म्हणून ते इंग्रजीतच आपले भाषण करतील अशी उपस्थितांना अपेक्षा होती. पण रवींद्रनाथांनी आपले भाषण बंगालीतूनच केले. लोक काय म्हणतील याची त्यांना पर्वा नव्हती. बहुधा पदवीदान समारंभाला स्थानिक भाषेतून भाषण करणारे रवींद्रनाथ पहिलेच असावेत.

शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांमध्ये जे अंतर पडले आहे, ते या साहेबांच्या भाषेमुळेच असे त्यांचे मत होते. इंग्रजी भाषा ही बंगालमधील बाबू लोकांची म्हणजे शहरी आणि सुशिक्षित लोकांची भाषा होती. इंग्रजांनी त्यांच्यासाठी जी शिक्षणाची व्यवस्था केली होती. त्यातून शरीराने भारतीय पण मनाने इंग्रज असे लोक तयार व्हावेत हा त्यांचा उद्देश होता. असे लोक त्यांना राज्यकारभार चालवण्यासाठी हवे होते.




इंग्रजी शाळेतील दिले जाणारे हे शिक्षण म्हणजे बंदिस्त खोलीतील सूर्यप्रकाशासारखे होते. चार भिंतींच्या आड कोंडून ठेवलेला प्रकाश जसा बाहेर जात नाही, तसे हे शिक्षण शहरी सीमांचा उंबरठा ओलांडून ग्रामीण भागापर्यंत पोहोचू शकत नव्हते. किंबहुना ग्रामीण भागाचा कोणी विचारच केला नव्हता. शेतकऱ्यांच्या या देशात शेतकरी निरक्षरच राहिला होता. त्याच्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्याची कोणाचीच इच्छा दिसत नव्हती. त्यातूनच शहरी आणि ग्रामीण भागात एक मोठी दरी निर्माण होत चालली होती. खरा भारत समजून घ्यायचा असेल, तर तो शहरात नसून ग्रामीण भागात वसलेला आहे असे त्यांना वाटे. इंग्रजी भाषेबद्दल रवींद्रनाथांच्या मनात द्वेष होता असे नाही. पण शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावं असं त्यांना वाटायचं. इंग्रजी भाषा कितीही चांगली असली आणि तिला वाघीणीचं दूध म्हटलं जात असलं तरी कोणतीही गोष्ट अति झाली की त्याची माती होते. ते आवश्यक तेवढेच हवे. दूध मग ते वाघिणीचे असो वा गायीचे, अति झाले की त्याचे विषच होणार. आपण ज्या वातावरणात वाढतो, ज्या भाषेत बोलतो, ऐकतो, ज्या भाषेत गाणी ऐकतो, नाटक सिनेमा पाहतो, तीच भाषा शिक्षणाचं माध्यम असावी. इंग्रजीसारखी परकी भाषा मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि विचारशक्तीला वाव देऊ शकत नाही. जी भाषा आजूबाजूला बोलली जाते, त्या भाषेचे संस्कार मुलांच्या मनावर सहज होतात. त्यांच्या डोळ्यांपुढे सहजपणे चित्र उभे राहते.

भाषेसंबंधी बोलताना रवींद्रनाथ आणखी एक महत्त्वाचा विचार मांडतात. तो म्हणजे भाषा केवळ ती नव्हे की जी फक्त शहरी लोक बोलतात. त्या भाषेच्या उपभाषा त्याचप्रमाणे ग्रामीण भागात बोलली जाणारी बोलीभाषा या सगळ्या प्रकारच्या भाषा त्यांना मान्य होत्या. आपल्या महाराष्ट्रात सुद्धा मुंबई पुण्यात बोलली जाणारी मराठी भाषा साधारणपणे आपण प्रमाण मानतो आणि ग्रामीण भाषेला अशुद्ध म्हणून नावे ठेवतो. परंतु रवींद्रनाथांचे बंगाली भाषा आणि तिच्या इतर उपभाषा आणि बोलीभाषा यांच्यासंबंधातील हे मत पाहिल्यानंतर आपल्याला सुद्धा आपण आपल्या बोलीभाषांबद्दल चुकीचा समज करून घेतला आहे हे लक्षात येते. बहिणाबाईंसारख्या निरक्षर असलेल्या कवयित्रीच्या कविता अहिराणी भाषेत आहेत पण त्या जीवनाचं तत्वज्ञान किती सहज सांगून जातात हे आपण सगळे जाणतो. ग्रामीण भाषा, बोलीभाषा हे आपले वैभव आहे. भाषेतील केवळ उच्चाराच्या आणि शुद्धाशुद्धतेच्या कल्पना रवींद्रनाथांना फारशा मान्य नव्हत्या. तसे पाहिले तर त्यांनी व्याकरणशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. त्यांच्यासोबत असणारे त्यांचे सहकारी विधुशेखर शास्त्री हे व्याकरणात पारंगत होते. त्यांच्यासोबत बसून त्यांनी पाणिनीचे व्याकरणशास्त्र अभ्यासले होते. आपल्या साहित्यात त्यांनी बंगाली बोलीभाषेचा वापर करायला सुरुवात केली त्यांच्या या लेखनावर अशुद्ध बोलीभाषेतील लेखन म्हणून तत्कालीन विद्वानांनी टीका केली. कळस म्हणजे एकदा तर रवींद्रनाथांच्या साहित्यातील उतारा एका विद्यापीठातील परीक्षेला हा उतारा शुद्ध करून लिहा म्हणूनही टाकला गेला होता. म्हणून रवींद्रनाथ म्हणतात की, भारतीय विद्यापीठे केवळ पदव्या वाटणारे कारखाने आहेत. आजही इतक्या वर्षानंतर या वस्तुस्थितीमध्ये फारसा फरक पडलेला नाही. अशा विद्यापीठांमध्ये विद्यादानापेक्षा पदवीदानालाच जास्त महत्त्व दिले जाते. रवींद्रनाथांच्या वागण्या बोलण्याचा प्रभाव मात्र तत्कालीन अनेक लोकांवर पडला होता. अनेक विद्वान त्यांचे मित्र होते. त्यांच्या कार्यपद्धतीने भारावून जाऊन त्यांच्या कार्याला वाहून घेतलेले अनेक लोक स्वयंस्फूर्तीने शांतीनिकेतनमध्ये सेवा देण्यासाठी आले होते. ही सगळी मंडळी अत्यंत समर्पित भावनेने काम करणारी होती. अत्यंत कमी मानधनामध्ये ते हे काम करीत असत. अशा लोकांमध्ये ब्रह्मबांधव उपाध्याय यांच्यासारखे विद्वान होते. या उपाध्याय यांनीच रवींद्रनाथ यांना प्रथम गुरुदेव असे संबोधले. नंतर रवींद्रनाथ गुरुदेव या उपाधीने ओळखले जाऊ लागले. त्याचप्रमाणे त्यांच्यासोबत कालीमोहन घोष, जगदानंद, नेपाळचंद्र राय हे सहकारी शिक्षक होते. अभिजात संगीत शिकवण्यासाठी भीमराव शास्त्री हे महाराष्ट्रातून तिथे गेले होते. विधुशेखर शास्त्री हे संस्कृत पंडित यांच्यासारखी प्रचंड गुणी माणसे रवींद्रनाथांनी जोडली होती. या सगळ्यांना आणि आपल्या विद्यार्थ्यांना गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी उत्तमोत्तम साहित्य लिहिण्याची, संशोधन करण्याची, नवनिर्मितीची प्रेरणा दिली. निसर्गाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली आणि विकासाच्या अनेक वाटा त्यांच्यासाठी मोकळ्या करून दिल्या. (क्रमशः)

# करा हास्यगिरीवर गिर्यारोहण

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२



अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांच्या शालेय जीवनातील एक किस्सा. एक दिवस त्यांचे शिक्षक रागाने त्यांना म्हणाले. लिंकन तुझी प्रगती फक्त खाण्यात झाली. अभ्यासात मात्र तू अगदी 'ढ' आहेस. त्यावर लिंकन लगेच म्हणाले, खाण्याचे काम मी करतो. अभ्यास मात्र तुम्ही शिकवता. त्यांना म्हणायचे होते, मी माझ्या कामात प्रामाणिक आहे. तुम्ही तुमच्या कामात प्रामाणिक आहात का? याचा विचार तुम्हीच केला पाहिजे. असामान्य बुद्धीची माणसं अशी अफलातून असतात. सर्व सामान्यासाठी असणारे नियम त्यांना लागू होतं नाहीत.

पाठ्यपुस्तकातील ज्ञानावरुन त्यांच्या बुद्धीमत्तेचा आवाका लक्षात येत नाही किंवा त्यांचे अनुभव विश्वही ठरविता येत नाही. ते ठरविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना प्रश्न करणारा अज्ञानी ठरतो. त्यामुळे प्रथमदर्शनी किंवा त्या व्यक्तीत्वाचा पूर्ण अभ्यास झाल्याशिवाय त्याला मूर्ख ठरवण्याची घाई करणारा एक महामूर्ख असतो हे वैश्विक सत्य विनोदाच्या माध्यमातून आपण जाणून घेतले पाहिजे. असाच एक दुसरा प्रश्न एका अज्ञानी बालकाने त्यांना विचारला, काय रे तुझे आजोबा कोण होते? तेंव्हा छोट्या अब्राहमने दिलेले उत्तर असे, माझे आजोबा कोण होते, हे मला महत्वाचे वाटत नाही. त्यांचा नातू काय दिवे लावणार? हा प्रश्न मला खूप महत्वाचा वाटतो. त्याचे उत्तर मी शोधले पाहिजेत. अत्यंत समयसूचकतेने बालवयात त्यांनी दिलेले हे उत्तर त्यांच्या जीवनचरित्राचा महत्वपूर्ण प्रारंभ होतो. त्यावरुन ते त्यांच्या भविष्याविषयी किती सतर्क होते हे सुद्धा लक्षात येते. आम्ही पूर्वजांच्या कर्तृत्वाचा इतिहास अक्षरशः उगाळून उगाळून प्रत्येक ठिकाणी सांगण्यात धन्यता मानतो. प्रत्यक्षात अशा व्यक्तीची अवस्था अशी असते की त्याचे स्वकर्तृत्व काहीच नसल्यामुळं त्या सूर्याची पीलांची अवस्था काजव्या पेक्षाही वाईट झालेली असते. त्याचा खेद किंवा खंत बाळगून आत्मपरिक्षण करुन पुढील वाटचालीसाठी प्रयत्नशीलं राहण्याची गरज या परोपजीवी अमिबांस कधीच वाटत नाही. ते फक्त आपल्या पूर्वजांचे गोडवे गाण्यात मग्न असतातं. अशी अवस्था होण्याचे कारण काय? तर इतिहासाचे अवजड ओझे डोक्यावर घेवून नाचण्याचं तेवढच काम आम्ही केलं. आम्हाला स्वकर्तृत्व सिद्ध करणं कधी महत्वाचं वाटलं नाही. त्यामुळं अब्राहम लिंकन बालपणी आपल्या मित्राला जे उत्तर देतात त्यात आत्मभान, आत्मसन्मान आणि आत्माभिमान आहे. विनोदाच्या आडं दडलेलं हे तत्वज्ञान जेंव्हा आपल्या लक्षात येते तेंव्हा विनोद ऐकण्याला व विनोद ऐकवण्याला काही अर्थ असतो. नसता बरेच वेळा राजा हसला म्हणून प्रजा हसली अशीच अवस्था असते. आपण हसलो का आणि कशासाठी? जोपर्यंत हे आपल्याला कळणार नाही. तोपर्यंत सुख आणि दुःखाच्या आपल्या संकल्पनाही अनिश्चित असतील. माझ्या ज्ञानाचा उपयोग मला विधायक कार्यासाठी करावयाचा आहे, असा विचार करणारी माणसं ज्ञानप्राप्ती मुळे नम्र होतात. दुःख पचवूनही आपला चेहरा प्रसन्न ठेवतात. हसत राहतात आणि सर्वांना हसवत ठेवतात. कोणी त्यांच्यावर विनोद केला तरी हसतात आणि स्वतःवर सुद्धा विनोद करतात. ही तथाकथित विद्वतजनांची मानसिकता खूप महत्वाची. नकारात्मक मार्गाने त्यांची होणारी वाटचाल समाज व देशासाठी घातक आहे तेंव्हा ती त्यांच्यासाठी चांगली कशी असू शकेलं? त्यामुळे मी वाईट वागून माझे उपद्रवमूल्य किती प्रमाणात वाढविले असे समजणार्या महान विद्वानापेक्षा, ज्याला जीवनाचा मनुष्यधर्म समजला आहे असा एखादा निरक्षर माणूस कितीतरी श्रेष्ठ आहे.

अलिकडे संकलन हा प्रकार मोठ्या प्रमाणात समोर येतं आहे. असे लोक संकलक किंवा संग्राहक आहेतं पण तेही स्वतःला लेखक म्हणवून घेतातं. लोकही ते मान्य करतात. असं असेल तर आपल्याला तरी कायं अडचण आहे? तसेही कुणालाच काही अडचण असण्याचे काय कारण आहे? हे सर्व काही असेच सुरु राहणार असेलं तर जसे असेलं तसे हे सर्व स्विकारण्याची तयारी आपण ठेवायला तरी काय हरकतं आहे? तसेही ज्यांची कुठेच काही हरकत नसते जगात त्यांच्यासारखे सुखी प्राणी कुठेही नसतात. ते बिचारे सदैव सुखीच असतात. कुणाच्याही अध्यातमध्यात नसलेली अस्तित्वशून्य माणसात आणि दगडात फारसा फरक नसतो, त्यामुळेच लोक त्यांना देवमाणूस म्हणतात. एखाद्या विशिष्ट ध्येयाने झपाटलेल्या माणसाची गणना लोक 'भूत' श्रेणीत करुन मोकळे होतात. उदा. काय भूतासारखं काम करतो आणि काय देवासारखा शांत बसला आहे? या वरील उदाहरणावरुन जनमाणसांची मूल्यमापन करण्याची मानसिकता आपल्या लक्षात यावी. जगातील असामान्य व्यक्तीत्वाला त्यांच्या हयातीत माणूस म्हणून न जगू देण्याचे अमानवी कृत्य त्यांच्या समिप असणाऱ्या दोन पायाच्या पशू समूहांनी अखंडितपणे केले आहे. त्यांनी या नश्वर देहाचा त्याग केल्यावर त्यांना महान बनविण्यासाठी त्यांच्या कार्याचे स्तुतीपाठक होऊन स्तुती सुमने उधळणे. स्मारकांची इमले बांधुण त्याच्या कार्याचे गोडवे गातांना शब्दसुमनांचा महापूर येतो. त्या सर्व महापूरात विहार करुन तृप्त झालेले, त्या मृत व्यक्तीचे वंशज आपण पहातो. त्यांच्या एक गोष्ट लक्षात येत नाही. स्तुतीपाठकांचा तो व्यवसाय आहे. त्यामुळे तुमची उंची वाढणार नाही. ती तुमच्या कर्तृत्वाने निर्माण होणार आहे.

सम्यक आणि अहिंसक विनोदाचे महत्व जर या भपका मिरवणार्या आणि दिखावा करणाऱ्या समाज मनाला कळाले असते तर त्यांच्यातील अहंकाराचा टेंभा कमी व्हायला मदत झाली असती. हा एक उच्च संस्काराचाच भाग आहे. तो ज्या मानवी समूहात रुजवल्या जातो. वाढवील्या जातो व समृद्ध केल्या जातो. त्यामुळे केवळ विनोद समृद्ध होत नाही तर मानवी जीवन समृद्ध होते. प्रत्येक प्रसंगाकडे, सुख दुःखाकडे माणूस सहजतेने पहातो. तो आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गोड, आंबट, तिखट घासाची विविधता जशी, तशीच सुखदुःखाची विविधता आहे. एवढ तटस्थ राहून त्या त्या प्रसंगाकडे आपण पाहू शकलो तर मानवी जीवन सुसह्य होतं. ते आनंदीही होतं. एवढच नाही तर या मानवी जीवनाची एक आनंदयात्राच होते. आनंदविहारातील हे मित्रप्रेम पहा. जगप्रसिद्ध विनोदी साहित्यिक जे. बी. शॉने आपले जीवलग मित्र इंग्लंडचे माजी पंतप्रधान विस्टन चर्चिल यांना एकदा आपल्या नविन नाटकाची दोन तिकीटे पाठवली. त्या सोबतच एक पत्र दिले व त्यात लिहिले होते, एक तिकीट तुमच्यासाठी व दुसरे तुमच्या मित्रासाठी अर्थात जर तुम्हाला कोणी मित्र असेल तर! त्यावर चर्चिलनने उतर दिले, माफ करा मी तुमच्या पहिल्या प्रयोगाला येवू शकलो नाही पण तुमच्या दुसर्या प्रयोगाला नक्की येईन. अर्थात आपल्या नाटकाचा दुसरा प्रयोग झाला तर! हा प्रसंग म्हटलं तर आनंदविहार आहे आणि त्या प्रसंगाचा नकारात्मक विचार केला तर तो संघर्षविहार आहे. तो खऱ्या मित्रत्वासाठी मात्र तो आनंदविहारच असतो.

पु. ल. देशपांडे म्हणतात, जीवनात दुःखाना तोटा नाही, तसा आनंदाला नाही. प्रत्येकाची आनंदाची ठिकाणे वेगळी आणि कारणेही वेगळी. या विचारा मागिलं रहस्य समजून घेऊ या. प्रत्येक व्यक्ती, प्रसंग व घटनेकडे आपण कसे पहातो. ही बाब महत्वाची. आपला आनंद तात्कालिक की चीरकाल टिकणारा ते आपल्या आनंदाच्या ठिकाणावर आणि कारणावर अवलंबून असते. तुमच्या आनंदाचा मार्ग नेमका तुम्हाला कुठे नेऊन पोहचवणार. हे तुम्हाला त्या आनंदाचा आस्वाद घेण्यापूर्वी कळावे. नसता प्रत्येक ठिकाणी एकदा चव घेवून तर पाहू ही वृत्ती आपल्या जीवनाचा विनोद करुन टाकल्याशिवाय राहणार नाही. आपण विनोदाचा आस्वाद घ्यावा पण आपल्या जीवनाचा विनोद मात्र होऊ देऊ नये. आपल्यातील दोष दाखविणारी व्यक्ती आपली नेहमी हितचिंतकच असते. त्याने ते काम अवश्य करावे. अपेक्षा एवढीच असते त्यामागे त्या व्यक्तीचा हेतू शुद्ध असावा. त्याने भविष्यातील अनपेक्षित संकटे कमी होण्यास नक्की मदत होते. अनावधानाने झालेल्या चुकांचे भांडवल आपल्या हितचिंतकाने कधी करु नये. सन्मान कायम ठेवून त्याने हितचिंतक व्हावे. ही प्रत्येकाची अपेक्षा असते. मित्रास केलेल्या मदतीची जाहिरातबाजी सुरू झाली की नव्या विनोदाचा जन्म होतो. तो विनोद सुसह्य नसतो.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, ०४ ऑगस्ट ते शनिवार, १० ऑगस्ट २०२४)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ४ ऑगस्ट-** दर्श अमावास्या, दीपपूजन, नक्तव्रतारंभ, श्री मरगुबाईदेवी यात्रा बेवनूर जि.सांगली, फ्रेंडशिप डे ✻ **सोमवार, ५ ऑगस्ट-** श्रावण मासारंभ, चंद्रदर्शन (२०:०५ पर्यंत), दर सोमवारी श्री शिवपूजन, शिवामूठ तांदूळ, द्वार यात्रा चिंचवड, काशिविश्वनाथ यात्रा ढोरजा ता.श्रीगोंदा, श्री संत विठ्ठल महाराज पुण्यतिथी चितळी ✻ **मंगळवार, ६ ऑगस्ट-** मंगलागौरी पूजन, सफर मासारंभ ✻ **बुधवार, ७ ऑगस्ट-** बुध, बृहस्पती पूजन, मधुस्त्रवा तृतीया ✻ **गुरुवार, ८ ऑगस्ट-** विनायक चतुर्थी, नागचतुर्थी (उपवास), दुर्वागणपती व्रत, बृहस्पती पूजन, धोंडोपंत भोसेकर महाराज पुण्यतिथी इसबावी पंढरपूर ✻ **शुक्रवार, ९ ऑगस्ट-** नागपंचमी, नागनाथ पूजन, जय जीवंतिका पूजन, अगस्ति दर्शन, ऑगस्ट क्रांती दिन, महालक्ष्मी स्थापना व पूजन, जागतिक आदिवासी दिन ✻ **शनिवार, १० ऑगस्ट-** कल्की जयंती, श्रीयाळ षष्ठी, सूपोदन वर्णषष्ठी, नरसिंह- पिंपळ- शनि- मारूती पूजन, दादा महाराज केळकर पुण्यतिथी सांगली.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपूडा-** ६ ऑगस्ट (१८ पर्यंत), १० ऑगस्ट ✻ **बारसे-** १० ऑगस्ट ✻ **गृहप्रवेश-** ९, १० ऑगस्ट.

### मेष :- नव्या विचारांना चालना

गोष्टी देवावर सोपवण्याचा अधिकार त्यांनाच असतो, ज्यांचे प्रयत्न प्रामाणिक असतात. गुरूवारी पंचमात बुध, शुक्राची होणारी युती आर्थिक कामे मनासारखी करणारी ठरेल. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी होईल. फार दगदग करू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. अनावश्यक खर्च टाळावेत. वादाचे प्रसंग टाळावेत. उपजत कला-गुणांचा गौरव होईल. उपेक्षित घटना घडतील. शुभ ता. ६, ७

### वृषभः- अडचणी कमी होतील

डोकं शांत असेल तर निर्णय चुकत नाही, भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत. राशी स्वामी शुक्राची सुखस्थानी बुध राशी युती होत आहे. त्यामुळे स्थावर, वाहन सौख्य लाभेल. धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. ग्रहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता लाभेल. कौटुंबिक जीवनात सुख स्वास्थ लाभेल. अडचणी कमी होत जातील. शुभ ता. ७,९

### मिथुनः- जपून असावे

नातेवाईकही तेव्हाच नाती निभावतात, जेव्हा तुमच्याकडे पैसा असतो. धनात रवि तर व्ययात मंगळ, हर्षल, गुरू समवेत आहे. त्यामुळे आर्थिक समस्या राहणार आहेत. कोणतेही व्यवहार विचारपूर्वक करावेत. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. जपून असावे. कला-गुणांना चांगल्या संधी लाभतील. नोकरीत जबाबदारीकडे दुर्लक्ष करू नका. जपून असावे. शुभ ता. ६, ९

### कर्कः- प्रकृती सांभाळा

शिक्षकांच्या हातातून छडी गायब झाली आणि हे जग बेशिस्त झाले. महत्त्वाचे व्यवहार या एक-दोन आठवड्यात पूर्ण करून घ्या. दूरच्या प्रवासाचे योग आहेत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. आत्मविश्वास राहिल. अपेक्षित संधी लाभतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नव्या संधी विचारपूर्वक स्विकाराव्यात. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. शुभ ता. ५, ९

### सिंहः- सौख्यदायी घटना

जोडीदार रडताना सोडून जाणारा नसावा. तर चिडून का होईना पण जवळ घेणारा असावा. राशीत होणारी बुध- शुक्राची युती सौख्यदायी घटना घडविणार आहे. महत्त्वाच्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात नोकरीत वरिष्ठांची नाराजी ओढवून घेऊ नका. अनावश्यक खर्च टाळावा. अनुकूलता वाढत जाईल. शुभ कार्यास विलंब होईल. शुभ ता. ७, ९

### कन्याः-सामंजस्याने रहावे

समजुतदारपणा आणि शांतता हे वयावर नाही तर आयुष्यात आलेल्या अनुभवावर अवलंबून असतात. राशी स्वामी बुधाची व्ययात शुक्राशी युती होत आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. धार्मिक, सामाजिक कार्यात आपण पुढाकार घ्याल. कार्यसिध्दीसाठी आपणास अधिक पाठपुरावा करावा लागेल. शुभ ता. ६, ७

### तुलाः-प्रकृतीच्या तक्रारी राहतील

जो ईश्वरापुढे झुकतो, त्याला ईश्वर इतरापुढे झूकू देत नाही. लाभस्थानात होणारी बुध- शुक्राची युती आर्थिक प्रगती करणारी आहे. सरकारी कामे या सप्ताहात करून घ्यावीत. प्रकृतीच्या तक्रारी राहणार आहेत. काळजी घ्यावी. उष्णतेपासून त्रास हाईल.अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित कामासाठी पाठपुरावा करावा लागेल. शिक्षणातून प्रगती होईल. शुभ ता. ६, ७

### वृश्चिकः- अपेक्षित संधी लाभतील

खूप मोठा अडथळा आला की, समजावं आपण विजयाच्या खूप जवळ आलो आहोत. कर्मस्थानात गुरूवारी बुध- शुक्राची युती होत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात समाधानकारक घटना घडतील. दुसंवर फार अवलंबून राहू नका. कौटुंबिक सामंजस्याची स्थिती ठेवावी. पहिल्या अपत्यास जपावे. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. ६, ७

### धनुः- जुन्या वास्तूत राहू नका

कोणाचीच बरोबरी करत बसू नका, तुम्ही तुमच्या मार्गाने चालत रहा. सुखाचे दिवस येतील. भाग्यस्थानी होणारी बुध- शुक्राची युती शुभ घटना घडविणार आहे. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. उत्साहाने विविधि कामे मार्गी लावता येतील. अपेक्षित कार्यसिध्दीसाठी जास्त पाठपुरावा करावा लागेल. फार जुन्या वास्तूत राहू नका. शुभ ता. ७,९

### मकरः- समाधान वाटेल

ज्ञानानंतर नम्रता अंगी आली तर हे ज्ञान अमृत आहे. अष्टमात बुध- शुक्राची युती होत आहे. आर्थिक कामे मनासारखी होऊ लागल्याने समाधान वाटेल. वैद्यकिय, कृषि, बॅक, विमा अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहिल. घाईने कोणताही व्यवहार करू नका. अपेक्षित संधी लाभतील. प्रगतीच्या घटना घडतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ६, ९

### कुंभः-वाहनांपासून जपून

प्रश्न कुठलाही असो तो कधीच एकटा येत नाही, तो उत्तराला सोबत घेऊनच येत असतो. चिंता करू नका. राशी समोरच होणारी बुध शुक्राची युती सौख्यदायी घटना घडविणार आहे. कार्यसिध्दीसाठी थोडा संघर्ष करावा लागणार आहे. वाहनांपासून जपून असावे. वाट्टेल तसा खर्च करणे टाळावे. फार दगदग करू नका. विचाराने रहावे. शुभ ता. ५, ६

### मीनः- नव्या विचारांना गती

शरीराची अनेक औषधे मेडिकल दुकानात भेटतात, पण मनाचा इलाज हक्काच्या माणसाकडून होतो. याबाबतची प्रचिती सध्या येत राहिल. उत्साह, धडाडीने घेतलेले निर्णय शुभफलदायी ठरतील. नव्या विचारांना गती मिळेल. कार्यक्षेत्रात प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकाल. खर्चाचे प्रसंग वाढले तरी प्राप्तीही तशीच समाधानकारक राहिल. फार चिंता करू नका. शुभ ता. ६, ७, ९

!! शुभ भवतु !!

▶ पान २ वरून

## जाणे भक्तीचा जिव्हाळा...

आवडीने भावे हरिनाम घेसी। तुझी सर्व चिंता त्यासी आहे ।। जेव्हा एखाद्या व्यक्तीवर किंवा कुटुंबावर संतकृपा होते, तेव्हा त्याची आध्यात्मिक प्रगती होते. परंतु सुंदर, आज्ञाधारक बायको मिळणे, इमारत निर्माण होणे, लॉटरी लागणे, व्याधीतून सुटका होणे, शेतात चांगलं पीक येणे, व्यवसाय भरभराटीला जाणे या सर्व संसारिक सुखाच्या गोष्टी अध्यात्माशी जोडल्या जातात. परंतु, परमार्थिक प्रगती यापेक्षा वेगळी होय.

खरं म्हणजे, भगवंताने माणसाचा देह देतानाच आनंद तत्त्व शरीरामध्ये जन्मताच दिलेले आहे. परंतु मनुष्य काम, विकार आणि संसारिक दुःखामुळे सदैव दुःखी राहतो. मारुती म्हणे करा घाई। आनंद आणा संतापायी।। जीवन जगताना आनंद हा सांभाळता आला पाहिजे. तो संत मारुती महाराजांनी आपल्या भक्तगणांना आपल्या तत्त्वज्ञानातून सदैव दिलेला आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदची अंग आनंदाचे ।। स्वतःला ओळखण्याचे ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान, संत मारुती महाराज माकनेरकर यांनी कसे सांगितले आहे, याबद्दल यथोचित भाष्य या लेखातून केले आहे. जीवनामध्ये सफल होण्याकरिता काही गोष्टींचा त्याग करावा लागतो, तर काही गोष्टी आचराव्या लागतात. संतांनी, ऋषिमुनींनी याबाबत योग्य मार्गदर्शन केलेले आहे. जीवनाच्या उत्थानाकरिता ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या गोष्टी आपण स्वीकारल्या पाहिजेत.

जीवनामध्ये ज्या गोष्टी टाकाऊ आहेत, त्या आपण सोडून दिल्या पाहिजेत, असा संत विचार लेखक या ठिकाणी सांगतात. निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ ।। संत मारुती महाराजांनी निश्चयाचे वर्णन केलेले आहे. गुणदोशी मन टाळावे आणि मनाकडून विश्वप्राप्ती साधावी. यासाठी संत मारुती महाराजांचा विचार सदैव स्पृहणीय वाटतो.

▶ पान ५ वरून

## करा हास्यगिरीवर गिर्यारोहण

सदैव विनोदाचा आस्वाद घेत आनंदाने जगणारी माणसं कधीच दुःखी होत नाहीत, असं मी मुळीच म्हणणार नाही. आपल्या दुःखापेक्षाही इतरांच्या दुःखाने ज्यांच्या डोळ्यात पाणी येते. त्यांच्यातील मानवी भावभावनेचं उदात्तीकरण तुलनेनं खूप जास्त असते, पण विनोदाशी मैत्री करणारी माणसं मोठ्या दुःखातूनही फार लवकर स्वतःला सावरतात. स्वतः आनंदविहार करतांना इतरांना साथ संगतीला घेऊन सर्वांचा आनंद शतगुणित करतात. जेव्हा असा निर्भेळ आनंद मिळविण्यात ज्या व्यक्ती यशस्वी होतात. शारीरिक, भौतिक सुखाच्या पलिकडे जाऊन तो मानवी जीवनाचा उदात्त हेतू शोधायला लागतो. भाऊसाहेब पाटणकराच्या शब्दात सांगायचे तर, स्वर्गातही जाऊन आता काय मज मिळवायचे। मिळविले सारेच येथे, स्वर्गात जे मिळवायचे। इंद्रा अरे सांगू नको त्या मेनका अन् उर्वशा। कोणा हव्या विसळून तुमच्या त्या चहाच्या कपबशा।। हास्यगिरीवरुन विहार करणारे आत्मानंद, शब्दानंद घेतांना असे काही कोट्यधीश होऊन जातात. त्यामुळे सर्वसामान्य सुखाचा मोह त्यांना कधी होतं नाही. त्या आनंदाचा आस्वाद घेण्यासाठी त्यांना हास्यगिरीवरुन पायथ्याशी येण्याची गरज वाटत नाही. हास्यगिरीच्या शिखरावर गिर्यारोहण करणाऱ्या गिर्यारोहकांचे मात्र ते नेहमी स्वागत करण्यास सिद्ध आणि सज्जच असतात.

# नाठाळाचे काठी देऊ माथा।



**सत्ताकारण**

**सोमनाथ देशमाने**

भ्र. ९४२१६३६२९१

भारतीय जनता पक्षप्रणित निवडणूकपूर्व आघाडी रालोआ आणि भाजपा यांचं निकालोत्तर संख्याबळ अनुक्रमे २९३ आणि २४० असताना जनतेने त्यांना नाकारलय असं अवघं ९९ संख्याबळ असलेली काँग्रेस म्हणत असते. २००४ आणि २०१९ साली काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांचं संख्याबळ होतं अनुक्रमे १४५ आणि १३८; २०६ आणि ११६! तरीही काँग्रेसने निकालोत्तर आघाडी बनवून खिचडी सरकारं स्थापन केली होती. काँग्रेसचं ते 'पवित्रकार्य' आणि इतरांचं ते 'महापाप'? इतर कुणी सत्तेवर आलेलं काँग्रेसला कधीच सहन होत नाही.

२०१४ साली पहिल्यांदाच पंतप्रधानपदी आलेल्या चहावाल्या नरेंद्र दामोदरदास मोदी यांनी जवाहरलाल नेहरु यांच्या विक्रमाची बरोबरी करत २०२४ साली सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या रालोआ सरकारला शुभेच्छा देण्याचं साधं सौजन्य लोकसभेतील विरोधी पक्षनेता राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेता मल्लिकार्जून खडगे आणि काँग्रेस संसदीय दलनेत्या सोनिया गांधी यांनी अजूनही दाखविलेले नाही. चोट कितनी गहरी लगी होगी? भारतीय मतदारांनी भलेही स्विकारले असेल पण ज्याला आपण कधीही स्विकारले नाही तो आपल्या नाकावर टिच्चून सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाला आहे? किती भयंकर वेदना होत असतील? राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील संख्यात्मक सूज आलेल्या विरोधी पक्षांची पहिल्या सत्रातली अत्यंत निराशाजक कामगिरी देशाला घाबरवणारी, चिंताक्रांत करुन सोडणारी ठरली आहे.

संख्याबळ अगदी नगण्य असो अथवा भरभक्कम असो, विरोधी बाकांवर बसलेला असो अथवा संयुक्त सरकारात सत्ताधारी बाकांवर बसलेला असो; भारतीय जनता पक्षाने आपला गुणात्मक दर्जा कधीही घसरु दिला नाही, उलट तो सतत वर्धिष्णू कसा राहील यासाठी भारतीय जनता पक्ष सतत प्रयत्नशील असतो. भारतीय जनता पक्षाने क्षूद्र राजकीय स्वार्थासाठी सनातन भारतीय संस्कार, संस्कृती, वारसा, नीतिमत्ता, जीवनमूल्यं, समाजहित, राष्ट्रहित यांच्यावर आघात करणाऱ्या, करु शकणाऱ्या तडजोडी कधीही स्विकारल्या नाहीत; उलट, सर्वसमावेशक भारत अधिकाधिक सशक्त करण्यासाठी भाजपा सतत प्रयत्नशील असतो. विरोधी बाकांवर असताना सत्ताधाऱ्यांचा आणि सत्ताधारी बाकांवर असताना विरोधकांचा योग्य तो आदर राखत; घटनात्मक, संसदीय मर्यादांचा यथोचित आदर राखत राष्ट्रीय कर्तव्य आजतागायत पार पाडत आला आहे. भारतीय जनता पक्षाला समग्र राष्ट्रविकासासाठी सत्ता हवी असते, कुण्या राजघराण्याची सरंजामी बडदास्त ठेवण्यासाठी नाही. भाजपासाठी जनराष्ट्रहित सदासर्वदा सर्वोपरि असते.

स्वतःकडे पाशवी संख्याबळ असताना सत्तेत असो अथवा संयुक्त सरकारचं नेतृत्व स्विकारत सत्तेत असो अथवा सरकारला बाहेरुन पाठिंबा देत अप्रत्यक्ष सत्तेत सहभागी असो, नेहरु-गांधी-काँग्रेस परिवार गुणात्मकदृष्ट्या कधीही चमकला नाही. परिवारवादी संकुचित विचाराच्या राजकीय पक्षांच्या अग्रक्रमावर राष्ट्रहित कधीच नसते, त्यांच्यासाठी त्यांचे परिवारहित सर्वोपरि असते, त्यासाठी ते कुठल्याही थराला जावू शकतात, प्रसंगी राष्ट्रहिताचा बळी द्यायलाही ते मागेपुढे बघत नाहीत.

नेहरु-गांधी-काँग्रेस परिवार या मानसिकतेच्या शिरोभागी आजही विराजमान आहे. या देशावर राज्य करणाचा आमच्या परिवाराचा जन्मसिध्द अधिकार असताना इतर कुणी सत्ताधारी बाकांवर बसायची हिंमत कशी काय करु शकतो? परिवारवादी घमंड. प्रदीर्घ काळ सत्ताधारी असलेल्या नेहरु- गांधी- काँग्रेस परिवारावर विरोधी बाकांवर बसायची पाळी फार कमी वेळा आली आहे, पण जेव्हा तशी वेळ आली आहे तेव्हा त्यांनी कुणालाही सुरळीत राज्यकारभार करु दिला नाही, मग ती केंद्रातली सरकारं असोत अथवा राज्यातली. 'राज न कर सको, तो अराजक बनो।' मानसिकता! घटनात्मक, संसदीय मर्यादा, परंपरा बेमुर्वतखोरपणे पायदळी तुडविण्यापर्यंत मजल मारताना नेहरु-गांधी- काँग्रेस परिवाराला कधीही खंत वाटत नाही. भ्रष्ट मार्गाचा अवलंब करत निवडून आल्याचा ठपका ठेवत न्यायालयाने खासदारकी रद्दबातल ठरविल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशावर काळीकुट्टं आणीबाणी लादली, घटनादुरुस्ती केली आणि ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू केली, कशासाठी? स्वतःची खासदारकी, पंतप्रधानपद आणि सत्ता वाचविण्यासाठीच ना? 'संविधान बचाओ' म्हणायचा नैतिक अधिकार तरी यांच्याकडे आहे का?

नेहरु-गांधी-काँग्रेस परिवाराने आपल्या क्षुद्र पारिवारिक, राजकीय, पक्षीय स्वार्थासाठी सनातन भारतीय संस्कार, संस्कृती, वारसा, नीतिमत्ता, जीवनमूल्य, समाजहित, राष्ट्रहित यांच्यावर आघात करणाऱ्या, करु शकणाऱ्या तडजोडी स्विकारायला कधीही मागेपुढे बघितले नाही, किंबहुना तसा आघात करणाऱ्या घटनात्मक तरतुदी मुद्दाम निर्माण करुन 'सनातन भारत' हतोत्साहित दुर्बल कसा करता येईल, यासाठी हा परिवार सतत प्रयत्नशील असतो. नेहरु-गांधी-काँग्रेस परिवाराचा संपूर्ण ताबा सोनिया गांधी यांनी घेतल्यापासून 'सनातन भारत' नेस्तनाबुत करणाऱ्या'पवित्र' कार्याची व्याप्ती प्रचंड वाढली आहे! अशा परिस्थितीत आता सोनियापुत्र राहुल गांधी यांनी त्या महान कार्याची धुरा आपल्या शिरावर घेतली आहे, काँग्रेस पोशित औरस-अनौरस लाभार्थी 'इकोसिस्टिम्स' त्यांच्या दिमतीला आहेतच. गेली सलग वीस वर्षे खासदार राहुल गांधी यांनी संसदेत आणि संसदेबाहेर सभ्यतेचे सगळे संकेत, परंपरा धाब्यावर बसवत ज्या काही 'बाललीला' दाखविल्या आहेत, त्या फारशा कुणी गांभीर्याने घेतल्या नाहीत, पण प्रथमच विरोधीपक्ष नेतापद मिळानंतर राहुल गांधी यांचं संसदेतलं अनिर्बंध वागणं, बोलणं, देहबोली, जाहीर आरोप-धमक्या हे सगळं इथल्या समस्त सनातन विश्वाला आणि भरतराष्ट्राला चिंताक्रांत व्हायला लावणारं आहे. या माणसाला जरासं विरोधी पक्षनेतेपद मिळालं तर ही दादागिरी? उद्या दुर्दैवाने भारतीय मतदारांनी या बालकबुध्दी नव्हे हिंसकबुध्दी, सनातनभारतद्वेशी माणसाला चुकून भारताच्या पंतप्रधानपदी नेवून बसविले, तर केवढा अनर्थ ओढवेल? हिंदुस्तानभर केरोसिन झिडककर रखा हैं, बस्स एक तिल्ली लगाने की जरुरत हैं, ही हिंसक मानसिकता सत्तेवर आली तर किती हाहाकार माजेल? मोदींनी घेतलेले सर्व देशहितकारी निर्णय फिरवत २०१४ साली भारत जिथं होता तिथं नेवून ठेवतील राहुल गांधी? कारण, हा परिवार मोदींचा प्रचंड तिरस्कार करत असतो, अशा तिरस्कारयुक्त वातावरणात भारतीय सनातनविश्व उध्वस्त होऊन जाईल की काय? हे समग्र सनातन भरतराष्ट्र बेचिराख होऊन जाईल की काय? भयसूचक भविष्याचे भयसूचक संकेत मिळत आहेत? राहुल गांधी यांचा 'पप्पु' अवतार अत्यंत फसवा आहे, तो त्यांनी जाणीवपूर्वक धारण केलेला आहे, त्यांना तसा धारण करायला लावण्यात आलेला आहे. राहुल गांधी हे एकटे नाहीत, त्यांच्या पाठीशी देशविदेशातल्या अनेक सनातनविरोधी, भारतविरोधी आणि लोकशाहीविरोधी इकोसिस्टिम्स् सर्वशक्तीनिशी खंबीरपणे उभ्या आहेत. सगळ्यांचं मिशन एकच आहे, 'सनातन की बरबादी' आणि त्याद्वारे 'भारत की बरबादी!' सनातन भरतराष्ट्राच्या पाठीचा कणखर कणा असलेला 'सनातनी' पुरता कोसळून पडला की भरतराष्ट्र संपले. राहुल गांधी यांच्या डोक्यात हे 'जिहादी-मिशनरी-मिशन' फिट्टं बसवलं गेलं आहे. त्याबरहुकूम राहुल गांधी जबरदस्त वेगाने वाटचाल करत आहेत. त्यांच्या मिशनमार्गातला सर्वात मोठा गतीरोधक बनले आहेत नरेंद्र दामोदरदास मोदी; त्यानंतरचे गतीरोधक आहेत भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. त्यासाठी राहुल गांधी सर्वाधिक भर देतात ते नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या सनातनप्रतिमा भंजनावर, कारण राहुल गांधी यांची अशी धारणा आहे की भारतीय जनता पक्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दूर गेला की भारतीय जनता पक्ष कमकूवत होईल आणि भारतीय जनता पक्ष कमकूवत झाला की नरेंद्र मोदी सत्तेबाहेर फेकले जातील.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी आणि कंपनी अनलिमिटेड यांचं हे प्राथमिक मिशन सफल होता होता थोडक्यात हुकलं आहे, सूज्ञ राष्ट्रभक्त भारतीय मतदारांनी भारताच्या आत आणि बाहेर घोंगावणारं हे संभाव्य संकट सध्यातरी थोपवून धरले आहे, ज्यांनी ही राष्ट्रहितकारी कामगिरी केली आहे त्या मतदारांनी भारतातल्या समस्त मतदारांना अखंड सावधानतेचा संदेश दिला आहे, जागते रहो! तुफान आ रहा हैं! हिंदू हिंसक, नफरती नाहीत, हे राहुल गांधी यांना पक्कं ठावूक आहे, तरीही हिंदुंनी तसं होऊ नये यासाठी ते आरोप करत असतात; कारण हिंदू जर खरंच हिंसक, नफरती झाला तर आपलं सगळं 'मिशन' कोलमडून पडेल याची त्यांना जाणीव आहे. मोदीजी अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करत आहेत, विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी संवैधानिक संस्थांचा गैरवापर करत आहेत; मोदीजी बाबासाहेबांची घटना मोडित काढतील, लोकशाही व्यवस्था संपवतील, हुकूमशहा होतील वगैरे आरोप राहुल गांधी करत असतात; मोदीजी तसे नाहीत, पण मोदीजी खरोखरच तसे झाले तर 'राहुल मिशन'ला गाशा गुंडाळावा लागेल याची त्यांना जाणीव आहे!

सोनिया-राहुल-काँग्रेस परिवार जेव्हा केव्हा सत्तेवर येईल, तो कालखंड अत्यंत हिंसक असेल; २००४-२०१४ या सोनिया-संपुआ कालखंडांपेक्षाही महाभयंकर असेल, सुडाग्नीने पेटलेला-पेटवलेला असेल, आजची ममता राजवट फिकी वाटावी अशी परिस्थिती संपूर्ण देशभर असेल! २००४-२०१४ या दहा वर्षाच्या काळात भ्रष्टाचाराचे दररोज नवनवे विक्रम प्रस्थापित होत होते, दररोज कुठे ना कुठे आतंकवादी बॉम्बस्फोट करत होते, निरपराध लोक हकनाक बळी जात होते, देशाच्या सीमा सुरक्षित नव्हत्या, अर्थव्यवस्था डबघाईला आली होती, भारताची आंतरराष्ट्रीय पतप्रतिष्ठा कमालीची घसरली होती, सगळा देश नैराश्याच्या गर्तेत गेला होता! सगळं सगळं स्पष्ट आठवतय! (पूर्वार्ध)

▶ पान २ वरून

## वैराण वाळवंटातील मखमली हिरवळ!

याचवर्षी आलेल्या 'जान पहचान' या पडेल चित्रपटातील गीता दत्त यांच्यासमवेत गायलेले 'अरमान भरे दिल की लगन तेरे लिए है' हे मधाळ गीत अजूनही लोकप्रिय आहे. १९५० चे दशक खऱ्या अर्थाने हिंदी चित्रपट संगीताचे सुवर्णपान. याच दशकात तलत मेहमूद यांच्या मंद सुरांची आल्हाददायक आळवणी रसिकांना मदीर, मधुर रसात ओतप्रोत भिजवून गेली. १९५१ च्या 'आराम' चित्रपटात 'शुक्रिया ऐ प्यार तेरा शुक्रिया' हे गीत त्यांनी दस्तुरखुद्द पडद्यावर प्रस्तुत केले. पण, तलत मेहमूद यांच्या कातर, मुलायम व अंतःकरणात घर करणारा आवाज सर्वोत्तम ऐकू आला तो 'शामए-गम की कसम' या 'फूटपाथ' (१९७३) चित्रपटातील गीतात. पुढच्याच वर्षी आलेल्या टॅक्सी ड्रायव्हर (१९५४) चित्रपटात 'जाये तो जाये कहां' हे अविस्मरणीय गीत तलत मेहमूद यांनी प्रस्तुत केले. तर याच वर्षी आलेल्या 'अनहोनी' चित्रपटात 'मै दिल हूँ एक अरमान भरा' हे सुरेख पिआनो गीत त्यांनी प्रस्तुत केले. तलत मेहमूद यांना पडद्यावर चमकण्याचा अनिवार सोस होता. दिल-ए-नादान, डाक बाबू, वारिस, रफ्तार, दिवाली की रात, एक गाव की कहानी, लाला रूख, मालिक, सोने की चिडियां या चित्रपटातील त्यांच्या भूमिका फारशा गाजल्या नाहीत. 'हसले आधी कुणी, तू का मी (मोलकरीण)' हे मराठी चित्रपट गीत त्यांनी गायले होते. १९६५ सालानंतर सुगंध पसरवणारी उदबत्ती हळूहळू विझत जावी, तशी त्यांची कारकीर्द संपुष्टात आली. तदनंतर, खाजगी मैफिली व गाण्याचे कार्यक्रम करून ते रसिकांसमोर येत होते. 'जिसके पास दिल न हो, उसके लिये तलत नहीं है' ही उक्ती सार्थ करणारे, जीवनाच्या रखरखीत वाळवंटात हिरवळ फुलवणारा मंद परिमल, तलत मेहमूद.. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

▶ पान ४ वरून

## वस्तुनिष्ठ वाचन पाठ म्हणजे...


वाढते भागीदारी अशा वातावरणात महाविद्यालयीन शिक्षणाचे पदवी नसलेला एक तरुण आणि त्याच्यासोबत कष्ट उपसायची तयारी असलेला पण शिक्षक नसलेला भाऊ या दोघांच्या प्रयत्नातून मॅजेस्टिक प्रकाशन संस्था उभी राहण्याचा उल्लेख लेखकाने आवर्जून केलेला आहे. यातून कधी कधी शिक्षित माणसापेक्षा कमी शिकलेली किंवा अशिक्षित माणसे समाजासाठी ज्ञानाचे दालन खुले करून देतात हे स्पष्ट होते.

एकंदरीत सतीश काळचेकर यांच्या वाचणार्याची रोजनिशी या ग्रंथात भाषा आणि प्रमाण भाषा तसेच लोकभाषा, बोलीभाषा आणि विविध भाषेतील अनेक ग्रंथांची माहिती वाचताना मिळते, डॉ बाबासाहेब आंबेडकरांपासून, संत तुकाराम, वेद पुराण अशा सर्व विचारधरांना स्पर्श करा नेमके पुस्तक कोणते पुस्तक वाचावे. आणि त्यातून नेमकेपणाने काय शिकावे. या सर्व बाबींचा वस्तुनिष्ठ वाचन पाठ म्हणजे वाचणाऱ्यांची रोजनिशी होय.

# आपत्तीचे धडे

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २२७

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



जे पूर्वतयारी करण्यात अपयशी ठरतात, त्यांच्यासाठी आपत्ती हे सर्वाधिक मोठे संकट असते, या अर्थाचे इंग्रजीत एक विधान आहे.

मागील आठवड्यात क्राउड स्ट्राइक नामक वैश्विक सुरक्षा यंत्रणा पुरविणाऱ्या संस्थेच्या सॉफ्टवेअर अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेतील गोंधळामुळे जगभर संगणक प्रणालींची वाताहत झाली आणि हजारो व्यवसाय आणि लाखो ग्राहकांना त्याचा फटका बसला याचे उदाहरण अजून स्मरणात आहे. बँका, पर्यटन (विशेषतः हवाई वाहतूक) व्यवसाय आणि असंख्य गोष्टी ठप्प झाल्या आणि आपले या यंत्रणांवरील परावलंबित्व अधोरेखित झाले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी पुण्यातील एका समारंभात डॉ रघुनाथ माशेलकर यांनी एक विधान केले. काही वर्षांपूर्वी संसर्गजन्य कोरोनाने जगभर हाहाकार माजवायला काही महिन्यांचा काळ घेतला. पण कालच्या तंत्रज्ञानाधिष्ठित गोंधळाला जगभर पसरायला काही मिनिटे लागली आणि सगळे हैराण झाले. हे असं काही होऊ शकतं यावर क्षणभर कोणी विश्वासच ठेवला नाही आणि मग धावाधाव सुरु झाली. कसाबसा तो गोंधळ एकदाचा आटोक्यात आला आणि सगळ्यांनी सुटकेचा श्वास सोडला. त्याआधी तात्पुरते, लडखडते प्रयत्न जरूर झाले पण या संकटाची व्याप्ती इतकी होती की दुरुस्ती साठी अपरिहार्य उशीर होणार होताच.

या घटनेच्या नेमक्या दिवशी एका हॉटेलमध्ये वास्तव्यास असणाऱ्या एका गृहस्थांचा अनुभव अतिशय सकारात्मक आहे. ते म्हणतात- मी एका हॉटेलमध्ये विकेंड म्हणून सहकुटुंब राहायला गेलेलो होतो. हॉटेलमध्ये माझ्यासारख्या ग्राहकांची तुफान गर्दी होती. या पार्श्वभूमीवर बराच गोंधळ मला अपेक्षित होता. माझ्या एका मित्राने फोनवरून त्याच्या हॉटेलमधील विदारक परिस्थिती सांगितली होती. अक्षरशः त्याच्या हॉटेलच्या व्यवस्थापकाला प्रत्येक खोलीपर्यंत ग्राहकांना नेऊन स्वतः खोल्या उघडाव्या लागल्या होत्या. त्यामानाने माझ्या हॉटेलमध्ये कारभार बऱ्यापैकी सुरळीत सुरु असलेला दिसत होता.

त्या शनिवारी सकाळी मी जसा हॉटेलमध्ये प्रवेशलो तशा (माझ्या प्रघातानुसार) तेथील स्वागतिकेशी थोड्या गप्पा मारल्या. अरे,या एवढ्या मोठ्या खंडाचा तुमच्या सेवांवर फारसा फरक पडलेला दिसत नाहीए, तुम्ही खचितच नशीबवान आहात. ती म्हणाली- अगदीच तसं नाहीए. आमच्या संगणक प्रणालीला पुढील चोवीस तासांसाठी खोल्यांच्या नव्या चाव्या बनविणे जमणार नाही. पण हे आम्हांला आधीच माहित असल्याने आम्ही गांगरून गेलो नाही. औत्सुक्याने मी विचारले, तुमच्या कामांमध्ये काही व्यत्यय कसा आला नाही? सगळीकडे तर नुसती ओरड, हताशा ऐकू येतेय.

ती म्हणाली- सुरुवातीपासून आमच्या हॉटेलमध्ये अंगमेहनतीच्या/हाताने करावयाच्या कामांची कार्यप्रणाली आहे. प्रत्येक खोलीची मास्टर चावी स्वतंत्रपणे बनवलीय आणि त्यांची वेगळी नोंदवही आहे. वीजपुरवठा खंडीत होणे, माहिती- तंत्रज्ञानाच्या अचानक उद्भवणाऱ्या अडचणी आणि असेच इतर आगंतुक घोळ यासाठी आम्ही सदैव सुसज्ज असतो.

संस्कृतमध्ये याला अनागत विधातृ म्हणजे आपत्ती येण्यापूर्वीच निवारण प्रणाली तयार असणे असं म्हणतात. उदाहरणार्थ जुन्या काळी प्रत्येक अंगणात विहीर खणलेली असे. स्वाभाविकपणे घरोघर नळाने पाणीपुरवठा होण्याचे दिवस अद्याप दूर असताना, दैनंदिन गरजेच्या पाणी वापरासाठी अंगणात पाणीसाठा असणे हे अपरिहार्य असायचे. पण अचानक घराला जर आग लागली तर ती विझविण्यासाठीही विहिरीची मदत व्हायची. आग लागल्यावर विहीर खणायची या परिचित म्हणीचे उगमस्थान हे असावे. नाहीतर विहीर खणून होईपर्यंत घर अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडायचे. असे अनुभव वारंवार येत असतात. विचारवंत आणि जागतिक नेते अशा संभाव्य धोक्यांना हेरून आपापल्या संघांना सुसज्ज ठेवत असतात. जे तयार नसतात त्यांना संकटे विषमपणे बाधित करतात.

जागतिक पुरवठादारांच्या साखळ्या निर्माण होण्यापूर्वीची गोष्ट- समशीतोष्ण कटिबंधात राहणाऱ्या वसाहतींना दरवर्षी हिवाळ्याला तोंड देण्यासाठी जय्यत तयारी करावी लागत असे. अति शीत लहरी सुरक्षा बाधित करीत असत आणि बऱ्याच ठिकाणच्या अन्नसाखळीला प्रभावित करीत असत. मग काय, उन्हाळ्यातच भावी हिवाळ्याची तरतूद करून ठेवावी लागत असे- अन्न, थंडीचे कपडे, उष्णतेची बेगमी (हिटर्स, लाकडे) आणि थंडीला तोंड देऊ शकतील असे इतर आवश्यक साठे.

भलेही आज आपण कोविडचा धोका टळला म्हणून सुस्कारा सोडत असू पण जगाच्या पाठीवर अजूनही कोठे ना कोठे ते आव्हान अस्तित्वात आहेच. आजही भारतात आणि अमेरिकेत कोरोनाची लागण झाल्याचे ओझरते वृत्त येत असते. त्या कालखंडाने अनेकांना आर्थिक दृष्ट्या नागवले आहे. अर्थशास्त्रातील चढउताराचे चक्र आपणांस ऐकून माहित असते. पण भरभराटीच्या कालखंडात आपल्याला त्या वेदनांचा सोयीस्कर विसर पडत असतो हेही तितकेच खरे. कोठल्याही क्षणी आपली समाजव्यवस्था घसरणीला लागू शकते आणि त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी लागणारी तयारी हमखास दुर्लक्षिली जाते.

उत्पन्नातील विषमता हा जगासमोर आ वासून उभा असलेला राक्षस आहे. बऱ्याचजणांना अतिशय कमी वेतनावर काम करण्याची वेळ परिस्थिती आणते आणि समोर भरलेलं ताट येण्यासाठी त्यांचे संपूर्ण वेतन महिनाखेरी संपते. कधी अचानक आरोग्याची बिले तर कधी कौटुंबिक अनपेक्षित घाले ज्यामुळे त्यांना आर्थिक चणचण भेडसावते. स्वतःचा दोष नसला तरीही अशा व्यक्तींना सध्या स्वतःच्या भोवती आर्थिक सुरक्षेची जाळी बांधता येत नाही आणि त्याचा परिणाम त्यांच्या तनामनावर होताना दिसतो.

या विरुद्ध काही मंडळी शक्य असूनही आर्थिक भवितव्याची तरतूद करताना टाळाटाळ करतात. तात्काळ समाधान आणि अनावश्यक खरेदी या दुष्टचक्रात सापडलेल्या असंख्य मंडळींना आजकाल ती बिले भरण्याचीही वानवा उद्भवते. उदाहरणार्थ अमेरिकेतील एक ताजा अहवाल सांगतो, वर्षाला दीड लाख डॉलर्स उत्पन्न असलेली मंडळीही एखाद्या अनपेक्षित फटक्याने कंगाल होतात कारण त्यांनी आणीबाणीसाठी काहीही आर्थिक नियोजन केलेले नसते.

कोणे एके काळी आपण कोठलीही खरेदी करण्यापूर्वी आर्थिक बचत/तरतूद करीत असू. आज त्या सवयीच्या जागी कर्जाचे हप्ते आणि खरेदी केलेल्या वस्तूंसाठी पैशांचा भरणा हेच चित्र तयार झालेले आहे. आर्थिक क्षमता नसतानाही आजकाल समाजात आपली पत उजळावी म्हणून कार विकत घेतली जाते, क्रेडिट कार्डच्या भरवशावर परदेशात वारी केली जाते आणि किमान सहा ते आठ महिन्यांच्या बचतीचा पर्याय नजरेआड केला जातो. आर्थिक सल्लागार सुचवितात की अचानक येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी (न सांगता कामावरून कमी केले जाणे, अचानक कुटुंबासाठीचे खर्च उद्भवणे) किमान वर्षभरासाठी पुरेल इतकी आर्थिक बचत करावी. पण अडचणीच्या वेळी आपले पर्याय त्वरित पणाला लावले जातात आणि आपण इतरांच्या चेहेऱ्याकडे मदतीसाठी बघतो. कोणताही व्यवसाय जर तंत्रज्ञानावर प्रचंड अवलंबून असेल आणि त्याच्या पाठीशी मॅन्युअल आधार नसेल तर अशा अडथळ्यांचा त्याच्या कार्यावर परिणाम होतोच.

मागील आठवड्यातील संगणकीय खंडामुळे मायक्रो सॉफ्टच्या कमाईचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान झाल्याचा अनधिकृत अहवाल आलाय. वर्तमानपत्रात एक वृत्त नुकतेच वाचनात आले. सर्व्हर डाऊनमुळे वीसहून अधिक आस्थापनांच्या कामाला लकवा. आठ लाखांवर दाखले प्रलंबित. नागरिकांना जलद सेवा मिळावी म्हणून सरकारकडून चालविल्या जाणाऱ्या सरकारी आस्थापनांचे संकेतस्थळ कूर्मगतीने सुरु आहेत आणि सर्व्हर्ची क्षमता कमी असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. असे परावलंबित्व वारंवार आपल्या वाट्याला येत असते. काही समस्या टाळता येण्याजोग्या नसतातच, पण क्राऊडस्ट्राईकची घटना एका तथ्याकडे बोट दाखविते. भविष्यवेधी विचार, नियोजन आणि प्रशिक्षण यांच्या मदतीने आपत्ती निवारण आवाक्यात येऊ शकते.

सध्या अतिवृष्टी आणि तिचे नागरी समस्यांमध्ये झालेलं रुपांतर याच विषयाकडे अंगुलीनिर्देश करते. रोज प्रत्येक गावी महापुराचे वृत्त, जीवितहानीचे आकडे विषण्ण करतात. माझा एक मित्र म्हणाला, रोज रोज बी पॉझिटिव्हचे संदेश वाचून मी आता वैतागलोय. थोडे दिवस सी निगेटिव्ह चे संदेश वाचावे म्हणतोय, बदल म्हणून! शेवटी सतत नकार ओझे बनून आदळत असतील तर माणूस करवदणारच.

अशा आणीबाणीच्या वेळी रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग याच वृत्तीने सामना करायचा असतो-

**(१)** कायम सगळं तुमच्या मनासारखं घडत राहील असे गृहीत धरू नका. फार अपेक्षा न ठेवता परिस्थितीला हाताळायला शिकणे फार आवश्यक असते. तुम्ही एखादे व्याख्यान आयोजित केले तर सभागृह श्रोत्यांनी भरून जायचे असे दिवस आता गेले. मोजून मापून ५०-६० श्रोते आले तरी बख्खळ अशी सध्या अवस्था सर्वदूर आहे. तुमच्या सुदैवाने हा आकडा ओलांडला गेला तर तुमचे नशीब.

आजच्या युगातील चिंताग्रस्तता आणि मानसिक आरोग्याच्या बहुतांशी समस्या आपल्या अपेक्षा आणि त्यांची पूर्ती यामधील अंतरामुळे उदभवतात. परीक्षेतही आपण नकळत लहानग्याच्या मनावर मार्कांचे दडपण ठेवतो आणि ते साध्य झाले नाही की होणाऱ्या बिघाडांना सामोरे जायची कोणाचीही तयारी नसते. सगळं सोप्पं, सुलभ, त्वरित आणि मनाजोगतं व्हायलाच पाहिजे असं आयुष्य नसतं. हे भ्रम तंत्रज्ञानाच्या वेगाने आणि सुधारणांनी आमच्या मनात पैदा केले आहेत. प्रत्यक्षात गोष्टींना आपापली गती असते. आपल्या पूर्वजांसाठी बरेचदा हातावर पोट असताना दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत असे त्यामानाने सगळं काही परिपूर्णच असावं असा अट्टाहास धरणारी आजची पिढी खरोखरीच सुदैवी आहे.

**(२)** आपल्या नियंत्रणातील कृतींवर ध्यान केंद्रित करावे. व्यवसाय आणि ग्राहक यांच्या दृष्टिकोनातून बघायचे असेल तर संकटकाळी आपल्या आवाक्यात नसलेल्या गोष्टी प्रयत्नपूर्वक नजरेआड कराव्यात. २०२० मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव झाला आणि जवळजवळ प्रत्येक हॉटेल बंद ठेवावे लागत असे. सुरू ठेवले तरीही लॉक डाऊनमुळे ग्राहक हॉटेलकडे फिरकत नसत. हा संसर्गजन्य विषाणू आपल्या कोणाच्याही नियंत्रणात, सुरुवातीला तरी नव्हता. अशावेळी एकतर शटर ओढून निवांत बसायचे आणि परिस्थिती पूर्वपदावर येण्याची प्रतीक्षा करायची एवढेच बहुतांशी व्यावसायिकांच्या हाती/नशिबी होते. काहींनी हाताशी असलेल्या पर्यायांचे प्रयत्नांमध्ये रूपांतर करण्याचे ठरविले. मग घरपोच डबे पोहोचविणे, कोरड्या वस्तू विकणे असे नवे मार्ग चोखाळले. आपल्या नियंत्रणात असलेल्या गोष्टींवर प्रयत्न केले तर फळ सुमधुर मिळण्याची शक्यता वाढते.

**(३)** ऊन पडलेले असताना गळके छप्पर दुरुस्त करावे. हा पूर्वापार चालत असलेला प्रघात दुर्दैवाने आजही संस्था आणि खूपशा व्यक्ती पाळत नाही. बरेचसे नेते असं मानून चालतात, गृहीत धरतात. सगळं आपोआप चांगलंच होईल, जसं याआधीही झालंय. आपल्याला सत्कारणी लावता येतील अशा अनुकूल संधींचा वापर भविष्यातील परीक्षा घेऊ शकणाऱ्या प्रसंगांमध्ये स्वतःला किंवा स्वतःच्या संघांना सुरक्षित ठेवण्यासाठी ते करीत नाहीत.

सुसज्ज असलेल्या व्यक्तीला नशीबही साथ देतं असा एक संकेत आहे. नशीब अनुकूल अथवा प्रतिकूल असणे हे प्रत्येकाच्या वाट्याला येत असते. फरक इतकाच की काही मंडळी आपल्या समस्या सोडविण्यासाठी चांगल्या दिवसांची प्रतीक्षा करतात आणि पाऊस थांबला की गळती आपोआप बंद होईल असे मानून चालतात. दुर्दैवाचा फेरा आलाच तर सकारात्मक मंडळी पूर्वतयारीच्या आधारे त्याचे दुष्परिणाम घटविण्याच्या मागे लागतात. समोर संधी चालून आली तर तिचा स्वतःच्या फायद्यासाठी कसा वापर करता येईल याचा विचार करतात आणि लगेच ते कृतीत उतरवितात.

व्यक्तिगत अथवा व्यावसायिक यश आपल्या नियतीवर आणि प्रतिकूलतेवर मात करण्यात एकसमान सामावलेले असते. संगणकीय हाहाकारामुळे पुन्हा एकदा सिद्ध झालंय. जग जरी दिवसेंदिवस अंकीय (डिजिटल) प्रणालीकडे जात असले तरीही सोबत एनॅलॉग कार्यप्रणाली सोबत बाळगावी.

थोडक्यात आजच्या ओला/ उबेरच्या जगात ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी लागणारे अँप भ्रमणध्वनीवर असावे तितकेच खिशात खुळखुळणारे सुट्टे पैसेही (मोड) बाळगावेत. काय चुकू शकते याचा अदमास घेऊन आपण आधीच तयार असलो तर आपत्ती व्यवस्थापन हाताळू शकतो. बेंजामिन फ्रँकलिन म्हणतो तसे- नियोजन न करण्याचे अपयश म्हणजे आपण केलेलं अपयशाचं नियोजन!

कोरोना, महापूर, भूकंप, युद्ध अशा आपत्तींना व्यक्तिगत पातळीवर तोंड देता येत नाही, म्हणून आपण सरकारकडे आशेने पाहतो. पण सरकारी यंत्रणा आधीच नुकसानीत आहेत आणि आणखी कर्जाच्या बोझ्याखाली त्यांना वाकावे लागणार असते. हवे तितके पैसे ते सहजगत्या छापू शकतात आणि अशा आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड देऊ शकतात पण भविष्यातील दुष्परिणामांचे काय?

चक्र वरखाली फिरणार आहे हे आधीच माहिती असतं मग आपण तयारीनिशी या चक्राला सामोरे कां जात नाही? भविष्यातील अडचणींवर मात करताना आपला आवडीचा दोषारोपाचा खेळ किती काळ खेळत राहणार? कायम बाह्य घटकांवर आपले अपयश ढकलणे म्हणजे स्वतःच्या जबाबदाऱ्यांपासून सुखरूप पळून जाण्यासारखे नाही कां? परिस्थितीपासून शिकायचे कधी? अविनाश धर्माधिकारी यांची या विषयावरील छोटीशी रचना-

**नख्या रोवाव्यात जमिनीत खोल**
**अन मान ठेवावी ताठ ।**
**क्रूरच असतील कर्मभोग तर**
**बळकट व्हावेत हात ।।**

# ‘आजीचा बटवा’ पुन्हा घरोघरी सुरू व्हावा!



आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

अ मंत्रं अक्षरं नास्ति, नास्ति मूलं औषधः अयोग्य. स्त्री- पुरूष नास्ति, योजक तंत्र दुर्लभः मंत्र नाही असे अक्षर नाही, प्रत्येक वनस्पती औषधी असते. अयोग्य स्त्री- पुरूष नसतात तर योजक दुर्लभ असल्याने कोणतेही कार्य सातत्याने होत नाही, हेच खरे दुर्दैव आहे. पूर्वी घरोघरी ‘आजीचा बटवा’ सुरू होता. आजी-आजोबांना बहुगुणी झाडपाल्यांची, वनोषधांची माहिती होती. घरातील लहान थोरांच्या किरकोळ आजारांवर वनौषधींचा वापर केला जात होता. आता अशी माहिती अनेकांना नाही. माहिती नाही, त्यामुळे वनौषधींद्वारे उपचार नाहीत. बहुगुणी वनौषधींचा प्रचार, प्रसार व वापर घरोघरी अधिक व्हायला हवा. जाणकारांनी आपल्या जवळील वनौषधी ज्ञानाची माहिती दुसर्यांना द्यायला हवी. दुसर्यांजवळील अशी माहिती आपणही घ्यायला हवी. वनौषधी ज्ञानाचे अदान-प्रदान केले तर घरोघरी पुन्हा ‘आजीचा बटवा’ सुरू करता येईल. ‘आजीचा बटवा’ पुन्हा सुरू व्हावाही आज काळाची नितांत गरज आहे.

वनौषधी परिचय शिबिरे, वनौषधी प्रदर्शने, वनौषधी उद्याने, परसबागा, व्याख्याने याद्वारे वनौषधींचे ज्ञान जनतेत गेले तर वनौषधी उपलब्धतेसाठी वृक्षारोपन होईल. पर्यावरणाचेही संवर्धन, संरक्षण होईल. वनौषधी सहजासहजी उपलब्ध झाल्या तर त्यांचा औषधांसाठी निश्चित उपयोग होईल.

याबाबत भूमंडलात धत्ते शैलेवन काननम्! तावत तिष्ठांति मेदिन्या, संतती पुत्र पौतृकी! देहन्ने परमस्थानम्! यत सुरैरवि दुर्लभम्! प्राप्तीनी पुरूषी नित्यं महामाया प्रसदत्तः!! जोपर्यंत या जगात या पृथ्वीवर पर्वत, वने, नद्या, सरोवरे, उद्याने आहेत. तोपर्यंत तुम्ही आणि आम्हीही, तुमची, आमची मुले, नातवंडे, पतवंडे सुखाने जगतील. त्यांना हा विचार समजेल, त्यांना महामायेच्या आदिशक्तीच्या म्हणजेच निर्सगाच्या प्रसादाने देव दुर्लभ असे परमस्थान प्राप्त होईल, असे वराह पुराणात म्हटले आहे. वेद हा सर्व जगाचाच ज्ञानविज्ञान रूपी ठेवा आहे. आपल्या चार वेदात तसेच अरण्यक, उपनिषदादि वाङःमयात वनस्पतींचा उल्लेख विस्ताराने आला आढळतो. वेद मंत्रात शेकडो वनौषधींचा उल्लेख असणारे श्लोक आहेत. रूग्वेदात वनोषधी या माता आहेत, त्यांच्यामध्ये

## श्रावणातील पहिली शिवामूठ- तांदूळ

लालन, पालन, संरक्षणादि गुण आहेत. असे म्हटले आहे.

आयुर्वेद हे निव्वळ वैद्यकशास्त्र नसून ती एक जीवनशैली आहे. आयुर्वेद हे शास्त्र उपवेदच आहे. पूरक सहितेत एक हजार आठशे वनौषधींचा उल्लेख आहे, जगात सुमारे पाच हजार वनस्पतींची नोंद शास्त्रज्ञांनी केली आहे.

दुषित हवा, दुषित पाणी, दुषित आचार विचारांमुळे बिघडलेल्या पर्यावरणाची सर्वात जास्त झळं आपल्या जगण्यालाच बसली आहे. वृक्षारोपन, वनसंर्वधन, नक्षत्र वने, परसबाग, वनौषधी परिचय शिबिरे आदि द्वारे वनसंपदा वाढीस चालना दिली पाहिजे. वृक्षारोपन हे एक फॅ, प्रसिध्दी स्टंट झाले आहे. खड्डे तेच, लावणारेही तेचं पण दरवर्षी नवीन रोपे अशी शोकांतिका झाली आहे. पृथ्वीच्या रक्षणासाठी अरण्ये तोडू नका, असे यक्ष पुराणात म्हटले आहे. एकूण भूभागाच्या ३३ टक्के जमीन वनसंपदेनेयुक्त असावी. आपल्या भारतात हे प्रमाण १३ टक्क्यांवर आले आहे. एक मूल एक झाड ही योजना कधीच साकारली नाही. आपला एक चतुर्थांश भारत देश वाळवंट बनला आहे. आपल्या भारतात दरवर्षी अंत्यसंस्कारासाठी ७५ लाख झाडे तोडली जातात. झाडांवर प्रेम नाही. तर झाडांखाली कित्येकवेळा फसवे प्रेम केले जाते.

गुजरातेत जन्मलेले स्व.हरिचंद मेहता यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी वनोषधी प्रचारासाठी ट्रस्टची स्थापना केली. वनोषधी प्रदर्शने, शिबिरांद्वारे वनौषधींचे ज्ञान दिले. १९७६ पासून त्यांच्या ज्ञानाचा मला फायदा झाला. सोलापूर समाचार, दैनिक तरूण भारत, दिनदर्शिका, प्रदर्शने, व्याख्यानांद्वारे हे ज्ञान जनतेपर्यंत नेले आहे. १९८६ पासून तरूण भारतमध्ये ‘आजीचा बटवांचे’ दीड- दोनशे लेखांक प्रसिध्द झाले. शंभराहून अधिक वनौषधी प्रदर्शने भरविली. जनतेच्या आग्रहास्तव उद्याच्या पहिल्या श्रावणी सोमवारपासून पुनश्च आजीचा बटवा प्रसिध्द करीत आहे. चांगल्या आरोग्यासाठी, वनसंपदेसाठी ह कार्य निश्चित लाख मोलाचे ठरेल. असो!

### पहिल्या श्रावणी सोमवारची शिवामूठ - तांदूळ

आपल्या हिंदू संस्कृतीत व्रतांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. व्रताचा संबंध कुटूंब, संस्कृती आणि समाज यांचेशी तर आहेच पण त्याहून अधिक संबंध मानवी देहाचे व मनाचे आरोग्य यांचेशी आहे. श्रावण श्री शिवशंकराच्या उपासनेचा, सणावारांचा, व्रतांचा महिना. श्रावणातील शिवमुष्ठि म्हणजे शिवामूठ, श्रावणी सोमवारी करण्याचे व्रत आहे. नवविवाहित वधुवरात विचार, आचारांचे मतैक्य व्हावे, संसार सुख लाभावे, या हेतूने शिवपिंडीवर शिवामूठ वाहण्याची प्रथा आहे. पहिल्या श्रावणी सोमवारी तांदूळाची शिवामूठ अर्पण करावयाची असते. तांदूळास



केवळ धार्मिक कार्यातच नव्हे तर आपल्या आहारातही मोठे महत्त्व आहे. आपली कोणतीही पूजा अक्षता शिवाय पूर्ण होवूच शकत नाही. तांदूळ हा गहन विषय आहे. आहारात भात आवडीने खाल्ला जातो. इडलीने तर देश, परदेशात मान्यता मिळविली आहे. आहारशास्त्राप्रमाणे आयुर्वेदातही तांदळाचे महत्त्व आहे.

### तांदळाचे औषधी उपयोग-

तांदूळ स्निग्ध, रूचिकर, ज्वर आदि त्रिदोष नाशक आहे. तांदूळाची पेज लहानांना, वृध्दांना उपयुक्त आहे. पावसाळ्यात पायांना चिखल्या होतात. त्यावर भाताचा पेंढा जाळून पायांना धुरी द्यावी. किंचित भाजलेले तांदूळ व मूग समान घेऊन १४ पट पाणी घालून शिजवावे. शिजतेवेळी त्यात हिंग, सैंध, धणे, सुंठ, मिरे, पिंपळी घालून पेज काढावी. ही पेज ज्वर, वात, कफ हे त्रिदोष नाशक आहे. रक्तवर्धक आहे. मूत्रेरचनासाठी तांदळाच्या धुवणात साखर व सोरामिठ घालून द्यावे. तृषा रोगावर तांदळाच्या धुवणात मध घालून पिण्यास द्यावे. अग्निदाह व्रणावर साळीचा कोंडा जाळून त्याची राख वस्त्रगाळ करून तूपात खळून लावावी. अर्धशिशीवर सूर्योदयापूर्वी दोन मुठी साळीच्या लाह्या मधाबरोबर खाव्यात व झोप घ्यावी. दिवाळीत आपण पुजेत साळीच्या लाह्या ठेवतो. लाह्या समृध्दीचे प्रतिक आहे. दाह शमन होण्यासाठी साळीच्या लाह्या व खडीसाखर एकत्र करून काढा तयार करावा. उन्हाळी लागल्यास चिमूटभर तांदूळ चावून खाऊन थोडे पाणी प्यावे. महिलांच्या श्वेत प्रदर रोगात (पांढरी धुपणी) तांदळाचे धुवण जिरे आणि गेरू चूर्णासमवेत द्यावे. तांदळास संस्कृत- शालि, हिंदी- चावल, गुजराती- चोखा, डांगर, इंग्रजी- राईस, पॅडी आदि नावे आहेत. पहिल्या श्रावणी सोमवारनिमीत्त तांदळाची ही शिवामूठ श्री शिव पार्वती चरणी अर्पण!!

# देवाचा न्याय

जुई आज आनंदात होती. तिची अनेक वर्षांची सुप्त इच्छा आज पूर्ण होणार होती, वडिलांना भेटण्याची! कसे असतील आपले वडील? आपल्याला ओळखतील का? कधीतरी फोटोत पाहिलेले पुसटसे. फार काही आठवत नव्हतेच तिला. काय म्हणायचे त्यांना बाबा की दादा? कसा असेल हा माणूस ज्याने अजाणत्या वयात आपल्याला आणि आपल्या बहिणीला खुशाल वाऱ्यावर सोडून दिले. असे का बरं केले त्यांनी? हळूहळू असंख्य विचारांनी तिचे डोके भणभणायला लागले. इतके प्रश्न पडू लागले की, वाटले भेटूच नये या माणसाला. पण मग इतकी वर्षे मनात बोचत असलेला सल निघालाच नसता.

जुईला आठवले, ती जेमतेम सात वर्षांची आणि जाई दहा वर्षांची! एक साधी भोळी, निर्मळ मनाची तिची आई जयश्री सरनाईक, तिला सोडून देताना काहीच कसे वाटले नाही या माणसाला? खुशाल दुसऱ्या बाईबरोबर संसार थाटला. जाई थोडी मोठी असल्या कारणाने तिची रवानगी मामाकडे झाली आणि जुईची रवानगी एका दूरच्या काकांकडे झाली. त्याकाळी स्वतःच्या मुलांमध्ये एखादं जास्तीचं मूल मोठे करणे, त्याचे पालन-पोषण करणे सहज मान्य असे. मात्र, जुईला कायम आश्रितासारखे राहावे लागे. ती कायम एखाद्या ओझ्याखाली दबलेली अशी वावरत असे. आता कळतंय, किती वेदनादायी असेल हे सारं त्या माउलीसाठी... माझ्या आईसाठी. जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेली आणि बारा वर्षे संसार केलेली आई अचानक दोन मुलींसमवेत एकटी निराधार झालेली. अनेक कष्ट करून तिने डी.एड चा कोर्स पूर्ण केला. त्यानंतर एका लहानशा खेडेगावातील शाळेत नोकरी करू लागली. एकटे राहायचे आणि कसेबसे रेटायचे. काय तर म्हणे हे माझे वडील, जयदेव सरनाईक खूप शिकलेले मोठ्या हुद्यावर आणि बिचारी माझी आई अडाणी जेमतेम शिकलेली. समाजात कसे वावरायचे याचे भान नसलेली. गोष्ट तशी जुनीच; त्या जमान्यात एखाद्या बाईला जर नवऱ्याने सोडले किंवा टाकले म्हणा हवं तर, कायद्याने भांडून आतासारखी लक्षावधी रुपयांची पोटगी मिळत नसे. साऱ्या दडपणांमुळे अकाली प्रौढ झालेली जाई, कसेबसे शिक्षण करून नोकरी करू लागली आणि तिचा स्वभाव अतिशय बंडखोर झाला. जगाचे क्रौर्य तिने फार जवळून अनुभवले होते. जुई मात्र जात्यात हुशार, उंच, देखणी पण अबोल आणि हळवी. बुद्धीचे लेणे वडिलांकडून मिळालेले, ती शिष्यवृत्ती मिळवून भराभर शिकत गेली. जाई-जुईची आई सतत एक परित्यक्ता असल्याचा अपराध बोध घेत जगणे रेटत राहिली. त्यातून ती कधीच बाहेर पडू शकली नाही. ती सक्षम होऊन आपल्या पायांवर उभी राहिली; मात्र दोन मुलींचा सांभाळ करण्याएवढी ताकद त्या तुटपुंज्या पगारात नव्हतीच. आपला बाप म्हणविणारी ही व्यक्ती कोणत्या स्वरूप सुंदरीमुळे आपल्या आईला सोडून गेला, हे जेव्हा पाहिले, तेव्हा तर जुईला स्वतःचाच राग आला. हा कोणता मोह? कोणत्या पातळीवरचा? दोन लहान मुली असताना? हे असे कसे? काही प्रश्नांना उत्तरे नसतात हेच खरे!

काय तर म्हणे ती वागण्या-बोलण्यात खूप चटपटीत होती. आपले बालपण नासवणाऱ्या त्या बापाला जुई आज भेटणार होती. प्रसंग अगदी कथेत शोभणारा होता. ज्या संस्थेमध्ये हा तिचा पिता सर्वेसर्वा होता, त्याच संस्थेमध्ये जुईने पुढील उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. जुईच्या मैत्रिणीने हळूच बोट दाखविले. ‘‘ही बघ सरांची केबीन.’’ ‘‘मी... मी... जुई जयदेव सरनाईक..’’ ती चाचरत बोलली... ‘‘मी जुई, तुमची मुलगी!’’ हे नाव ऐकताच ते दचकले. त्यांच्या डोळ्यात आश्चर्याचे भाव दाटले. ‘‘तू इथे?’’ त्यांनी विचारले. ‘‘होय, मी इथे पुढच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतलाय.’’ जुईने त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिले व टेबलावरच्या त्यांच्या दुसऱ्या बायकोचा आणि लेकीचा आनंदी चेहरा पाहून तिच्या मनातल्या हळव्या भावनांना नकळत एक धार प्राप्त झाली. ती अत्यंत कोरडेपणाने म्हणाली, ‘‘सर, इंटरव्ह्यू सुरू करू या...’’ या तिच्या वाक्यावर जयदेव सरांच्या चेहऱ्यावर लाचारी, अपराधीपणाची भावना उमटली. जुईच्या डोळ्यापुढे तिच्या आजवरच्या आयुष्यातील होरपळ व असंख्य काळ्याकुट्ट आठवणी घोंघावू लागल्या. आणि तिने मनात म्हटले. ‘‘हा खरा देवाचा न्याय.’’

रश्मी वाघमारे

विशेष

**प्रा. मुकुंद गायकवाड**

# पाऊस पडतोय; जलधोरण हवे



गेल्या तीन वर्षांमध्ये देशात कमी पाऊस झाला. यावर्षीही अजून सरासरीपेक्षा कमीच पाऊस झाला आहे. भूगर्भातील पाणी पातळी कमालीची खालावलेली आहे. राज्यात अजूनही म्हणावा असा सर्वदूर पाऊस झालेला नाही. कोकण, मुंबई, मराठवाड्याचा काही भाग आणि सोलापूर, परभणी जिल्ह्यात जोरात पाऊस झाला आहे. महाराष्ट्राच्या उर्वरित भागात चांगल्या पावसाची अपेक्षा आहे. राज्यातील धरणांमध्ये अजूनही पाणीसाठा कमीच आहे. गोसेखुर्द, तापी वगळता राज्यातील उर्वरित नद्यांना अजूनही अपेक्षेइतके पाणी नाही.

घोडनदी, गोदावरी, मुळा, प्रवरा आदी नद्यांना पहिले पाणीही गेलेले नाही. पाऊस ढगफुटीसारखा होतो. त्याचे पाणी साठवता येत नाही. काही ठिकाणी तर अजून पाऊसच झालेला नाही. पाणी साठवायचे कसे, असा प्रश्न आहे. जायकवाडी, उजनी, कोयना ही मोठी धरणे अजूनही भरलेली नाहीत. भूगर्भातील पाण्याची पातळी पाहता जलशिवार योजनेकडे झालेले दुर्लक्ष किती किंमत मोजायला लावते, हे स्पष्ट दिसते. पाणलोट क्षेत्रनिहाय पडणाऱ्या पावसाचा विचार न करता केलेले पीकनियोजनही भूगर्भातील पाण्याच्या मुळावर आले आहे. भूगर्भाची चाळण होऊनही सरकार त्याबाबत काहीच करत नाही. कूपनलिका आणि विंधन विहिरी खोदण्याची जणू स्पर्धा लागली आहे. पिके जगवण्यासाठीच्या स्पर्धेत भूगर्भातील पाण्याचा अनिर्बंध उपसा केला जात आहे. त्यावर ना प्रशासनाचे नियंत्रण आहे ना धोरणकर्त्यांचे. या पृष्ठभूमीवर आता पाऊस पडला तसं पाणी वाहून गेलं. भुईच्या पोटातील तृष्णा इतक्यात भागणार नाही. मधून मधून असाच पाऊस पडावा लागेल.

धरणांच्या पाणलोट क्षेत्राप्रमाणेच लाभक्षेत्रातही पाऊस व्हावा लागेल. नदी, नाले, ओढे, प्रपात तुडुंब भरून वाहावे लागतील. एव्हाना काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे नुकसानीच्याही बातम्या येत आहेत. पाऊस कोसळतो तशाच दरडीही कोसळतात. राज्याच्या राजधानीशी संपर्क तुटल्याचे जाहीर होते. शहरांमध्ये पाणी शिरते. लोकांना स्थलांतर करण्याचे इशारे दिले जातात. जनजीवन ठप्प होते. पर्यटनस्थळे गर्दीने फुलून जातात. धबधबे, प्रवाह उत्साही लोकांचा बळी घेतात.

नेहमीच्या पावसाचे दृश्य आणि त्यासंबंधीची वृत्ते यायला लागली की जणू चैतन्याचा पाझर फुटतो. सृष्टी तर मोहरून निघाली आहे. भूगर्भाच्या वरच्या थराची तृष्णा तरी भागली आहे. तिचे सध्याचे दर्शन सर्वांना हवेहवेसे वाटण्यासारखे आहे.

धबधब्याखाली चिंब भिजण्याचा आनंद छोटे-मोठे सर्वच घेत आहेत. धरणांना निळ्याशार जलाशयाऐवजी मातीयुक्त गंध असलेल्या पाण्याचा स्पर्श झाल्याने पाण्याचा रंग थोडासा बदलला आहे. अर्थात मोठी जलाशये त्याला अपवाद आहेत. पाऊस पडत असला, तरी अजूनही शेतीमालाच्या भाववाढीचा आलेख खाली आलेला नाही.

राज्यातील पिकाखालचे क्षेत्र यावर्षी वाढणार असल्याने जादा उत्पादनाची अपेक्षा आहे. त्यामुळे भावही खाली येतील; परंतु हा अंदाज थोडा लवकर मांडल्यासारखी परिस्थिती आहे. पुढचे दोन महिने वेळेवर पाऊस पडावा लागेल. त्यात अंतर पडता कामा नये तसेच अतिवृष्टीही होता कामा नये. तसे झाले तरच शेतकऱ्यांना जादा उत्पादन घेता येईल आणि ग्राहकांना रास्त भावात शेतीमाल मिळेल. अर्थात हा 'जर-तर'चा प्रश्न आहे. रिझर्व्ह बँक आणि सरकारने पाऊस पडता झाल्याने सुटकेचा काहीसा निःश्वास टाकला असला, तरी चिंता अजून दूर झालेली नाही.

आशेचे ढग आणि पावसामुळे सध्या शेअर बाजारात वेगळेच चैतन्य आहे. काही दिवसांपूर्वीच भेसूर आणि चिंता वाढवणारे याबाबतचे चित्र लगेच कसे आशादायी आणि उल्हास वाढवणारे झाले आहे, हे आपण सर्व पाहतच आहोत. या चित्रामुळे एक गैरसमज मात्र होण्याची शक्यता आहे. तो वेळीच दूर न केल्यास या आनंददायी चित्रातून आपण पुन्हा दुःखदायी चित्राकडे कधी प्रवास करू हे लक्षातही येणार नाही.

सध्या वातावरण कितीही आल्हाददायी असले तरी भूमातेची ओंजळ रिकामी आहे. ओंजळ रिकामी असेल तर आपण ती भरून घेण्याचा प्रयत्न करतोच ना? तसे आताही करायला हवे. मध्य महाराष्ट्र, कोकणासह राज्यात अनेक ठिकाणी पाऊस पडत आहे. चिंचवड, परभणी, सोलापूरसारख्या काही भागात ढगफुटी झाली. पुण्यात काही तासात चार इंच पाऊस झाला. मुंबईत तर अवघ्या काही तासांमध्ये १२ इंचांहून अधिक पाऊस झाला. असे असले तरी पुणे, नाशिक, नगर, सातारा जिल्ह्यातील धरणे अजून भरली नसल्याने त्यांचे लाभक्षेत्र आणि या धरणांवर अवलंबून असलेली खालची धरणेही पावसाची आणि पुराची वाट पाहत आहेत.

खालच्या भागातील धरणे भरली तरच वरच्या भागातील धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकरी सुटकेचा निःश्वास टाकतात. त्याचे कारण खालच्या भागातील धरणे रिकामी राहिली तर ३० सप्टेंबरनंतर समन्यायी पाणीवाटपाच्या नावाखाली वरच्या भागातील धरणे रिकामी केली जातात. सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांमधील प्रपात पाहताना निसर्गाच्या चमत्काराचा प्रत्यय येतो आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक नद्यांच्या पात्रांना पाण्याचा स्पर्शही झाला नव्हता.

काहींच्या पात्रांचा वापर तर फक्त जायकवाडी आणि उजनीला पाणी सोडण्यासाठीच झाला होता. नीरा, कऱ्हा, घोडनदी, सीना, मुळा, प्रवरा, गोदावरी आदी नद्या अजूनही कोरड्याच आहेत. पुण्यातून वाहणारी मुळा-मुठा, इंद्रायणी, पवना, कुकडी अशा कितीतरी नद्यांमध्ये अपेक्षित पाणी अद्याप साठायचे आहे. कोकणातील काही नद्या पूररेषेवरून वाहत आहेत.


गेले वर्षभर पाणीकपातीशी झुंजणाऱ्या या राज्यातील नागरिकांचा पाणीप्रश्न अजूनही कायम आहे. कोपरगाव, येवला, मनमाड आणि अशाच काही शहरांना आठवड्यातून एकदाच पाणी मिळते. वर्षभर नदी प्रवाही असलेली पाहणाऱ्यांना आता ती तीन महिनेही वाहत नाही, हे पाहून 'गेले ते दिन' असे वाटत राहते. या वर्षीचे आणखी वेगळेपण म्हणजे मराठवाडा आणि दुष्काळी सोलापूर जिल्ह्यात चांगला पाऊस झाला. मात्र तो सर्वदूर सारखा नाही. गेल्या वर्षीच्या तुलनेत पावसाची सरासरी चांगली दिसत असली, तरी गेल्या वर्षी दुष्काळ होता. त्यापेक्षा थोडा बरा पाऊस अद्याप झालेला नाही. कोल्हापूरच्या पंचगंगा व अन्य नद्या भरून वाहिल्या, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व पाऊस चांगला झाला होता. मध्यप्रदेशमध्ये झालेल्या चांगल्या पावसामुळे हतनूर धरणाचे दरवाजे उघडावे लागले. कोकणात महाड, रत्नागिरी, पालघर जिल्ह्यात काही गावांचा संपर्क तुटला होता. दरवर्षी तिथे शहरांमध्ये, गावांमध्ये पाणी घुसते. त्यात काहीच नावीन्य नाही. त्यातही यावर्षी मुंबईपेक्षा लगतच्या ठाणे जिल्ह्यात जास्त पाऊस झाला. गेल्या तीन वर्षांमधील दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला होता. यावर्षीच्या पावसाने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निकाली काढला तसेच पुण्यासह अन्य काही मोठ्या शहरांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर झाली. असे असले, तरी अजूनही संकट पूर्णतः दूर झालेले नाही. त्यामुळे उतावळेपणा करून चालणार नाही.

आता पाऊस पडत असला, तरी शेतकऱ्यांना हिरवा चारा येण्यासाठी आणखी दोन महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे. पाऊस म्हणजे शेतकरी, काबाडकष्टकऱ्यांचे आनंदाश्रू. पाऊस म्हणजे भूकमरीवरचे औषध, मानवजातीचे जीवन, जीवसृष्टीचा प्राण. पावसाचे असे वर्णन केले जात असले आणि सध्या पावसाने जिवात जीव आणला असला, तरी त्यामुळे लगेच चक्र बदलत नाही. माणूस शेवटी आशेवरच जगतो. राज्य सरकारने चांगल्या पावसामुळे सुटकेचा निःश्वास टाकला असेल. जलशिवार योजनेमुळे राज्यात 'पाणीच पाणी चहूकडे' अशी परिस्थिती नाही.

तीन वर्षांच्या कमी पावसाने भूगर्भातील पाण्याची पातळी आठ-नऊशे फूट खाली गेली आहे. आता भीज पाऊस झाला, तिथे थोडेफार जादा पाणी मुरले असेल, इतकेच. भुईच्या घशाला पडलेली कोरड आणि तिच्या पोटातील तृष्णा इतक्यात भागणार नाही. मधून मधून असाच पाऊस पडावा लागेल. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जसा चांगला पाऊस झाला, तसाच तो लाभक्षेत्रातही व्हावा लागेल. एकदाच आणि काही ठिकाणी पाऊस होऊन उपयोग नसतो; तो सर्वदूर असावा लागतो.

अतिवृष्टी आणि ओला दुष्काळ परवडला; परंतु कोरडा दुष्काळ नको. चांगला पाऊस होत आहे, असं मानून जलशिवार योजना किंवा पाणी अडवण्याच्या अन्य योजनांकडे दुर्लक्ष होऊ नये, हेही नमूद करायला हवे.

# ...खाजगी क्षेत्रातील आरक्षणाचा तिढा




नोंद

**शिवाजी कराळे**

> **जगात अनेक देशांमध्ये खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्याचे कायदे असले, तरी भारतात न्यायाच्या कसोटीवर हे कायदे टिकत नाहीत. उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा खाजगी क्षेत्रातील स्थानिकांचे आरक्षण रद्द ठरवले, तरी अशा प्रकारचे कायदे केले जातात; मात्र त्यांना स्थगिती दिली जाते. त्यासाठी कायदे काय सांगतात आणि राज्यकर्त्यांचा उद्देश काय, याचा विचार करण्याची गरज आहे.**

जगात सौदी अरेबियासह अनेक देशांमध्ये स्थानिकांना प्राधान्याने रोजगार देण्याचे कायदे आहेत. भारतात कायदा नसतानाही टक्केवारी काढली, तरी स्थानिकांना रोजगार देण्याचे प्रमाण जास्त आहे; परंतु एखाद्या गोष्टीवर कायदा आणला, तशी सक्ती केली, तर टिकत नाही. 'अमेरिकन फर्स्ट' काय किंवा अन्य देशातील कायदे काय, याचा उद्देश स्थानिकांना अधिक रोजगार मिळावा असा असतो. भारतीय राज्यघटनेत सरकारी नोकऱ्यांमध्ये ठरावीक प्रमाणात आरक्षणाची तरतूद आहे; परंतु खाजगी क्षेत्रातील नोकरीबाबत असा कायदा करता येत नाही. त्याचे कारण मूलभूत अधिकारात रोजगार, अभिव्यक्ती, संचार, घर करून राहणे आदी अधिकार येतात. त्याचे उल्लंघन झाले की, असे कायदे रद्द होतात.

हरयाणा सरकारने स्थानिकांना ७५ टक्के आरक्षणाचा कायदा केला होता. अगोदर उच्च न्यायालयाने आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द केला. २०२० मध्ये करण्यात आलेल्या 'हरयाणा राज्य स्थानिक उमेदवारांसाठीच्या रोजगार कायद्या'मुळे राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ आणि १९ चे उल्लंघन होत आहे, हा युक्तिवाद न्यायालयाने मान्य केला. हरयाणातील नागरिकांना खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये ७५ टक्के आरक्षण देणाऱ्या कायद्याच्या अंमलबजावणीविरोधात न्यायालयाने अनेक याचिका दाखल करून घेतल्या होत्या. या कायद्यात ३० हजार रुपयांपर्यंतचे मासिक वेतन किंवा रोजंदारी असलेल्या खाजगी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद केली होती. आपल्या ८३ पानी निकालपत्रात न्यायालयाने स्पष्ट केले की, हरयाणा सरकारने केलेला स्थानिकांना ७५ टक्के आरक्षण देणारा कायदा घटनाबाह्य आहे. या कायद्यामुळे राज्यघटनेच्या तिसऱ्या भागाचे उल्लंघन होत आहे. एकदा राज्यघटनेने मर्यादा घालून दिल्यानंतर राज्य सरकारने खाजगी नियोक्त्याला स्थानिकांनाच रोजगार देण्यास सांगण्याचे कारण दिसत नाही. कारण सर्वांनीच आपल्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात असे संरक्षण देण्याचा निर्णय घेतल्यास देशामध्ये कृत्रिम भिंती उभ्या राहतील, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. सरकारचा हस्तक्षेप जितका कमी असेल, तितके चांगले या तत्त्वानुसार खाजगी व्यावसायिकाला नियुक्तीबाबत सूचना करणे सरकारचे काम नाही. एखादी व्यक्ती एखाद्या राज्याची नागरिक नाही, या कारणासाठी सरकार असा भेदभाव करू शकत नाही, असे मत न्यायालयाने नोंदवले होते.

या पृष्ठभूमीवर अगोदर आंध्रप्रदेश आणि आता कर्नाटक मंत्रिमंडळाने उद्योग, कारखाने आणि इतर आस्थापनांमध्ये ५० टक्के व्यवस्थापन पदांवर आणि ७० टक्के गैरव्यवस्थापकीय पदांवर स्थानिक उमेदवारांची नियुक्ती करणे अनिवार्य करणारे विधेयक मंजूर केले; परंतु त्याला झालेल्या विरोधामुळे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना निर्णय रद्द करावा लागला. सध्या अनेक राज्यांमध्ये उद्योग आकर्षित करण्यासाठी स्पर्धा लागली आहे. उद्योजक एखाद्या राज्याची निवड का करतो याचा विचार केला तर त्या राज्यातील पायाभूत सुविधा, वीजदर, पाण्याची उपलब्धता, उद्योगांना मिळणाऱ्या सवलती, कायदा आणि सुव्यवस्था आदी बाबींना तो जेवढे महत्त्व देतो, तेवढेच महत्त्व त्या राज्याच्या कामगार धोरणालाही देतो, असे दिसते.

संबंधित राज्यांमध्ये कौशल्य विकासप्राप्त उमेदवार असतील, तर तो स्थानिकांना रोजगार देतो; परंतु स्थानिक कामगार असतील, तर ते संघटना बांधतात. काम करत नाहीत. दबाव आणतात. अशी अनेक कारणे आहेत. उद्योजक आपल्या नफ्याचा विचार करतो. त्यासाठी कुशल आणि कार्यक्षम कामगारांना प्राधान्य देतो. हा कामगार कुठला आहे, कोणत्या भाषेचा आहे, जातीचा आहे, प्रांताचा आहे हा विचार त्याच्या दृष्टीने गौण असतो. त्यातच भारतातील खाजगी क्षेत्रातील स्थानिक आरक्षणाची घटनात्मक वैधता ही एक जटिल आणि सूक्ष्म समस्या आहे. त्यात समानता, भेदभाव न करणे आणि सकारात्मक कृती या तत्त्वांचा समतोल राखणे समाविष्ट आहे. कलम १४ च्या समानतेच्या अधिकारानुसार कायद्यासमोर समानता आणि भारताच्या हद्दीतील कायद्यांच्या समान संरक्षणाची हमी असते. कोणत्याही प्रकारचे आरक्षण हे वाजवी वर्गीकरणाच्या कसोटीवर उतरले पाहिजे आणि मनमानी नसावे. कलम १५ आणि १६ ही कलमे धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई करतात. तथापि, ते सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या बाजूने होकारार्थी कारवाई करण्यासदेखील परवानगी देतात. कलम १९(१)(जी) नुसार, कोणताही व्यवसाय करण्याचा किंवा व्यापार किंवा व्यवसाय चालवण्याचा अधिकार असतो. या अधिकारावरील निर्बंध वाजवी आणि सर्वसामान्यांच्या हिताचे असले पाहिजेत. कलम २१ च्या या व्यापक व्याख्येमध्ये उपजीविकेचा अधिकार समाविष्ट आहे. या अधिकाराचे उल्लंघन केल्यास रोजगारावर परिणाम करणाऱ्या आरक्षण धोरणांना आव्हान दिले जाऊ शकते. कलम ३८ आणि ३९ मध्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे असून ती सर्व नागरिकांसाठी उपजीविकेचे पुरेसे साधन सुनिश्चित करण्यासाठी निर्देशित करतात. न्यायालयांद्वारे अंमलात आणण्यायोग्य नसले, तरी ही तत्त्वे धोरण बनवण्यास मार्गदर्शन करतात. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनेक निवाड्यांचा विचार केला, तर खाजगी क्षेत्रातील स्थानिकांना रोजगारात प्राधान्य हा कायदा टिकूच शकत नाही. साधारणपणे खाजगी क्षेत्रात कामावर घेताना चांगले काम करणाऱ्या व्यक्तीला कामावर ठेवले जाते. एखादा माणूस अत्यंत गरजू आणि कामाचा माणूस असेल तर त्याला त्या निर्णयाचा फायदा नक्की होईल. स्थानिक असो वा बाहेरचा; त्यांच्यातून चांगले काम करणारे लोक शोधावे लागतात अन्यथा कामावर वाईट परिणाम होतो. अशा कायद्यामुळे काही लोकांना जबरदस्तीने कामावर घ्यावे लागत असेल तर उद्योग बंद पडतात. कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसेल, तर उद्योजकांनी त्याची जबाबदारी घेऊन स्थानिकांना प्रशिक्षित करावे, अशी आंध्रप्रदेशच्या कायद्यात तरतूद आहे; पण स्थानिकांना प्रशिक्षण देण्याचा खर्च कुठून करायचा, हा प्रश्न अनुत्तरित राहिला. स्थानिक किंवा परप्रांतातील असा कोणताही फरक उद्योजक करत नसतो. आज कुशल कामगारांची कमतरता आहे. त्यांची संख्या वाढायला हवी तसेच काम करण्याची प्रवृत्ती वाढवण्यावर सरकारने भर दिला पाहिजे. देशातले तरुण खूप हुशार आहेत. त्यांना योग्य मार्ग दाखवणे गरजेचे आहे. 'नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपनीज' (नॅसकॉम) ने कर्नाटक सरकारच्या निर्णयावर झोड उठवल्याने मुख्यमंत्र्यांना हा कायदा स्थगित करावा लागला. काही उद्योग प्रतिनिधींनी असा युक्तिवाद केला की, या विधेयकामुळे विशेषतः विशेष कौशल्याची आवश्यकता असलेल्या क्षेत्रांमध्ये प्रतिभेची कमतरता निर्माण होऊ शकते. विधेयकाला कायदेशीर तपासणीला सामोरे जावे लागू शकते. उद्योगसंस्थांचे म्हणणे आहे की, अशा आदेशांमुळे व्यावसायिक कामांमध्ये व्यत्यय येऊ शकतो. विशेषतः उच्च पातळीवरील कौशल्ये स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध नसतात. अशा धोरणांच्या घटनात्मक आणि आर्थिक परिणामांबाबत संभाव्य कायदेशीर आव्हानेदेखील असू शकतात. स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची पद्धत भारतात यशस्वी झाली नसली, तरी जगातील अनेक देशांमध्ये ती लागू केली जाते आणि त्याला कोणताही विरोध होत नाही, असेही आढळते. कर्नाटकमधील सिद्धरामय्या सरकारने खाजगी कंपन्यांमधील नोकऱ्यांबाबत मोठा निर्णय घेतला होता.

सिद्धरामय्या सरकारच्या मंत्रिमंडळाने स्थानिक कन्नड भाषिकांना खाजगी कंपन्यांमधील नोकऱ्यांमध्ये आरक्षण लागू करणाऱ्या विधेयकाला मंजुरी दिली होती; मात्र आता सरकारने आपला निर्णय मागे घेतला आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर काही तासांमध्येच वाद सुरू झाला. सरकारच्या या निर्णयावर अनेक उद्योगपतींनी जोरदार टीका केली. त्यानंतर कर्नाटक सरकारने स्थानिकांना आरक्षण अनिवार्य करणाऱ्या विधेयकाला स्थगिती दिली. या विधेयकांतर्गत खाजगी उद्योग, कारखाने आणि इतर संस्थांमधील व्यवस्थापन पदांवर स्थानिक लोकांना ५० टक्के आणि बिगर व्यवस्थापन पदांवर ७५ टक्के आरक्षण देण्याची तरतूद आहे. कर्नाटकपूर्वी आंध्रप्रदेश आणि हरयाणामध्ये स्थानिक लोकांना खाजगी क्षेत्रात आरक्षण देण्याचे प्रयत्न झाले. तसेच मध्यप्रदेशमध्येही सरकारने स्थानिकांना खाजगी क्षेत्रात आरक्षण देण्यासाठी प्रयत्न केले होते; पण या प्रयत्नांना यश मिळू शकले नाही. स्थानिक लोकांना खाजगी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याबाबतील सौदी अरेबिया आघाडीवर आहे. सौदी अरेबियामध्ये १९८५ मध्ये येथे एक धोरण लागू करण्यात आले. याला 'सौदी राष्ट्रीयीकरण योजना आणि निताकत' असे म्हणतात. या योजनेची अंमलबजावणी तेथील कामगार मंत्रालयाने केली आहे.

ओमान सरकारने १९८८ मध्ये स्थानिक लोकांना खाजगी क्षेत्रात नोकऱ्या देण्यासाठी धोरण लागू केले. हे 'ओमनायझेशन' म्हणून ओळखले जाऊ लागले. या धोरणाचा उद्देश विदेशातील कामगारांची संख्या कमी करणे आणि त्यांच्या जागी ओमानी लोकांना नोकरीच्या संधी देणे, हा होता. ओमानमध्ये स्थानिक लोकांसाठी विविध क्षेत्रातील आरक्षणाची टक्केवारी ठरवण्यात आली. उदाहरणार्थ, स्थानिक लोकांना बँकिंग आणि वित्त क्षेत्रात ६० टक्के, औद्योगिक क्षेत्रात ३५ टक्के, हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये ३० टक्के, होलसेल आणि रिटेल क्षेत्रात २० टक्के आणि कंत्राटी नोकऱ्यांमध्ये १५ टक्के संधी दिल्या जातात. स्थानिक लोकांना नोकऱ्यांमध्ये आरक्षणसंदर्भातील नियम संयुक्त अरब अमिराती म्हणजेच यूएईमध्ये लागू आहे. या धोरणाचे नाव 'इमिरिटायझेशन' असे आहे. यूएई सरकारने विविध उद्योगांमध्ये नोकऱ्यांसाठी स्थानिक लोकांचा कोटा निश्चित केला आहे. स्थानिक लोकांना नोकऱ्या देण्यासाठी मलेशियामध्येही धोरण लागू करण्यात आले. या धोरणानुसार मलेशिया आणि स्थानिक लोकांना नोकरी, शिक्षण आणि व्यवसायात भरती करणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले. येथील लोकांची सामाजिकआर्थिक स्थिती सुधारणे, हा या धोरणाचा उद्देश असल्याचे म्हटले गेले. (लेखक विधिज्ञ आणि कायद्याचे अभ्यासक आहेत)